

# ॥ श्री विद्याधिराज तीर्थ ॥

श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे २० वे पीठाधीश

**श्रीमद् इंदिराकांततीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी**



शिष्याश्रम : वैशाख शु. दशमी शके १८०८, गुरुवार

पट्टाभिषेक : आषाढ व. तृतिया शके १८१४, मंगळवार

समाधि : चैत्र व. सप्तमी शके १८६४, मंगळवार

॥ श्री विद्याधिराजतीर्थ ॥

# ॥ श्री विद्याधिराजतीर्थ ॥

लेखक

चंद्रकांत शांताराम केणी

श्री विद्याधिराजतीर्थ षष्ट्यब्दपूर्ति गौरव समिति

**SHREE VIDYADHIRAJ TEERTH**

**श्री विद्याधिराजतीर्थ**

**(Biographical Essays on the life of Shree Swamijee)**

**प्रकाशन तिथि**

श्रावण शु. १४शी, शके १९२७

गुरुवार, दि. १८ ऑगस्ट २००५

**प्रकाशक**

श्रीनिवास वा. शे. धेंपे

अध्यक्ष,

श्री विद्याधिराजतीर्थ षष्ट्यब्दपूर्ति गौरव समिति

धेंपो हाऊस, कांपाल, पणजी - ४०३ ००१

**अक्षर जुळणी व मुद्रण**

सुरेश तिमाजी शणै काकोडकार

ओमेगा एन्टरप्राइझेस्

११५८, विद्यानगर, मडगांव - गोवा.

**मूल्य रु. १००/-**

प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी

यांच्या

षष्ट्यब्दपूर्ति निमित्त

त्यांच्या चरणकमलीं

भक्तिभावें

अर्पण

# प्रस्तावना

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेंतील तेविसावे गुरुस्वामी प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या षष्ट्यब्दपूर्ति निमित्त कृतज्ञ समाजामार्फत त्यांचा यथोचित गौरव करण्याच्या दृष्टीने गोव्यांत सारस्वत समाजांतील प्रमुख व्यक्तींची 'श्री विद्याधिराजतीर्थ षष्ट्यब्दपूर्ति गौरव समिति' स्थापन करण्यात आली आणि तिच्या अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. सर्व थरांतील व सर्व भागांतील समाजांतील ज्येष्ठ मान्यवरांनी संपूर्ण सहकार्य देण्याचें आश्वासन दिल्याने मी सहर्ष ती स्वीकारली.

प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींचा जन्म श्रावण शु. चतुर्दशी शके १८६७ ह्या पार्थिव संवत्सरांत गंगोळी येथें सेनापुर आचार्य घराण्यांत झाला. ग्रेगेरियन कालगणनेनुसार तो बुधवार दि. २३ ऑगस्ट १९४५ हा दिवस होता. वयाच्या एकविसाव्या वर्षीं त्यांना मुंबई येथील श्री द्वारकानाथ भवनांत गुरुवर्य श्री द्वारकानाथतीर्थांनी संन्यास दीक्षा देऊन आपले उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड केली. चैत्र शु. द्वितीया शके १८९५, म्हणजे ५ एप्रिल १९७३ रोजीं त्यांनी पीठारोहण केलें.


सारस्वत समाजाच्या जीवनांत कुलदैवत व श्रीगुरुपीठ यांचें स्थान किती महत्त्वाचें आहे हें गेल्या पांच शतकांच्या इतिहासावरून नजर फिरविली असतां सहज दिसून येईल. किंबहुना सारस्वत समाजाची संघटनवृत्ती, त्याला मिळालेले संस्कार, तत्त्वाशीं तडजोड न करण्याचा निर्धार, हे सारे सद्‌गुण देवगुरुंच्या संस्कारांनी जनमानसांत बिंबवले आणि अशा रीतीने पूर्वजांचा उदात्त वारसा आपण आजच्या युगापर्यंत आणला. प्रलोभनें, आव्हानें यांच्यापुढें आपण शरणांगति कधींच पत्करली नाहीं. हा बाणा यापुढेहि आपल्याला टिकवायचा आहे. आणि त्यासाठीं देवगुरुंचे आशिर्वाद हवे आहेत.

सामान्यपणे संन्याशाचे वाढदिवस साजरे करायचे नसतात. परंतु गुरुस्मरण व

वंदन करून समाजांत जागृति व चैतन्य निर्माण करणे सुलभ असतें, असा अनुभव घेतलेल्या शिष्यपरिवाराने आपल्या परीने पूज्य श्री स्वामीजींची जन्मतिथि दर वर्षी 'श्री गुरुअभिवंदना दिवस' म्हणून साजरा करण्याचा प्रघात पाडला. त्यामुळें यंदाच्या षष्ट्यब्दपूर्ति दिनीं आनंदोत्सव साजरा करण्याचें शिष्यपरिवाराने ठरविलें आणि षष्ट्यब्दपूर्तीचा प्रमुख दिवस साजरा करण्याचा मान गोव्याला मिळाला. या वर्षींहि पार्थिव संवत्सरांत दि. १८ ऑगस्ट रोजीं श्रावण शु. चतुर्दशी येत असल्याने त्याच दिवशीं श्री रामनाथ देवाच्या सन्निधींत पूज्य गुरुवर्यांचा आम्ही गौरव करणार आहोंत. त्यानिमित्त गुरुवर्यांच्या जीवनकार्याचा परिचय आणि श्रीमठाच्या इतिहासाशीं संबंधित दोन चार पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. त्यांतील श्री विद्याधिराजतीर्थ हें एक पुस्तक होय. श्री. चंद्रकांत शांताराम केणी यांनी मठाच्या कक्षेंत जवळ जवळ तीन दशकें सक्रीयपणे कार्यरत असताना आपल्या मनांत नोंद झालेल्या घटना-घडामोडींच्या स्मृति इथें अक्षरबद्ध केलेल्या आहेत. एका वेगळ्या प्रकारचें हें चरित्र वाचकांना आवडेल अशी अपेक्षा आहे.

धेंपो हाऊस,
कांपाल, पणजी.
दि. १८ ऑगस्ट, २००५

**श्रीनिवास वा. शे. धेंपे**
अध्यक्ष,
श्री विद्याधिराजतीर्थ षष्ट्यब्दपूर्ति गौरव समिति



# अनुक्रम


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रस्तावना | ... | ... | सात |
| १. | उपोद्घात | ... | ... | ११ |
| २. | अंतर्मनाचा वेध | ... | ... | २१ |
| ३. | सेनापुर आचार्य घराणें | ... | ... | २७ |
| ४. | बद्रिनाथ - मठाची गंगोत्री | ... | ... | ३१ |
| ५. | पंचशताब्दि महोत्सव | ... | ... | ३७ |
| ६. | संघटनाची प्रक्रिया | ... | ... | ४३ |
| ७. | विविध तीर्थयात्रा | ... | ... | ४७ |
| ८. | प्रयागचा कल्पवास | ... | ... | ५३ |
| ९. | गंडकी यात्रेमागील मनोभावना | ... | ... | ५७ |
| १०. | जीवन एक अनंत यात्रा | ... | ... | ६३ |
| ११. | स्वामीजींच्या जीवनयात्रेंतील तीन टप्पे | ... | ... | ७९ |
| | परिशिष्टें | ... | ... | ९१ |

# १. उपोद्घात

श्री द्वारकानाथतीर्थांचें निर्वाण झाल्यानंतर गाडीने रूळ बदलून आपली गति वाढवावी तसा प्रकार मठाच्या कक्षेंत घडूं लागला. लोकसंग्रहाची आवड श्री द्वारकानाथ-तीर्थांना होती. आपण असें म्हणूं शकतों कीं श्री द्वारकानाथतीर्थांच्या कारकिर्दींत गुरुपीठ व गुरुवर्यांकडील केवळ मठानुयायी वर्गाचाच नव्हे तर सारस्वत समाजांतील इतर संप्रदायांचा आणि इतर ज्ञातींतील लोकांचा संपर्क वाढत राहिला, ही वस्तुस्थिती आहे. भारत स्वतंत्र झाला होता व गोवाहि स्वतंत्र झाल्यानंतर वातावरणांत एक प्रकारची मोकळीक निर्माण झाली होती. लोकशाही बहाल झाल्यामुळें राज्यकर्त्यांच्या रोषाचा किंवा उपसर्गाचा कांच राहिला नव्हता आणि वैचारिक आदान-प्रदान करण्यासाठीं असलेली सामाजिक व वैचारिक सहिष्णुता निर्माण झाली होती. त्या बदललेल्या वातावरणांत श्री द्वारकानाथतीर्थांनी भिन्न सारस्वत व बिगर सारस्वत सामाजिक व धार्मिक संस्थांकडे सतत संपर्क ठेऊन विविध जाति-जमातींमध्यें सलोखा व सहकार्याचें वातावरण निर्मिलें आणि विश्वधर्म संमेलनासारख्या प्रवृत्तींमध्यें अधिक सहभाग घेऊन, हिंदुधर्म व संस्कृति बद्दल प्रचलित असलेले अनेक गैरसमज दूर केले. त्यामुळें त्यांचे उत्तराधिकारी पूज्य श्री विद्याधिराजतीर्थ हे गुरुपीठावर येतांच इतर धर्माच्या व ज्ञातीच्या नेत्यांनी तत्परतेने त्यांचे आशिर्वाद प्राप्त करून घेतले. वातावरण सुधारत राहिलें तसें विघटित सारस्वत समाजाच्या संघटनाद्वारें इतर धर्मियांशीं बंधुभाव वृद्धिंगत करण्याची एक प्रक्रिया सुरू झाली. गोव्यामध्ये राजकीय कारणासाठीं व इतरत्र राजकीय स्पर्धेतून बहुजन समाजाच्या मनांत सारस्वत समाजाबद्दल जीं किल्मिषें होतीं, जे गैरसमज होते, ते त्या समाजांतील नेत्यांकडे प्रमुख धर्मपीठाचा संपर्क आल्याने दूर होऊन समाजांत सलोख्याचें वातावरण निर्माण झालें होतें. अशा सामाजिक पार्श्वभूमिवर मठपरंपरेंतील तेविसावे आचार्य पूज्य श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजी गुरुपीठावर अधिष्ठित झाले.

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर महाराजांनी ५९ वर्षे पूर्ण करून या संवत्सरांतील निज श्रावण चतुर्दशी (१८ ऑगस्ट २००४) रोजी षष्ट्यब्दीत प्रवेश केला. एखाद्या व्यक्तिमध्ये दिव्यत्वाचा संचार होतांच ती कशी तेजस्वी बनू शकते याचे श्रीस्वामीजीचें जीवन एक उदाहरण आहे. १९४५ साली जन्मलेले श्री विद्याधिराजतीर्थ याना २६ फेब्रुवारी १९६७ रोजी श्रीमठपरंपरेतील २२वे आचार्य श्री द्वारकानाथतीर्थ यानी मुंबई येथील श्री राममंदिराच्या प्रांगणात संन्यास दीक्षा दिली. सलग सहा वर्षेपर्यंत गुरूच्या प्रेमळ कृपाछत्राखाली एका संन्याशाचे मठाधीशामध्ये कसे रूपांतर होत गेले, या गोष्टीला विद्यमान पिढीतील अनेक मठानुयायी साक्षीदार असतील. २२ मार्च १९७३ रोजी श्री द्वारकानाथतीर्थ वृंदावनस्थ झाले आणि ५ एप्रिल १९७३ रोजी श्रीविद्याधिराजतीर्थ गौरवशाली परंपरा असलेल्या श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी पीठावर अधिष्ठित झाले.

त्याच सुमारास योगायोगाने माझा श्री मठाकडे संबंध आला. मठाबद्दल मी थोडेफार ऐकून होतो. आमचे कुटुंब श्रीपर्तगाळ मठाच्या शिष्यवर्गान्तर्गत आहे एवढी माहिती मला होती. त्या शिवाय मठाधीशाचें कार्य किंवा त्यांच्या जीवनचर्येबद्दल अजिबात माहिती नव्हती. अनास्था म्हणून नव्हे पण तसा योग कधीच आला नाही. बालपणी दोन स्वामीजीचे एकत्र दर्शन घेतल्याचें स्वप्नात पाहिल्यासारकें एक अंधुक चित्र माझ्या आठवणीत ठाण मांडून बसले आहे. ते प.पू श्री इंदिराकांततीर्थ व त्यांचे शिष्य श्री कमलनाथतीर्थ असावेत, असें आतांशा वाटूं लागलें. श्री स्वामीजींच्या मंगल हस्ते तप्तमुद्रा घेतल्याचे आठवते. त्या वयांत मठ, स्वामी, मुद्रा, असल्या विषयांबद्दल जिज्ञासा देखील नव्हती. तद्नंतर प्रत्यक्ष संपर्क आला प.पू. श्री द्वारकानाथ स्वामीजींशीं. मुंबई शहरात अ.भा. कोंकणी परिषदेचे उद्घाटन करण्यासाठी त्याना निमंत्रण देण्यात आले होते. कांहीशा अंतरावर राहून त्याचे दर्शन घेतले तेवढेच. पण सुहास्य वदन, तेजस्वी व्यक्तिमत्व पाहून मी प्रभावित झालो. मठाविषयी माहिती मिळविण्यासाठी एखादे पुस्तक मी शोधले. पण मिळाले नाही. इतर व्यापामध्ये हळूहळू मठाचे व स्वामीजींचेंहि विस्मरण झाले.

गोवा मुक्तीच्या पूर्व संध्येवर मी दिल्लीत असताना प.पू. श्री द्वारकानाथतीर्थ यांचे तेथे आगमन झाले होते. माझ्या निवासालगत असलेल्या गांधी स्मारक संग्रहालयाला

ते भेट देणार असल्याचे समजले. मी श्री स्वामीजींच्या दर्शनासाठी तेथे गेलो. मठाधीशांची भेट कशी घ्यायची, त्यांना संबोधन कसे व कोणत्या शब्दांत करायचे याबद्दल मला कोणतीच कल्पना नव्हती. संकोचाने बाजूला उभा राहिलो असताना स्वामीजीनी मला पुढे बोलावले, तेच सुहास्य वदन. चेहऱ्यावर पूर्णाकृती चंद्राची प्रसन्नता. भारदस्त आवाजांत त्यानी मला काही प्रश्न केले. मी कशी उत्तरे दिली ते आज आठवत नाही. निरोप घेताना त्यांनी फलमंत्राक्षता माझ्या हातात दिली आणि अद्भूत धन्यतेचा अनुभव मी घेतला. पर्तगाळ मठाकडील तो माझा पहिला संबंध असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही.

गोवा मुक्तीनंतर मी मडगांवला येऊन स्थायिक झालो आणि सार्वजनिक जीवनात वावरताना स्थिर सुखवस्तू जीवन सोडून 'राष्ट्रमत' सारख्या प्रवृत्तीमध्ये दाखल झालो. एके दिवशी दुपारच्या सुमारास यशवंत रामराय नायक कुराडे (जे मला नेहमी कुंकळ्ळीचा नातू म्हणत) यानी निरोप पाठविला, पर्तगाळ स्वामीजींचा आपल्या घरी मुक्काम आहे. सवडीने गुरुदर्शनासाठी यावे अशी आज्ञा झाली आहे.

दुपारची वामकुक्षी आटोपून, स्नान करून मी कुराडे यांच्या निवासस्थानी जात असताना वाटेत श्री दामोदर विद्याभवनाच्या सभागृहाच्या वास्तूमागे मंगलवाद्ये व माणसाची वर्दळ पाहिली: चौकशी केली असता श्री स्वामीजी तेथे आल्याचे समजले. सभागृहामागील बाजूला सुरेख पायऱ्या आहेत आणि अग्रशाळा विभागाचे प्रवेश द्वार बंद करून तेथे उभारलेल्या व्यासपीठावर श्री द्वारकानाथतीर्थ स्वामीजी बसले आहेत ते मी पाहिले. सभोवती गोव्यातील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक होते. एक बाजूला स्त्रिया व दुसऱ्या बाजूला पुरुष जाजमावर बसले होते. मी वरच्या पायऱ्यांवर बसलेल्या लोकांमध्ये मिसळलो. श्रीस्वामीजींच्या प्रवचनाची तयार चालली होती आणि देवगुरुचें स्मरण करून ते प्रवचनास आरंभ करणार तेवढ्यात ध्वनिक्षेपकावरून आवाज आला. 'चंद्रकांत केणी यांना स्वामीजी जवळ बोलावित आहेत'. माझा विश्वास बसेना. एक तर मी मध्यंतरीच्या प्रदीर्घ गैरहजेरीनंतर नव्यानेच गोव्यात आलो होतो. शिवाय माझा चेहरा प.पू. स्वामीजींच्या स्मरणांत राहील याची कल्पना नव्हती. संकोचाने उठून एखाद्या खुल्या सभागृहाच्या गॅलरीमध्ये दाटीवाटीने बसलेल्या लोकांमधून वाट काढीत एक एक पायरी उतरताना माझी त्रेधा तिरपीट उडाली. साऱ्या नजरा माझ्यावर स्थिरावल्या होत्या. मी जवळ पोहोचताच प.पू. श्रीस्वामीजींच्या

चरणासमोर मस्तक ठेवून वंदन केले आणि स्वामीजीनी मला तेथेंच सिंहासनाच्या बाजूला बसण्यास सांगून मग मंद आवाजात विचारले, "दोन शव्द बोलणार?"

सभा कार्यक्रमामध्ये भाषणे करण्याचा मला अनुभव होता. पण अशा प्रकारच्या वातावरणात कसे बोलावे, काय बोलावे, शब्द योजना कशी करावी याची मला कोणतीच कल्पना नव्हती. माझा संकोच श्री स्वामीजींना कळला व त्यांनीही विशेष आग्रह न धरता, आपले प्रवचन सुरू केले. मला अजून तो विषय आठवतो. 'धर्म व अहिंसा हीं तत्त्वे किती उदात्त आहेत ते सगळेच सांगतात. पण याचे आचरण फक्त गोव्यातच पहायला मिळते'. हा मुद्दा अनेक दाखले देऊन सहज, सुंदर प्रासादिक भाषेतून श्री स्वामीजींनी प्रतिपादला.

दुसरे दिवशी 'राष्ट्रमत' मध्ये या प्रवचनाचा वृत्तांत छापून आला. तो वाचून अनेक मठानुयायी भाविकांनी कौतुक केले, तो प्रश्न अलाहिदा. पण मला एक गोष्ट जाणवली कीं, इटलीत पोप काय बोलले, तिबेटचे दलाई लामा यांनी काय सांगितले, जैन मुनीनी अहिंसेची व्याख्या कशी केली या बातम्या सगळीकडे प्रसिध्द होत असतात. त्या धर्तीवर मठधिशांच्या, साधुसंन्याशाच्या बातम्या दिल्या तर एका वर्गाला ते आवडेल. तोच अनुभव मी घेतला. परंतु त्यानंतर अनेक महिनेपर्यंत मठाचा विषय निघाला नाही. एके दिवशी संध्याकाळी श्री पांडुरंग दत्ता कामत तिंबले (ज्याना आम्ही चलेबाव म्हणत असूं) आमच्या घरी आले व त्यांनी सांगितले, 'उद्या बारा वाजतां गाडी पाठवीन. तुला घेऊन पर्तगाळ मठात यायचा आदेश प.पू. श्री स्वामींनी दिला आहे.

नकार सोडाच, विचार करायला देखील अवकाश नव्हता.

जीवनांत पहिल्या प्रथम मी पर्तगाळी मठात दाखल झालो. वास्तू जीर्ण पण डौलदार व विस्तृत होती. श्रीरामदेव व नंतर श्रीवीरविठ्ठल यांचे दर्शन घेऊन परंपरेतील पुण्यवंत आचार्यांच्या वृंदावनांना वंदन करून मागच्या दाराने बाहेर आलों आणि ईशान्य प्लवा कुशावतीचें दर्शन घेतलें. विहिरीजवळ असलेल्या करमलीच्या झाडावर लोंबकळणारी फळे पाहून तोंडाला पाणी सुटले. हळूच तोडून त्याची चव घ्यावी असा विचार मनात येताच माझ्या बुद्धीने मला सतर्क केले. अशा पवित्र स्थानी असा अमंगल विचार मनात आणणे योग्य नव्हे. परिसरातील वृक्षवल्लीवरून नजर फिरविली व हळूहळू राममंदिराच्या समोरील चावडीवर दाखल झालो. त्या

दिवशी मठात कैवल्य मठाधीश श्री सच्चिदानंद सरस्वती व काशी मठाधीश श्री सुधींद्रनाथतीर्थ यायचे असल्याने त्यांच्या स्वागताची तयारी चालू होती. मला वाटले, माझे काम बातमीदाराचे असेल. निःशंक मनाने, कांहीशा कुतुहलाने, कांहीशा कौतुकाने विविध गोष्टी टिपून घेत होतो.

त्या गर्दीतच वे.शा.सं. गिरीधर आचार्य यांची कुणी ओळख करून दिली आणि त्या वयोवृध्द विद्वानाच्या पुढे मी नतमस्तक झालो. सहज विचारलेल्या प्रश्नाना त्यांनी मुद्देसूद व अर्थपूर्ण उत्तरे दिली. मठाच्या इतिहासाची व कार्याची मला क्षणार्धात कल्पना आली. काळोखातून उजेडाकडे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्याला आकाशात चकाकलेल्या वीजेने वाट दाखवली असे मला वाटले. कुणीतरी ओढून जेवणाच्या पंक्तीला नेऊन बसविले. 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' या भावनेने असंख्यामधील एक म्हणून भोजन करताना मी जी कृतार्थता अनुभवली ती अप्रुपच. चूळ भरण्यासाठी मागील दरवाजात जाताना चलेबाब भेटले. 'अजून तूं स्वामीजींची भेट घेतली नाही. ते कधीपासून चौकशी करीत आहेत'. मला हिरमुसल्यासारखे झाले. मठात दाखल होऊन मठाधीशाचे दर्शन घ्यायचे असते एवढी साधी गोष्ट मला माहीत नसावी याबद्दल शरमही वाटली.

स्वामीजींचा निवास माडीवर होता. तेथील गर्दीमुळे मुख्य दालनात प्रवेश करणे कठीण जात होतें. पण कुणीतरी मला पाहिले व हाताला धरून श्रीस्वामीजीसमोर नेऊन उभे केले. "चार वाजता उभय स्वामींचे आगमन होईल. चावडीवर स्वागत समारंभ होणार. स्वागताचे भाषण तूं केले पाहिजे. त्यानंतर तिन्ही स्वामीजींची औपचारिक खासगी बैठक होईल तोपर्यंत थांबता आले तर अवश्य थांब... आणि मंत्राक्षतां घेतल्याशिवाय जाऊ नकोस". एवढेच बोलून श्रीस्वामीजी दुसरीकडे वळले.

मी आंतल्या आंत उन्हांत वितळणाऱ्या बर्फासारख्या घामाने पाझरू लागलो. दुपारची उष्णता होती पण स्वामीजींच्या आदेशाने मी भयभीतही झालो होतो. काय बोलावे, कसे बोलावे, ह्या मठाचे व इतर मठाचे संबंध कोणत्या प्रकारचे आहेत, त्यांच्यांत ज्येष्ठता क्रम असतो की काय, मठाधीशांना कसे संबोधायचे, असे असंख्य प्रश्न डोके भांबावून गेले. बाहेर आलो व विचार केला, गिरिधराचार्य काही वाट दाखवू शकतील. चौकशी केल्यावर समजले की ते स्वामीजीजवळ असून समारंभ आटोपल्यानंतरच ते भेटतील. श्रीनिवास (कृष्णा) कुंकळयेकर यांची श्रीमठात ये-जा

असल्याचे माहीत होते. त्यांना गांठले. त्यांनी थोडीफार माहिती दिली. पण ती भाषणासाठी उपयोगी होणार नव्हती. श्रीस्वामीच मार्गदर्शन करू शकले असते. पण ते इतके गडबडीत होते कीं, त्यांच्या समोर जाऊन त्यांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न देखील उचित होणार नव्हता. मी बाहेर मोकळ्या हवेत गेलो. रथविधीमध्ये थोडीशी सावळी होती. तेथे एका दगडावर बसलो आणि सह्याद्रीची गगनास भिडलेली निळी सावळी शिखरे पाहिली. कुशावती आपल्या जीवनाची कृतार्थता अनुभवण्यासाठी ज्या सागराकडे लगबगीने धांवत आहे, त्या अथांग समुद्राचे स्मरण केले आणि मनातल्या मनात ठरवून टाकले, सर्व मठांबद्दल प्रेम असावे त्यामुळे संघशक्ती विकसित करावी आणि त्यांच्या हृदयांत देवभक्ती रुजवून त्यांच्या हातून संस्कृतीचे रक्षण व्हावे.. अशा प्रकारचे काहीसे मुद्दे मनात दृढ करून मी पुन्हा मठात जायला उठणार तेवढ्यात कवळे व काशी मठाधीश येऊन दाखल झाले. तो एक अपूर्व सोहळा होता. पण त्याचे गांभीर्य मला त्यावेळी उमजले नव्हते.

शब्दांवर लगाम घालून आणि सात्विक, सोज्वळ शब्दसंग्रहाचा वापर करून स्वागतपर भाषणात मी माझ्या भावना व्यक्त केल्या. कुशावतीच्या किनारी घडून आलेल्या त्रिवेणी संगमात पापक्षालन करून सारस्वत समाजाचे तिन्ही प्रवाह एकत्र येऊन समाजगंगा निर्माण व्हावी असे काही तरी मी बोललो.

ते भाषण उपस्थित श्रोत्यांना आणि खुद्द मठाधिशांना देखील आवडलेले दिसले. निदान तिन्ही स्वामीजींनी प्रशंसोद्‌गार काढले. परंतु मठाकडील माझे संबंध काहीसे तटस्थच होते. अजून मठाच्या विविध उपक्रमांचा व एकंदर व्याप व कार्याचा बोध झाला नव्हता. माझे वैयक्तिक व्यापही सतत वाढत होते व मठाचे कोणतेही कार्य अंगावर घेण्याचा विचार देखील मनात येत नव्हता. मात्र मठातील विविध कार्यक्रमाची माहिती मी आस्थेने घेत होतो.

अचानक एके दिवशी माझे स्नेही श्री. अनंत नरसिंह नायक (बाबू नायक) यांनी जांबावलीला जाऊन येऊ असा निरोप पाठविला आणि देवदर्शन घडेल असा विचार करून मी होकार दिला. आम्ही जांबावलीला पोहोचलो तेव्हा सायंकाळचे सात-साडेसात वाजले होते. श्रीद्वारकानाथतीर्थांचा तेथे मुक्काम होता हे मला मागाहून समजले. मला असेही सांगण्यात आले की मुंबई येथील मठानुयायी वर्गाचे एक शिष्टमंडळ तेथे उपस्थित झालेल्या कांही प्रंश्नांचा उकल शोधण्यासाठी श्री स्वामीजीकडे

आले आहे. अशा बैठकीत मी सामील होणे हा आगंतुकपणा होईल असा विचार करून देवदर्शनला गेल्यावेळी मी मंदिरातच बसून राहतो व तुमची बैठक संपल्यानंतर मडगांवला परतण्यापूर्वी श्री स्वामीजींची भेट घेऊ असे बाबूंना सांगितले. माझ्या म्हणण्यात तथ्य आहे हे बाबूंना पटलेले असावे. त्यांनी अधिक आग्रह केला नाहीं व ते श्रीस्वामीजींच्या निवासस्थानी निघून गेले. मी मंदिराबाहेर येऊन पिंपळकट्ट्यावर बसून भोवतालचे दृश्य डोळ्यांनी टिपीत असताना श्री. कृष्णा कुंकळयेकर मला शोधत तेथे आले आणि मला बैठकीत भाग घेण्यासाठी खुद्द स्वामीजीनीच बोलावले आहे असा निरोप दिला.

स्वामीजींच्या आसनाच्या सभोवतीं गोव्यातील व मुंबईतील प्रमुख समाज नेते बसले होते. त्यामध्ये आपल्या विशिष्ट पोषाखामुळे चटकन् नजरेत भरणारे पुरुषोत्तम रामनाथ केणी यांनी हात उंचावून मला आपल्याजवळ बसण्यास सांगितलें. आम्ही त्यांना आदराने पुरशेबाब म्हणायचों. स्वामीजींच्या उपस्थितींत पुरशेबाबांसारख्या ज्येष्ठांजवळ बसताना संकोच वाटला आणि एखादी संधी साधून उठायचें व मागच्या बाजूला किंवा बाहेरच्या खुल्या जागेत जाऊन बसायचे असे मी मनातल्या मनात ठरविले. मुंबईहून आलेल्या शिष्टमंडळाने तेथे निर्माण झालेल्या पेचाची माहिती दिली व एका सार्वजनिक समारंभांत सहभागी होण्याचे निमंत्रण स्वीकारले असले तरी श्रीस्वामीजींनी त्यांत भाग घेऊ नये अशी विनंती केली, एवढाच मला बोध झाला. समग्र पार्श्वभूमि मला माहीत नव्हती म्हणून मूक श्रोत्याचे काम करणे क्रमप्राप्त झाले होते.

मुंबईकरांच्या सुचनेला पुरशेबाब यांनी जोरदार अनुमोदन दिले व म्हटले की, 'प्रश्न सोयी-गैरसोईचा नसून मठाच्या प्रतिष्ठेचा आहे. स्वामीजी जेथे जातील तेथे त्यांचे सन्मानपूर्वक स्वागत तर व्हावे लागेलच, त्याशिवाय आयोजकांनी त्यांच्याबद्दल योग्य आदर व्यक्त करावा लागेल. मग ते आसनावर बसविण्याचे असो किंवा आशिर्वचनासाठी पाचारण करण्याचे असो.'

संमेलन तोंडावर आले होते. ऐनवेळी माघार घेण्यास श्रीस्वामीजी संकोच करीत आहेत, हे त्यांच्या प्रतिक्रियेवरून स्पष्ट दिसत होते. पण भावनावश होऊन उपस्थित शिष्यपरिवार पुरशेबाब यांच्या विधानाला दुजोरा देत होता. कांही प्रमुख मंडळींचे मत समजून घेतल्यावर एकाएकी श्री स्वामीजींनी मला विचारले, "तुझे मत काय?"

मी नम्रपणे उभा राहून श्री स्वामीजींना वंदन केले व दोनच वाक्ये बोललो. मी म्हटले, "मागचा पुढचा संदर्भ मला माहीत नाही किंवा मठाकडील व्यवहाराचे यमनियमही मी जाणत नाही. तरी मला वाटते की मान-सन्मान हा मागणी करून मिळवायचा नसतो तो आपल्या व्यक्तिमत्वाने व कर्तृत्वाने आपोआप प्राप्त होत असतो."

"म्हणजे स्वामीजींनी संमेलनाला जावे असेच तुम्हाला सुचवायचे आहे ना?" पुरशेबाब यांनी कांहीश्या खोचक सुरात मला विचारले.

मी म्हटले, "तो निर्णय खुद्द स्वामीजींनीच घ्यायचा."

पुरशेबाब एकदम उखडले. कोणतीही माहिती नसताना, प्रथा-परंपरांची जाणीव नसताना आधुनिक विचारांचे वारे कानात भरलेले लोक अद्वा तद्वा बोलून जातात. पण अशा अनाहूत सल्ल्यानुसार मठाधिपति वागू शकत नाहीत, असा त्यांचा सूर होता.

हा वाद पुढे चालू नये असा विचार करून मी हळूच उठलो आणि निवासा बाहेर आलो. तेथे बाबू भेटले, चलेबाबही भेटले. शांत प्रकृतीचे पुरशेबाब भडकावे असे काय तू बोललास, त्यांनी मला पाहताक्षणी प्रश्न केला. मी म्हटले, कुणाचाही अपमान करण्याचा किंवा भावना दुखावण्याचा माझा हेतू नव्हता. प्रश्न आला व चटकन सुचलेले उत्तर मी दिले.

थोड्या वेळाने खुद्द पुरशेबाब बाहेर आले. त्यांनी माझ्या हाताला धरले व म्हटले,, "तुझे म्हणणे स्वामीजींना पटले आहे. आता बाहेर कशाला? तुला आंत बोलावले आहे." आणि मला जवळ ओढून ते आंत घेऊन गेले. सुहास्य वदनाने श्री स्वामीजींनी मला सांगितले, "उद्या एक शिष्टमंडळ मुंबईला पाठविण्याचे ठरले आहे. तुलाही जावे लागेल. तेथे प्रथम आपल्या लोकांशी बोलणी करून त्यांच्या शंकांचे निरसन करावे, नंतर शिष्य स्वामी (श्री विद्याधिराज तीर्थ) वडाळा मठांत विश्रांती घेत आहेत, त्यांची भेट घेऊन तुमची भूमिका त्यांच्या कानावर घालावी व त्यांच्या संमतीनेच आयोजकांशी बोलणी करावीत. शिष्यस्वामीजींच्या मनाविरुद्ध वा कलाविरुद्ध काही एक होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल," असेही त्यांनी बजावले आणि बैठक संपली.

बाहेर येऊन चौकशी केल्यावर मला समजले की त्या शिष्टमंडळात माझ्याशिवाय

चलेबाब व वसंत जोशी यांचाही समावेश आहे. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही विमानाने मुंबईला पोहोचलो व थेट वडाळा मठात गेलो. मठाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून एकंदर प्रश्न समजून घेतला. त्यांचे आक्षेप तेच होते. प्रश्न वैयक्तिक मानापमानाचा नव्हता तर एका गुरुपीठाच्या प्रतिष्ठेचा होता. आपले स्वामी समारंभाला गेले आणि तेथे त्यांचा अनादर झाला तर ते आपण कसे सहन करणार? मागाहून कुरापती काढून भांडणार तरी कोणत्या तोंडाने? डोक्यात प्रकाश पडत होता आणि माझी सडेतोड भूमिका उपकारक ठरणार नाही याची कल्पनाही येऊ लागली होती. त्याच मनःस्थितीत शिष्यस्वामी विश्रांति घेत होते त्या खोलीत जाऊन त्यांनी स्वामीजींना वृत्तांत सादर केला आणि नंतर आम्हाला आत पाठविण्यात आले. आपल्या प्रिय शिष्याच्या भावनांची गुरुवर्यांना किती कदर आहे हे तोपर्यंत मला अवगत झाले होतेच आणि त्याच बरोबर शिष्यस्वामींच्या मनात गुरुबद्दल किती आदर आहे याची कल्पना शिष्याच्या तोंडून निघालेल्या पहिल्या वाक्याने झाले. ते म्हणाले, "श्री स्वामीजींनी जी भावना व्यक्त केली आहे तसेच होईल, पण तुम्ही एवढी काळजी घ्यावी की त्यांचा तेथे अनादर होणार नाही किंवा समाजाला मनःस्ताप सहन करावा लागणार नाही. तुमची बोलणी संपल्यावर पुन्हा येथे येऊन काय ठरले ते कळवा."

आम्ही तेथून ताडदेवकडे निघालो. रात्रीचे नऊ वाजले होते. तेथे दीड तास चर्चा केल्यावर आयोजकांच्या मनातही भेदभावाची वा अनादराची भावना नव्हती, फक्त अज्ञानातून वा गैरसमजातून कांही भ्रम निर्माण झाले हे स्पष्ट झाले. भ्रमाचे निवारण होताच वातावरण प्रसन्न झाले. मनमुटाव दूर झाले आणि संमेलन यशस्वी होणार याबद्दल कुणाच्याच मनात संदेह राहिला नाही.

हे वृत्त वडाळा मठात जाऊन आजच शिष्यस्वामीजींच्या कानावर घालणे प्रशस्त असले तरी रात्री उशिरा त्यांना झोपेतून उठविणे योग्य होणार नाही असा एक विचार मी व्यक्त केला. पण इतर सहमत झाले नाहीत. ते म्हणाले, या बैठकीचा वृत्तांत मिळाल्याशिवाय शिष्यस्वामींना झोप लागणार नाही. आणि तसेच घडले असते. आम्ही पोहोचलो तेव्हा मध्यरात्र उलटली होती पण स्वामीजी आमचीच प्रतीक्षा करीत होते. शांत चित्ताने आमचें म्हणणे ऐकल्यावर आम्हाला निरोप देताना स्वामीजींच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटले. माझी त्यांची ती पहिलीच भेट होती.

प्रथमदर्शनी मला ते खूपच गंभीर वाटले होते, पण चेहऱ्यावरील स्वाभाविक स्मिताने तो पूर्वग्रह गळून पडला. ते तणावमुक्त दिसले. आपल्या गुरूवर्यांची इच्छा सफल होत आहे याबद्दल ते समाधानीही दिसले.

त्यानंतर मठांत जाण्याचा योग एका विशिष्ट परिस्थितींत आला. फोन वाजला. कर्नाटकांतून कुणी तरी मठानुयायी सांगून गेला. अंकोला मठातून पर्तगाळीकडे प्रस्थान घेण्यासाठीं उठून चालतां चालतां पूज्य श्री द्वारकानाथतीर्थ (व्हडले स्वामी) माघारी फिरले आणि मठाच्या प्रवेशद्वाराजवळ कांही क्षण ध्यानस्थ बसले, ते पुन्हा उठलेच नाहीत. मडगांवहून अनेक लोक अंकोल्याला गेले आणि तेथे गोळा झालेला जनसमुदाय पाहून मी चकित झालों. पार्थिव देहाचे अंत्यदर्शन हृदयस्पर्शी ठरले आणि मग अंकोल्याहून पर्तगाळी आणि पर्तगाळीहून घरी परतेपर्यंत त्या प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या समर्पित जीवन जगलेल्या कर्तव्यदक्ष व विद्वान संन्याशाच्या जीवनकार्याचे अनेक टप्पे नजरेसमोर तरळून गेले.

खऱ्या अर्थाने एका युगाचा अस्त झाल्याचा तो संकेत होता. स्वतंत्र भारतात सारस्वत समाज मुक्त वातावरणात आपला भविष्यकाळ घडविण्यास आतां मोकळा होता. आतां या समाजाला नव्या युगाला अनुरूप असे नवे नेतृत्व हवे होतें. ती तरतूद त्यांनी करून ठेवलेली असल्याने निश्चिंत मनाने त्यांनी वैकुंठवास पत्करला.

# २. अंतर्मनाचा वेध

भारताची समाजधारणोन्मुख संन्यस्तवृत्तीची परंपरा चालू ठेवण्याचे व्रत घेऊन पीठस्थ होताच पूज्य श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजी मठाचें कार्य अधिकाधिक गतिमान व जीवनाच्या बदलत्या मूल्यांना पोषक बनविण्यासाठी योजनाबद्ध कार्यक्रम आखूं लागले.

मठाच्या कक्षेत यथाशक्ति वावरायाचे झाल्यास मठाचा इतिहास व गौरवशाली परंपरेची आवश्यक माहिती गोळा करावी लागेल, असे माझ्या मनाने हेरले. त्यातही त्या स्वामीजींच्या चरणापाशी कार्यरत रहावे लागेल म्हणजे त्यांची प्रकृती, दृष्टी व विचार आदि समजून घेतले पाहिजेत. त्याशिवाय मी माझ्यावर टाकण्यात येण्याची शक्यता असलेली जबाबदारी पेलू शकणार नाही याची जाणीव मला अस्वस्थ करीत होती. अन्य कोणावरहि विसंबून बिनभरवंशाची माहिती गोळा करण्यात अर्थ नाही. शक्यतो पू. श्रीस्वामाजींकडून ती मिळाली तर तिच्या अधिकृतपणाबद्दल वा सत्यतेबद्दल संदेहाला थारा राहणार नाही. आजवरच्या अनुभवाने एवढे समजून चुकलो होतो की, कोणत्याही विषयाची खातरजमा केल्याशिवाय श्रीस्वामीजी आपल्या तोंडून त्याबद्दल अवाक्षर उच्चारणार नाहीत. पण मला हवी असलेली माहिती त्यांच्याकडून कशी मिळणार? माझ्यातील पत्रकार जागा झाला. मी मुलाखत नसली तरी अनौपचारिक वार्तालापासाठी आम्हाला स्वामीजींनी वेळ द्यावी अशी विनंती केली. श्री स्वामीजींनी ती लगेच मान्य केल्यामुळे मनावरचा ताण ओसरला.

एका सहकाऱ्यासह नियोजित वेळी मी मठात दाखल झालो व स्वामीजींशी तासभर दिलखुलास वार्तालाप केला. एका तरुण संन्याशाच्या अंतरंगाची ओळख देणारा त्या संवादाचा आशय पंचशताब्दि प्रकाशित स्मरणिकेत प्रसिद्ध करण्यात आला होता.

बालपणांत व विद्यार्थीदशेंत मठाशीं स्वामीजींचा तसा विशेष संबंध आला नव्हता. श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजींना पाहिलें होते. त्यांची थोडीफार सेवा घडली असेल. मठाचा व आपला स्वामी म्हणून संबंध कधी काळी येईल याची त्यावेळी मुळींच कल्पना नव्हती. जीवनाची दिशाच वेगळी होती. धर्मनिष्ठ व भगवंताची

उपासना करणाऱ्या आचार्य कुटुंबांत जन्मलेले श्रीमद् विद्याधिराजतीर्थ मातापित्यांचे द्वितीय पुत्र श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी आपले उत्तराधिकारी म्हणून निवड केली त्यावेळी ते कॉमर्स कॉलेजमध्ये शिकत होते. मातापित्यांनी आपला भविष्यातील आधार म्हणून पुत्राला उच्च शिक्षणार्थ महाविद्यालयांत पाठविले होते. परंतु अचानक शिष्य म्हणून त्यांची निवड केल्याचा आज्ञारायस श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी काढला व या अनपेक्षित प्रकारामुळे कुटुंबांत एकाच वेळी आनंद व अपेक्षाभंग यामुळे धूप-छाँव वातावरण निर्माण झाले. आपला पुत्र उच्च विद्याविभूषित होऊन आपल्या कुलाचे नाव उज्वल करण्याबरोबरच प्रपंचात सुखसमृद्धि आणील ही माता-पित्यांची अपेक्षा भुईसपाट झाली होती. ज्याच्यावर आपण सगळी भिस्त ठेवली तो आपला पुत्र कायमचा अंतरणार ही व्यथाहि त्यामागे होती. त्याचबरोबर स्वामीजींविषयींची आकंठ भक्ति व मठाविषयींची अतूट निष्ठा यामुळे घरच्या लोकांची मनःस्थिती द्विधा होत होती. गावच्या प्रतिष्ठित लोकांना आनंद झाला होता. यामुळे या तरुण विद्यार्थ्यांचा आयुष्यक्रम एका रात्रीत बदलला. (संन्यासाश्रम दिनः२६.०२.१९६७).

या प्रसंगी खुद्द स्वामीजींच्या मनाची कोणती अवस्था झाली असेल? "सुरुवातीच्या दिवसांत वयाची वीस वर्षे कौटुंबिक वातावरणांत व आधुनिक शिक्षण देणाऱ्या विद्यालय महाविद्यालयांत गेल्यामुळे संन्याशी जीवनाची निश्चित अशी माहिती नव्हती. अर्थात तशी सुजाणता होती; पण प्रत्यक्ष तसे जीवन आपल्या वाट्याला येईल या विधिलिखिताची कल्पना नव्हती. "स्वामीजींच्या आज्ञारायसाची वार्ता कानी पडली तेव्हा आम्ही अस्वस्थ झालो नाही वा त्याबद्दल वाईटही वाटले नाही. समाजाची वेगळ्या प्रकारे सेवा घडावी अशी स्वामीजींची इच्छा व दैवी संकेत असेल तर आपणही त्याला अनुकूल बनले पाहिजे एवढाच विचार त्यावेळी मनांत आला".

शिष्य म्हणून दीक्षा घेतल्यानंतर आरंभीचा काळ, त्यामध्ये केलेली साधना, अध्ययन, नित्यकर्मे याविषयीं स्वामीजी तपशीलवार माहिती वेळोवेळी देत असत. त्या काळांत खूप अध्ययन, मनन व चिंतन केले. पीठाधीशपदाची धुरा सांभाळण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेतले. ही साधना आजतागायत अविरत चालू आहे. संन्यास घेतल्यानंतरही प्रत्यक्ष पीठाची सूत्रे हाती घेण्यापूर्वीचा काळ व नंतरचा काळ यामध्ये खूपच भिन्नता होती. जोपर्यंत गुरु श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी होते तोवर काम करूनही प्रत्यक्ष भार नव्हता, ताण नव्हता. पण श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजी

वृन्दावनस्थ झाल्यानंतर (२५.०३.१९७३) श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींवर अचानक सबंध मठाचा भार येऊन पडला. (पीठारोहण:०५.०४.१९७३) केवळ एक मठ नव्हे, तर मठाचे भारतभर विखुरलेले अनुयायी व एकंदर समाज यांना मार्गदर्शन करण्याची मोठी जबाबदारी स्वामीजींच्या शिरावर आली. स्वामीजींनी ती किती समर्थपणे उचलली व मठाला कशी विज्ञानोन्मुख दिशा दिली, अनुयायांचे मठाकडील संबंध कसे दृढ केले ही गोष्ट सर्वपरिचित आहे. (प्रथम पंचशताब्दि व नंतर सपादशताब्दि महोत्सव सोहळ्यांत त्याचा खराखुरा साक्षात्कार घडला.) सुसूत्र दिनचर्या व कामाचा उरक यामुळे सुरवातीला ताण जरूर जाणवला. पण शिष्यवर्गातील जाणते लोक व अन्य मठाभिमानी यांचे सक्रिय सहकार्य लाभल्याने तो भार सुसह्य झाला.

मठ प्रामुख्याने एका संप्रदायाचा आहे. त्या दृष्टीने त्या समाजाची आध्यात्मिक व धार्मिक जागृती करून, त्यामध्ये मंगल व उदात्त तत्त्वांचा विकास घडवून, त्या समाजाला ऐहिक व पारमार्थिक सुखाचा मार्ग दाखविणे हे मठाचे मुख्य कार्य होय. "परंतु आजच्या परिस्थितीत कोणत्याही संप्रदायाची सुखसमृध्दि समाजाच्या अन्य घटकांपासून अलग राहून साधतां येत नाही, म्हणूनच आजूबाजूचा समाजहि सुखी असेल याची दखल मठाच्या अनुयायांनी घेतली पाहिजे," असे विचार श्रीस्वामीजींनी व्यक्त केले.

समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन करणे, तंटे व कलहाचे वातावरण उद्‌भवल्यास त्यांचे निवारण करणे आणि हे सर्व अधिक प्रभावीपणे पार पाडता यावे यासाठी वैयक्तिक साधना अखंड चालू ठेवणे हें या पीठावर बसणाऱ्यांचे जीवनकार्य आहे. स्वामीजींचे जीवन हे काही एका जागी बसण्याचे किंवा आरामाचे नसते. खुद्द स्वामीजींची घाईगर्दीची दैनंदिनी पहिली तरी याची कल्पना येऊ शकते. रोज पाच-सहा तास धार्मिक विधीत खर्च होतात. मठातील पाठशाळेवर ते जातीने देखरेख ठेवतात. श्रीक्षेत्र काशी, गोकर्ण वगैरे सुदूर ठिकाणी असलेल्या मठांच्या कक्षेतील ३०/३३ शाखा-मठांचा कारभार सुव्यवस्थित चालावा म्हणून काळजी घ्यावी लागते. जेथे जेथे मठाचे अनुयायी आहेत तेथे तेथे वेळोवेळी संचार करून त्यांच्यांतील आत्मविश्वास बळकट करावा लागतो.

ही गोष्ट श्रीस्वामीजींचा पट्टाभिषेक झाला त्या दिवसांची. त्यानंतर पंचशताब्दि सोहळ्याची पूर्वतयारी सुरू झाली व महोत्सव समितीच्या चिटणीसपदीं श्रीस्वामीनी माझी नियुक्ति केली. तेव्हापासून आजतागायत माझे श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम

मठाकडील संबंध अत्यंत निकटचे व आत्मीयतेचे बनले आहेत. उत्सव समारंभाच्या प्रसंगी असो अथवा इतर वेळी असो, पू. श्रीस्वामींचे वरचेवर दर्शन घडत असते. संगणकाशीं स्पर्धा करणारी त्यांची बुद्धिमत्ता व स्मृति, अफाट वाचन व प्रत्येक लहानसहान गोष्टीचा मागचा पुढचा संदर्भ जाणून घेण्याची तत्परता मी गेलीं तीन दशकें पहात आहें. धर्म, धार्मिकता, इतिहास, नीतिशास्त्र, अध्यात्म, समाजकारण, सांस्कृतिक परंपरा या सारख्या विषयांचा त्यांनी चिकित्सक वृत्तीने विचार केला आहेच; शिवाय आयुर्वेद, कृषिशास्त्र,वास्तू शास्त्र, वास्तू निर्मिती, अभियांत्रिकी आदि विषयहि आत्मसात केलेले आहेत. विरंगुळ्याच्या क्षणीं श्रीसान्निध्यात पोंचता आले तर त्यांच्या वाणीतून सरस्वतीचा प्रवाह निघत असल्याचा अनुभव घेतां येतो. अशी संधि मला मिळाली ही पूर्व पुण्याईच म्हणावी लागेल.

केरळ राज्यांत कायंगोळ येथे सारस्वत समूह वास्तव्य करून आहे. तेथे त्यांनी श्री विठोबाचे एक देवस्थान उभारले आहे. श्रीमद् इंदिरकान्ततीर्थ स्वामीजी एकदा दक्षिण भारतांत संचारात असताना कायंगोळ येथील कांही लोकांनी, एक तर अज्ञानांतून अथवा विघ्नसंतोषी लोकांच्या चिथावणीने, स्वामीजींचा अनादर केला असता स्वामीजींनी वैतागून गांव सोडला. सुरुवातीला कांही जाणवले नाही. पण हळूहळू लक्षांत आले की कायंगोळ मधील गौड सारस्वत कुटुंबात जन्मलेलें पुत्र संतान अल्प वयांतच मरण पावल्याने वंशवृद्धीत खंड पडत आहे. स्थानिक अष्टमंगलाने श्रीइंदिराकांततीर्थांच्या रोषाकडे निर्देश केला व त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांकडे क्षमायाचना करण्याचा सल्ला दिला. त्यावेळी श्रीमद् द्वारकानाथतीर्थ पीठावर होते. त्यांनी कायंगोळ मुक्कामी येऊन जुन्या प्रमादाबद्दल क्षमा करून समाजाला शापमुक्त करावे अशी कायंगोळवासियांनी प्रार्थना केली. श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी तेथील लोकांचें निमंत्रण स्वीकारून कायंगोळला जाण्याचा निर्णय घेतला होता. पण विधिसंकेत वेगळा असल्याने तें घडून येऊं शकलें नाहीं.

तथापि श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आपल्या गुरूंचा संकल्प पूर्ण केला. कायंगोळ येथे चातुर्मास व्रतासह सव्वाचार महिने वास्तव्य करून स्वामीजींनी तेथील शिष्यवर्गाला आनंदित केले. तांच्या मनात घर करून बसलेल्या शाप कल्पनेचे निरसन झाले आणि तेथील समाजाचे मठाकडील नाते दृढ झाले. ही हकीगत माझ्या समोरच घडलेली असल्याने तिच्या सत्यतेबद्दल शंका नाही. चमत्कार, आख्यायिका

सारख्या प्रकाराला पुष्टी मिळेल असे कोणतेही विधान करण्याचे श्रीविद्याधिराजतीर्थ कटाक्षाने टाळतात. ते धर्मनिष्ठ आहेत व धर्माचा आजच्या व्यवहारांत युक्त असा अन्वयार्थ लावण्यांत तरबेज आहेत, हे त्यांच्याशी बोलताना वेळोवेळी जाणवते. अंधश्रद्धा स्वामीजींना मान्य नाही. डोळस श्रद्धेवर त्यांचा भर आहे. त्यांची दृष्टि विज्ञाननिष्ठ आहे. विज्ञाननिष्ठ या अर्थाने की पापपुण्याच्या संकल्पनांची सत्यासत्यता बाजूला ठेवली तर समाजाच्या निकोप धारणेसाठी, माणसाच्या स्वैर मनाला लगाम घालण्यासाठी अशा कांही अमूर्त, मानवाची शक्ति व बुद्धि जेथे पोहोचूं शकत नाही अशा, संकल्पनांची गरज आहे, असे त्यांना वाटते. देवभक्तीपासून मिळणाऱ्या पुण्याचा संचय केल्याने, बँकेत केलेली बचत अडचणीच्या वेळी जशी सव्याज मिळते, तद्वत हे संचित पुण्य प्रत्येक मानवाला प्रापंचिक कटकटीच्या वेळी सावरून घेण्यासाठी उपयोगी पडते, असे ते म्हणतात.

मठाची परंपरा ५३० वर्षांची असून गेल्या चार शतकांचे कागदपत्र मठाच्या दप्तरांत आहेत. इतिहास संशोधकांकडून विविध लिपींतील व भाषातील या कागदपत्रांचा सुसंगत, तपशीलवार व तटस्थ अभ्यास अद्याप होऊं शकलेला नाही. तसा तो झाल्यास केवळ सारस्वत समाजाचाच नव्हे तर एकंदर इतिहासावर वेगळा प्रकाश पडू शकेल.

पोर्तुगीजांच्या आक्रमणामुळे गोव्यातील मंदिरे उध्वस्त झाली अशा वेळी डळमळीत झालेली समाजातील धर्मश्रद्धा पुन्हा बळकट करून लोकांच्या मनांत भक्ती जागविण्याचे व त्यांद्वारे नवी मंदिरे उभारण्यास त्यांना प्रवृत्त करण्याचे कार्य मठाने केले आणि त्याबद्दल अखिल सारस्वत समाज मठाचा ऋणी राहील. ज्यांची कुलदैवतें आज गोव्यात आहेत अशीं अनेक कुटुंबे त्या काळांत देशोधडीला लागून केरळपर्यंत विखुरलीं, त्या लोकांचा धर्मभूमीकडील संपर्क कायम ठेवण्याचे कार्यहि मठाने केले.

सपाद पंचशताब्दि साजरी केलेल्या या मठापेक्षा किंवा तितकेच प्राचीन असे अनेक मठ आहेत. आपलाच मठ श्रेष्ठ, प्राचीन अशा अहंभावाचा लवलेश देखील श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींमध्ये दिसत नाही. इतरांचा मोठेपणा कबूल करताना ते गांगरत नसतात की स्वतःचा मोठेपणा सांगताना ते फुलूनही जात नसतात. एके काळी समाज समुद्रगमन हे पाप मानून, अशांना वाळीत टाकीत असे. या सारखे प्रश्न समाजसमोर उपस्थित राहिले त्यावेळी मठाने पुढाकार घेऊन ते प्रश्न सोडविले. या घटनेच्या संदर्भात श्रीस्वामीजी म्हणाले, "या प्रश्नांचा विचार करण्यासाठी

श्रीइंदिराकांततीर्थ स्वामीजींनी वेलिंग मुक्कामी सर्व गौड सारस्वत ब्राह्मणांची एक महासभा बोलावली व त्या सभेत असे ठरले की समुद्रगमन केलेल्यांनी लाक्षणीक प्रायश्चित घेतल्यावर त्यांचा स्वीकार व्हावा. हा ठराव संप्रदायाच्या तिन्ही पीठांकडे प्रेषित करण्याचेही ठरविण्यात आले. आणि सर्वप्रथम श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधिशांनी ठराव स्वीकारून अशा लोकांस पुनीत करण्यास मान्यता दिली."

सारस्वत समाजाला आपला संदेश कोणता? असे विचारता स्वामीजी म्हणाले, "सारस्वत समाज हा पुढारलेला, विचाराने प्रगल्भ व भौतिक दृष्ट्या प्रगत असा आहे. हा समाज कर्तृत्वशाली व स्वाभिमानी आहे. यापुढे या समाजाने आपल्या शक्ति, बुद्धी, कर्तृत्वाचा उपयोग एकंदर समाजाच्या विकासासाठी केला पाहिजे. शेष समाजापासून तो अलग राहूं शकणार नाही व तसे करून चालणारही नाही. समाजाच्या अन्य घटकांना विश्वासात घेऊन त्याने त्यांच्याशी सलोखा निर्माण केला पाहिजे. यामुळे सारस्वत समाज तर विकसित होईलच, शिवाय एकंदर समाजाचे धुरीणत्व त्याच्याकडे आपोआप चालत येईल. कर्तृत्ववान, समर्थ, बुद्धिमान वर्गाकडे समाजाचे नेतृत्व असणे हे एकंदर समाजाच्या हिताचे असते."

मठाने एकंदर समाजाच्या कल्याणासाठी अनेकविध सेवा सुरू केल्या आहेत. हुबळी, मुंबई येथे वैद्यकीय सेवा सोय उपलब्ध करून देण्यात आलेली असून तिचा लाभ सर्व जाती-धर्म-पंथाच्या लोकांना मुक्तपणे घेता येतो. याशिवाय मठाच्या जनकल्याणकारी अशा अनेक योजना आहेत ज्या या पंचशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने साकारतील असा विश्वास स्वामीजींनी व्यक्त केला.

स्वामीजींच्या अंतर्मनांत डोकावून पाहता आल्यास पहावे या हेतूने आपल्या मातापित्याविषयी आज स्वामीजींच्या मनात कोणती भावना आहे व त्यांच्या दर्शनाने आज स्वामीजींना काय वाटते, ते जाणून घेण्याची आम्ही इच्छा व्यक्त केली असतां स्वामीजींनी सांगितले की, आपल्या मनांत त्यांच्या विषयीं आता शिष्यपरिवारापैकी एक या परती खास अशी कोणतीहि भावना नाही. माता स्वामीजींना नमस्कार करीत नाही व वडील समोर श्रीमद् भागवत ग्रंथ ठेवून नमस्कार करतात एवढाच काय तो फरक! आपले पूर्वाश्रमीचे मातापिता म्हणून त्यांना संस्थानांतून कांही द्यावे, त्यांचा संसारभार हलका करावा असे मनात देखील येत नसल्याचे बोलून दाखविले.

# ३. सेनापुर आचार्य घराणें

गोव्यांत ज्या वेळीं पोर्तुगिजाचें आक्रमण झालें त्यावेळी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठीं असंख्य सारस्वत कुटुंबें देशाच्या इतर सुरक्षित भागांमध्ये स्थलांतरीत झालीं. अधिकांश कुटुंबें दक्षिणेकडे कर्नाटकांत इतस्ततः विखुरलीं. अशा स्थलांतरितांमध्यें मूळ वेर्णे गांवचे रहिवासी विठ्ठल मल्ल्या यांचे सुपुत्र नारायण मल्ल्या यांचा समावेश होता. या मल्ल्या कुटुंबियांनी आपल्या विद्वत्तेच्या व कार्यकुशलतेच्या बळावर केळदी राजघराण्याचा विश्वास संपादन केला. श्री नारायण मल्ल्या हे त्या संस्थानात महसूलमंत्री पदावर अधिष्ठीत होते. कर्नाटकांत व्यंकटापूर नांवाचे एक लहानसे खेडे आहे. शिराळी जवळच्या या खेड्यांत सुमारे ३४० वर्षांपूर्वी श्री. गणपती मल्ल्या यांनी श्रीलक्ष्मी व्यंकटेश शिलाविग्रहाचे एक सुबक देवमंदिर बांधून घेतलें होतें. स्वतः श्री. गणपती मल्ल्या यांचें होनावर येथें वास्तव्य असायचें. शके १७३९ या ईश्वर संवत्सरी श्री. गणपती मल्ल्या यांचे वंशज श्री. रामचंद्र कृष्ण मल्ल्या यानी व्यंकटापूर देवस्थान श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेतील १६ वे आचार्य श्रीलक्ष्मीनाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांस मंदिराचा जमीनजुमला, दागिने-अलंकार यांसह अर्पण केलें.

या संदर्भात शार्वरी संवत्सरांत शके १५८३ मध्ये आश्विन पौर्णिमेच्या दिवशीं केळदी संस्थानिक सदाशिव नायक यांचा प्रपौत्र, संकण्ण नायक यांचा पौत्र सिद्धप्पा नायक यांचा पुत्र व्यंकटप्पा नायक यानी कूकनीर गांवातील जमीन गोकर्ण मठाला दानरूपाने दिली होती. हीं दोन्ही दानपत्रें संस्थानच्या इतिहासांत व मठाच्या दप्तरांत आहेत.

दुसरे मंदिर श्रीलक्ष्मी-व्यंकटेशाचे होन्नावर येथें सुमारे ३४० वर्षांपूर्वी श्री. रामचंद्र मल्ल्या यांनी बांधून घेतलें. शिलाविग्रह असलेल्या या मंदिरास श्री शके १५८५ (सन १६६३) शोभकृत संवत्सर, ज्येष्ठ पौर्णिमा या दिवशी सदर देवालयाच्या पूजा-अर्चा विनियोगासाठीं भद्रप्पा नायक यानी चंदावर सीमांतर्गत करीकेरे, गरणे

गांवातील वडगेरे स्थळांतील शेतीवाडीची जमीन अर्पण केली. भद्रप्पा नायक हे शिवप्पा नायक यांचे पुत्र व सिद्धप्पा नायक यांचे पौत्र होत.

मल्ल्या कुटुंबियानी कासरकोड (विंदूमाधव व विश्वेश्वर देवालय) आणि हेजमाडी (व्यंकटेश देवालय) हीं दोन देवालये बांधून सारस्वत समाजाला अर्पण केलीं. याच मालिकेंतील पांचवे व सर्वात महत्त्वाचे देवालय म्हणजे गंगोळी येथील श्रीव्यंकटेश देवालय होय. वाराही, भद्रा, शुक्ती, खेटा व चक्रा या पांच नद्यांचा गंगोळी येथे संगम होत असतो. या पुरातन गांवाचा उल्लेख पंचगंगावळी, गंगावळी, पंचाप्सरस् तीर्थ असाही इतिहासांत सापडतो.

गंगोळीचे श्रीव्यंकटेश देवस्थान श्री. मल्ल्या यानी श्रीशके १५९० (सन १६६८) मध्ये बांधून घेतलें. केळदी राजघराण्यातील सोमशेखर राजाची धर्मपत्नी चेन्नम्माजी यानी सदर देवस्थानच्या नित्य विधिविनियोगाप्रित्यर्थ शेतीवाडीची जमीन दानरूपाने देवालयाला अर्पण केली (सन १६७४). ऐतिहासिक नोंदी, ताम्रपत्रांच्या व शिलालेखांच्या आधारे ही गोष्ट स्पष्ट होते कीं, केळदी संस्थानच्या भद्रप्पा नायक राजाने इ.स. १६६२ मध्ये नारायण महाले याना देवता विनियोगासाठीं जमीन दान केली होती.

गंगोळी येथील या मल्ल्यार मठाने सारस्वत समाजाच्या इतिहासांत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. गंगोळी देवस्थान स्थापन केल्यानंतर तेथे शास्त्रसंमत पद्धतीने नित्य पूजा-अर्चा व्हावी यासाठी सुयोग्य अर्चकाचा शोध घेत संस्थापक श्री. नारायण महाले जवळच्या सेनापुर गांवातील आचार्य कुटुंबाच्या घरीं दाखल झाले. सेनापुर हें लहानसें गांव. परंतु सेनापुर आचार्य घराण्याच्या विद्वत्तेची व चारित्र्याची कीर्ती आसमंतात पसरली होती. गांवांतील तंटे-बखेडे या कुटुंबातील कर्ते पुरुष सामोपचाराने मिटवीत. अडल्या नडल्याची तत्परतेने सेवा करीत. अतिथी-अभ्यागत, साधु-संन्याशी गांवांत आले तर त्यांचा योग्य आदरसत्कार याच घराण्याकडून होत असे. धर्मशास्त्र, आयुर्वेद, ज्योतिष, आदि शास्त्रांत पारंगत असलेल्या या कुटुंबातील कर्ते पुरुष सदाचरणी व व्यवहारकुशल होते. या कुटुंबाने गंगोळी येथील श्रीव्यंकटरमण देवस्थानचा कारभार स्वीकारला तर तो सुरळीत चालेल व लोकांमध्ये धर्म व धार्मिकता, सद्सद्विवेकबुद्धि, त्याचप्रमाणे संघटन शक्ति दृढ होईल, असा विचार श्री. नारायण महाले यानी केला होता.

इतिहासाच्या पुस्तकामध्ये श्री. नारायण महाले यांनी या मंदिराचा कारभार

श्री. सेनापुर कृष्ण आचार्य यांजकडे सुपूर्द केल्याचा उल्लेख आहे. सेनापुर आचार्य घराणे कौंडिण्य गोत्री असून कालांतराने त्यांची एक शाखा गंगोळी येथे स्थायिक झाली. देवस्थानचा कारभार सुरळीत चालावा यासाठी श्री. नारायण मल्ल्या यांनी सुमारे ३२० क्विंटल तांदूळ पिकविणारी शेती व सेनापुर येथील जमीन देवस्थानाला दान करून टाकली होती. त्यांतून दैनिक पूजा-अर्चा व वार्षिक पंचपर्व सुरळीतपणे चालत असे. गंगोळी देवस्थानांतील पंचपर्वांतर्गत महापर्वणी म्हणजे वार्षिक महारथोत्सव होय. दरवर्षी फाल्गुन शुद्ध तृतीये पासून सहा दिवस हा उत्सव वैभवाने साजरा होत असतो.

ही सारी मालमत्ता समाजाची आहे आणि वहिवाट चालविणारे आपण केवळ विश्वस्त आहोंत ही भावना सेनापुर आचार्य घराण्यात दृढ होऊन बसली होती. दरम्यानच्या काळांत या मंदिराची कीर्ती सर्व भागात पसरली. श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ परंपरेंतील १६ वे स्वामी श्रीलक्ष्मीनाथतीर्थ रामेश्वर यात्रेहून परतताना सेनापुर कृष्ण आचार्य यांनी श्रीव्यंकटरमण देवस्थानात त्यांनी चार दिवस वास्तव्य करावे अशी इच्छा व्यक्त केली व स्वामीजीनीहि ती तत्काळ स्वीकारली. तेव्हांपासून गोकर्ण मठाकडील या घराण्याचे आध्यात्मिक नातें कांहीसें भावनिक बनलें.

श्रीपद्मनाभतीर्थ (१९ वे गुरुस्वामी) यानीही गंगोळी देवस्थानात पांच दिवस वास्तव्य करून सेनापुर आचार्य घराण्याचे आतिथ्य स्वीकारून संतोष व्यक्त केला होता. बसरूर येथील शाखा-मठाच्या दर्शनी भागांत दुसरा मजला उभारून घेण्यास श्री. कृष्ण आचार्य यांचे सुपुत्र श्री. बाबण आचार्य यांची देखरेख ठेवण्यासाठीं नियुक्ति करण्यात आली. श्रीइंदिराकांत तीर्थ यांनी तर सेनापुर आचार्य घराण्याकडील श्रीगोकर्ण मठाचे संबंध अधिकच जिव्हाळ्याचे व्हावे अशी इच्छा मनात बाळगून पर्तगाळी संस्कृत पाठशाळेत शिक्षण घेण्याऱ्या गोविंद आचार्य या मुलाची मनातल्या मनात आपले प्रशिष्य म्हणून निवड करून ठेवली आणि योग्य वेळी आपले पट्टशिष्य कमलनाथ तीर्थ स्वामीकडे ती व्यक्त केली.

श्रीइंदिराकांततीर्थांच्या महानिर्वाणानंतर एका महिन्याने वैशाख वद्य सप्तमी शके १८६४ (७ मे १९४२) या दिवशीं पूर्वाश्रमीच्या गोविंद आचार्य याना आश्रमदीक्षा देण्यात आली आणि त्यांचे श्रीद्वारकानाथतीर्थ असे नामाभिधान करण्यात आलें. ते चैत्र कृष्ण अष्टमी, मंगळवार दि. २७ मे १९४३ रोजीं श्रीगुरुपीठावर आरूढ झाले.

तब्बल तीस वर्षांची दैदीप्यमान कारकीर्द यशस्वीपणे चालविल्यानंतर फाल्गुन कृष्ण षष्ठी शके १८९४, रविवार दि. २५ मार्च १९७३ रोजीं ते देहमुक्त झाले. तत्पूर्वी माघ कृष्ण द्वितीया शके १८८८, दि. २६ फेब्रुवारी १९६७ रोजीं त्यानी आपल्या पूर्वाश्रमीच्या सेनापुर आचार्य घराण्यातील बटू, राघवेंद्र आचार्य याना दीक्षा देऊन त्यांचें श्रीविद्याधिराजतीर्थ असें नामकरण केलें होते.

श्री द्वारकानाथतीर्थ पीठावर असताना मे १९४५ सालीं प्रथमच गंगोळी येथे श्री व्यंकटरमण देवस्थानात वास्तव्यासाठीं गेले असतां सेनापुर आचार्य घराण्यांतील कुटुंबजनानी देवस्थानचा ताबा श्रीस्वामीजींकडे सुपूर्द केला. स्वामीजींनी स्थानिक समाजाची बैठक घेऊन देवस्थानचा कारभार चालविण्यासाठीं एक समिती नियुक्त केली. आजही त्या समितीमार्फत सदर देवस्थानचा कारभार चालविला जातो.

आज गंगोळीचें श्री व्यंकटरमण देवस्थान कर्नाटकांतील गौड सारस्वत समाजासाठीं एक श्रद्धास्थान बनून राहिलेलें असून त्यामुळें गंगोळी गांवाची कीर्ति चौफेर पसरली आहे. पंचगंगावळींत असलेल्या या देवस्थानाबद्दल सारस्वत समाजामध्ये जो आदराचा व कृतज्ञतेचा भाव वसत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे या घराण्याने त्याच दैवतांची पूजाअर्चा करून संस्कारीत झालेले दोन सुपुत्र श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाला अर्पण केले आणि उभय गुरूंच्या कारकिर्दीत मठाचा लौकिक अगणित प्रमाणात वाढून समाजांत अभूतपूर्व अशी जागृतीची लाट येऊं शकली.

४ फेब्रुवारी १९९६ रोजीं श्री विद्याधिराजतीर्थांनी देवालयाचे गर्भमंदिर, सभामंडप व तीर्थमंडप यांचा जीर्णोद्धार करून देवता प्रतिष्ठा व सुवर्णमंडित कलश स्थापन केला. याच वास्तूमध्ये श्री द्वारकानाथतीर्थ यांनी एकदां (१९६३) व श्री विद्याधिराजतीर्थ यांनी दोनदां (१९८४, १९९१) चातुर्मास व्रताचरण केलें.

# ४. बद्रिनाथ : मठाची गंगोत्री

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ या नांवाने जगभर मान्यता पावलेल्या गौड सारस्वत समाजाच्या धर्मपीठाचे मुख्यालय गोव्यात पर्तगाळ येथे असले आणि मठाच्या बिरुदावलीत गोकर्ण हें नांव सर्वप्रथम येत असले तरी त्या पीठाची गंगोत्री हिमालयातील बद्रिनाथ तीर्थस्थानांत आहे, हे अनेकांना माहीत नसेल. मठानुयायांमध्ये अनेक भ्रामक आख्यायिका प्रचलित असून त्यांची व्यवहाराशीं सांगड घालतां घालतां इतिहास संशोधक देखील गोंधळून जातात. त्यांतहि आपल्या गांवांतील मठ किंवा शाखामठ हा वैशिष्ट्यपूर्ण आहे असा दावा करताना मठानुयायी वर्गाला आनंद होत असतो. आपल्या गांवचा मठ हा अत्यंत प्राचीन असें म्हणून ते थांबत नाहींत तर तो कोणत्या संवत्सरांत स्थापन झाला. कोणत्या गुरुवर्यांच्या चरण स्पर्शाने पुनीत झाला आणि त्या परिसरांत राहणाऱ्या भक्तजनांचें देवाने रक्षण कसें केलें आदि गोष्टी मठानुयायी मोठ्या अभिमानाने ऐकवीत असतात. कांहीं जणांचा असा समज आहे कीं, श्री नारायणतीर्थ यांनी पहिला मठ स्थापन केला तो भटकळ येथें. भटकळ येथील मठ हा परशुराम भूमितील पहिला सारस्वत मठ होता, हें खरें असलें तरी श्रीमठाच्या कक्षेंतील मठवास्तूमध्यें पहिलें स्थान वारणासी येथील मठालाच द्यावे लागेल. कारण संन्यास दीक्षेनंतर तीर्थाटन करीत उडुपीला परतण्याच्या वाटेवर श्री नारायणतीर्थांनी सर्वप्रथम वारणासी क्षेत्रांत वास्तव्य केलें आनी त्या वास्तव्यांतील विशिष्ट घटनेमुळे काशी नरेशांनी एक मठवास्तू श्री नारायण तीर्थांना अर्पण केली. या घटनेचा तपशील इतरत्र आला आहेच.

उडुपीला परतल्यावर फलिमारू मठाचे मुख्य स्वामी सुखरूप परतल्याचें आढळलें. इतकेंच नव्हे, तर सारस्वत ज्ञातीतील एका बटूला फलिमारू मठाधीशांनी संन्यासदीक्षा दिलेली असली तरी उत्तराधिकारी म्हणून आम्हाला ते मान्य नसतील अशी भूमिका फलिमारू मठाच्या अनुयायांनी घेतली. एकंदर परिस्थितीचा अंदाज देऊन फलिमारू

मठाधीशांनी श्री नारायणतीर्थांना असा सल्ला दिला की त्यांनी अपरान्तमधील सारस्वत भूमीतच स्वीय समाजामध्ये धर्मप्रचाराचे कार्य करावे. गुरुंची आज्ञा शिरोधार्य मानून श्री नारायण तीर्थ भटकळ येथे दाखल झाले. दाक्षिणात्य सारस्वतांचीं बरीचशीं कुटुंबें त्या काळीं भटकळ येथे स्थायिक झालीं होतीं. सर्वांचीं कुलदैवतें गोव्यात होतीं आणि गोवा आणि कर्नाटकांतील किनारी भागांतील दोन्ही जिल्हे सलग होते. प्रदेश भिन्न भिन्न राजांच्या अधिसत्तेखाली असला तरी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक व्यवहार देखील सुरळीत चालले होते. आपल्या समाजांतील एक तरुण संन्यासी बनून आपल्या गांवांत दाखल झाला आहे त्याचा योग्य मानसन्मान करावा असा स्थानिक सारस्वतांनी विचार केला आणि त्यांनी त्यांचे यथोचित आगत-स्वागत केलें.

भटकळ मुक्कामांतच ग्रामस्थांनी एक मठवास्तू बांधून आपल्या धर्मगुरूना अर्पण करण्याचे ठरविले आणि यथासंभव देशाटन केलें तरी श्री नारायणतीर्थांचा मुक्काम प्रामुख्याने भटकळ येथेच राहिला. तेथून त्यांनी उत्तरेस गोवा वा पलिकडे आणि दक्षिणेस मंगळूरपर्यंत संपर्क साधून समाजाच्या पुनर्रचनेची आपली कल्पना त्यांना विदीत केली. त्यांतूनच साऱ्या प्रदेशांत ठिकठिकाणी श्रीस्वामीजी संचारार्थ गेल्यावेळीं त्यांच्या वास्तव्याची व्यवस्था व्हावी आणि त्यांच्या समवेत येणाऱ्या अर्चक व इतर मदतनीसांच्या निवासासाठीं एखादी स्वतंत्र जागा असावी, जेणेकरून गृहस्थ मंडळीच्या घरांत व्रतनिष्ठ संन्याशाची गैरसोय होऊं नये ही भावना उफाळून आली. परंतु श्री नारायणतीर्थांच्या कारकिर्दीत त्या दृष्टीने पुढचीं पावलें उचलण्या इतपत जागृति किंवा संघटन शक्ति समाजामध्ये निर्माण झाली नव्हती. शेष सारे आयुष्य त्यांनी भटकळ येथील गोपीनाथ नदीतटीं देवस्मरण व समाजहिता बद्दल चिंतन-मनन करीत त्या बाजूने गेलेल्या शिष्यपरिवाराला मार्गदर्शन करीत आनंदाने घालविले. परंपरा निर्माण करावयाची होती म्हणून त्यांनी अनुरूप शिष्याची निवड केली आणि मठपरंपरा अबाधित ठेवण्याची सूचना करून देहमुक्ति मिळविली.

गोकर्ण येथील मठाच्या स्थापनेची कथा आगळी वेगळी आहे. दक्षिण भारतांतील एक लोकमान्यता प्राप्त केलेले प्रमुख तीर्थस्थान असल्याने आणि अपरान्त मधील लोकांच्या दृष्टीने तेथे जाणे-येणे सुलभ असल्याने सारस्वत समाजाच्या लोकांची तेथे मोठ्या प्रमाणावर ये-जा होती. श्रीमठ परंपरेचे तिसरे स्वामी श्री जीवोत्तमतीर्थ यांनी



श्री द्वारकानाथतीर्थ स्वामीजी व शिष्य श्री विद्याधिराजतीर्थ

गंडकी यात्रेहून परतताना आणलेल्या श्रीविठ्ठलाच्या तीन मूर्तीं पैकीं एक मूर्ती गोकर्ण येथें मठ बांधून तिथे प्रतिष्ठीत केली. भूविजय विठ्ठल हे त्या दैवताचे नांव श्री जीवोत्तमतीर्थांनीच दिलें. मठाची भूमि दुसरे लोक गिळंकृत करू पहात असतानाच ती परत मिळविण्याचे काम या विठ्ठलाच्या कृपेने झाले अशी सर्वांची भावना आहे. म्हणून हा भू-विजय विठ्ठल. गोकर्ण मठ हा परंपरेंतील तिसरा मठ आहे. गोकर्णहून पर्तगाळ दरमान्य आणखी दोन मठ स्थापन झाले, त्यापैकी चौथ्या क्रमांकाचा श्री जीवोत्तमतीर्थ यांच्या जन्मगांवचा बसरूर मठ होय.

पर्तगाळमधील मठाची स्थापना श्रीमठाचे सहावे स्वामी श्री रामचंद्रतीर्थ यांनी इ.स. १६५६ मध्ये एक प्रकारे दैवी आदेशानेच केली. मठाच्या नामावलींत या मठाला ठळक स्थान मिळालें व नंतर मठपरंपरेचे ते मुख्यालय ठरले. वस्तुतः गोव्याच्या दक्षिण भागांत, सह्याद्रिच्या कुशीत, घनदाट वनामध्यें हा मठ उभारण्याची कल्पना ज्यांना सुचली असेल ते खऱ्या अर्थाने आध्यात्मिक वृत्तीचे, ध्यान, मनन चिंतनात रत रहाणारे आचार्य असावेत. या वनातील एकांत, संथ वाहणारी कुशावती नदी नेमकी ज्या ठिकाणी ईशान्यप्लवा झाली तिथे हा मठ उभारण्यात आला. जवळच ऐतिहासिक वटवृक्ष आहे. आख्यायिका अशी आहे की श्री परशुराम, श्री मध्वाचार्य, श्री जीवोत्तमतीर्थ व परंपरेंतील इतर स्वामीजींनी व ऋषि-मुनींनी गोमन्त यात्रेच्या वेळी पर्तगाळ येथील वटवृक्षाच्या छायेंत विसावा घेतला होता, कुशावती तीर्थात स्नान केले होतें आणि परशुराम मंदिरांत पूजा प्रार्थना करून पुढील यात्रेस ते निघाले होते. श्री जीवोत्तमतीर्थांनी या ठिकाणी मठ बांधण्याचा संकल्प केला होता, पण त्या परिव्राजकाच्या कार्यकालांत ती कल्पना साकारू शकली नाहीं. जागा कितीही सुंदर असली, अध्यात्मिक साधनेसाठीं अनुरूप असली, तरी लोकवस्ती पासून दूर मठ बांधण्याच्या कल्पनेला समाजाकडून थंडा प्रतिसाद मिळाला. पण एका पुण्यवंत विचारवंताच्या मनांत उपजलेली ही कल्पना! ती निर्फळ बनण्याचा प्रश्नच नव्हता.

श्री जीवोत्तमतीर्थांचे प्रशिष्य श्री अणुजीवोत्तमतीर्थ यांनी आजच्या गोवा राज्याच्या हद्दींतील पहिला मठ डिचोली येथें बांधला, जो परंपरेतील पांचवा मठ होय. आणि त्यानंतर परंपरेचे सहावे स्वामी श्री रामचंद्रतीर्थ यांचा गोकर्ण येथे मुक्काम असताना, श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमंत या देवतांचे विग्रह त्यांना भूमी-उत्खननाच्या

वेळीं प्राप्त झाले. दैवी प्रेरणेनेच राम, सीता, लक्ष्मणाच्या प्रतिमा पर्तगाळ येथील व हनुमंताची मूर्ति रिवण येथे प्रतिष्ठीत झाल्या. त्या दृष्टीने पर्तगाळ मठ हा तीनशे पन्नास वर्षां पूर्वींचा; पण त्या मठाच्या स्थापने नंतर संप्रदायाचा तो प्रमुख मठ बनला. बिरुदावलींत श्री जीवोत्तमतीर्थ यांचे नांव मठ परंपरेने व शिष्य परिवाराने आग्रहपूर्वक दाखल करून घेतले त्याचे कारण उघड आहे. भूतलावरील वैकुंठ म्हणून मान्यता पावलेल्या शालिग्राम क्षेत्र गंडकी नदीच्या सान्निध्यांत श्रीदामोदर कुंडापर्यंत पायी चालत जाऊन आलेले ते एक आदर्श संन्यासी होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे ते विमानांत बसून सदेह वैकुंठाला गेले अशी आख्यायिका आहे. त्यावरून लोकमानसांतील त्यांच्या प्रतिमेची कल्पना येते. कर्नाटकांत, विशेषतः अष्टमठांमध्ये आपल्या मठाला जीवोत्तम मठ या नावानेच ओळखतात आणि श्री जीवोत्तमतीर्थांच्या देवभक्तीचा, आध्यात्मिक शक्तीचा, धर्मशास्त्राच्या ज्ञानाचा मोठ्या आदराने उल्लेख करतात. सारे लोक आपणास श्री जीवोत्तमतीर्थांचे अनुयायी म्हणून मान देत आहेत तेव्हां अशा गुरुश्रेष्ठाचे नांव मठाच्या नांवात राहिले तर सर्व दृष्टीने ते उचित व सोयीस्कर ठरेल या विचाराने मठाचे नांव घडविण्यांत आलें.

मुख्य गोष्ट सांगायची राहून गेली. गोमुख किंवा गंगोत्री हे जसे गंगेचें मूळ मानलें जाते तद्वत, बद्रिनाथ येथे अलकनंदेच्या तटावर उभ्या असलेल्या श्री लक्ष्मीनारायणाच्या सान्निध्यांत संन्यास दीक्षा घेऊन नवा मठ उभारण्याचा संकल्प श्री नारायणतीर्थांनी केला होता. श्री लक्ष्मीनारायणाच्या कृपेनेच गंगेचा प्रवाह जसा लोकसेवा करीत, अविश्रांत गतीने वाटेंतील व्यत्यय अडथळे यांना तोंड देत आणि इतर लहान मोठे नाले, नद्या, उपनद्या, इतकेच नव्हे तर शहरांतील सांडपाणी देखील आपल्या प्रवाहात सामावून घेऊन सागराशी संगम पावतो, त्याच पद्धतीने गेल्या पांच शतकांत या मठाची वाटचाल अव्याहत चालू आहे. म्हणूनच गोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम या तीन नांवा बरोबर बद्रिनाथचें नांवही घेणे अप्रस्तुत ठरलें नसतें. पण प्रत्येक क्षेत्राचें महत्त्व व महात्म्य त्या ठिकाणाच्या मठशाखेमध्ये अनुस्यूत असल्याने त्यांचा निराळा उल्लेख आवश्यक नसावा.

श्री नारायणतीर्थांनी संन्यास दीक्षा घेऊन सारस्वत समाजांत जागृति करण्याचें काम सुरू केलें त्यावेळीं भटकळ येथें कांहीं सारस्वत कुटुंबें स्थायिक झालीं होतीं, हा उल्लेख वर आला आहेच. सामान्यपणे आपण असें मानतों कीं दक्षिणात्य सारस्वतांचें

मूळ पीठ गोमंतकांत असून त्याच परिसरांत त्यांचीं कुलदैवतें आहेत. १५१० सालीं गोवा पोर्तुगीजांनी काबीज केला त्यावेळीं गोव्यांत सारस्वत समाज हा प्रमुख समाज होता. धर्म, अध्यात्म, साहित्य, संगीत, कला, व्यापार-व्यवसाय आदि बाबतींत तो अत्यंत पुढारलेला होता. १५६० सालीं पोर्तुगीज राज्यकर्त्यांची दानत बिघडली आणि आमिषें दाखवून सारस्वत समाजाचें ख्रिस्तीकरण करण्याचा डाव त्यांनी रचला. या समाजाने संघटीतपणे राज्यकर्त्यांचे व परधर्मियांचे मनसुबे उधळून लावले तेव्हां संतप्त व विकारवश होऊन बेफाम झालेल्या राज्यकर्त्यांनी व अधर्मी लोकांनी बळजबरी व धाकदपटशा, मारहाण व छळ या सारख्या अमानुष तंत्राचा अवलंब करून उच्छाद मांडला. येशूच्या नांवाने त्यांनी अधर्माचा आश्रय घेतला आणि मानवतेला कलंक फासला. त्या काळांत अनेक सारस्वत कुटुंबें शक्य होईल तिथे सुरक्षित स्थानी स्थलांतरित झालीं. निर्वासितांचा तो प्रचंड लोंढा होता. परंतु गोव्याच्या सरहद्दी पलिकडे उत्तर व दक्षिण, दोन्ही दिशांनी किनार पट्टीवर स्थायिक झालेलीं सारीं कुटुंबे सोळाव्या शतकांत धर्म-संस्कृतीच्या रक्षणासाठीं गोवा सोडलेल्या कुटुंबांपैकीं नव्हेत. राजकीय छळामुळें गोमंतकीय सारस्वतांनी वरचेवर स्थलांतरें केलीं. इतिहासांतील नोंदीप्रमाणें इ.स. १२९४ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्याने अपरान्तांत प्रवेश केला व आगळिका सुरू केल्या, तेव्हा बरीचशी कुटुंबें सागरमार्गे पश्चिम किनाऱ्यावर ठिकठिकाणी थेट कोचीनपर्यंत आश्रय घेतीं झालीं. पण राजकीय जांच व कांच हींच सारस्वत समाजाच्या स्थलांतराचीं मुख्य कारणें नव्हेत. अनेक सारस्वत कुटुंबें आपल्या प्रतिभेला अनुरूप क्षेत्र निवडण्यासाठीं, राजदरबारांतील मानाचीं पदें मिळविण्यासाठीं, व्यापार-उद्योगाचीं नवीं क्षेत्रें धुंडाळण्यासाठीं वेगवेगळ्या राज्यांमध्ये जाऊन स्थायिक झालीं. जिथे जिथे तीं गेलीं, तेथील समाज जीवनावर त्यांनी आपल्या निर्मळ-सुंदर प्रतिमेचा खोल ठसा उमटवून ठेवला. विविध भागांतील त्यांची उपस्थिती पुढें सोळाव्या शतकांत देशोधडीला लागलेल्या गोमंतकीय सारस्वत समाजाला उपकारकठरली.

इतस्ततः विखुरलेला सारस्वत समाज हा आज जागतिक आकाशांत गरुडभरारी मारीत आहे. देशाच्या सर्व भागामध्यें आणि विदेशांत अनेक देशांमध्ये त्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणि पुरुषार्थाने, बुध्दिमत्ता व सदाचाराने, नम्रता व सत्यनिष्ठेने आणि विशेष म्हणजे सारस्वत परंपरेशी सुसंगत अशा धर्माचरणाने स्थानिक समाजाच्या हृदयांत स्थान व मान मिळविलेला आहे. घर-दार, जमीन-जुमला, इभ्रत व मालमत्ता

डोळ्यादेखत लुटली जात आहे, संकटकाळी जेथे आश्रय मागावा तीं देवमंदिरे जमीन दोस्त होत आहेत, सुसभ्य, सुसंस्कृत, सुसंघटीत व सर्वांची मने जिंकलेला समाज विघटीत होऊन कफल्लक अवस्थेंत परकी मुलुखांत जाऊन राहतो, तेव्हा तो पुन्हा संघटीत होण्याची, आपली अस्मिता सांभाळण्याची शक्यता नसते. पण फिनिक्स पक्षाप्रमाणे आपल्या राखेतून नवा अवतार घेण्याची क्षमता या समाजाने दाखविली. आकाशांत स्वच्छंद उडताना देखील पतंगाच्या दोरीचे एक टोंक जसे तो उडविणाऱ्या माणसाच्या हातांत दृढ असतें, तसें या समाजाचे निष्ठावंत सदस्य गुरुपीठ व कुलदेवतांशीं संलग्न आहेत. यामुळे विजनवासांतहि तो समाज आपल्या परंपरेच्या मर्यादांचें पालन करून स्वत्व व स्वाभिमानाचें रक्षण करूं शकला. या समाजाचें वैशिष्ट्य काय? असा विचार करतां असे दिसून येतें कीं इतर समाजामध्यें असलेले सारे सद्‌गुण व दुर्गुणहि सारस्वत समाजांत आहेत. परंतु दोन अद्‌भुत शक्ती-कुलदैवत व गुरुपीठ- या समाजावर इतका जबरदस्त प्रभाव टाकतात की तो मूळ पीठाकडे बांधलेला राहतो.

हा सारा इतिहास समाजाच्या भूगोलाशी निगडीत आहे. पण सारस्वत समाजाच्या भुगोला बद्दल किंबहुना पश्चिम भारतातील आद्य वसाहतीं बद्दल अनेक संभ्रम असलेले आपण पहातों. महाभारत व पुराणाच्या काळांत गोमन्त व गोवापुरी या नांवाने ओळखला जाणारा प्रदेश व पोर्तुगीजांनी काबीज केलेले गोवा शहर यांतील तफावत नजरेंत भरते. पण आपण एवढे निश्चितपणे म्हणू शकतों की पुराणांतील परशुरामाने वसविलेल्या प्रदेशामध्ये सप्त कोंकणांतील महासप्तम ही सारस्वतांची आद्य भूमी होती. पोर्तुगीजांनी काबीज केला तो प्रदेश गोवा या नांवाने ओळखला जाऊ लागला आणि महासप्तमाचा तो मध्य भाग असल्याने गोमंत भूमीच्या सीमा तेवढ्याच तोकड्या आहेत असें जग मानूं लागलें.

# ५. पंचशताब्दि महोत्सव

गोव्यांत आणि देशांत सर्वत्र इतिहासवशात् विखुरल्या गेलेल्या सारस्वत समाजाच्या अस्मितेचा व एकतेचा प्राणरक्षक मानदंड असें ज्याला सार्थपणे संबोधतां येईल त्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचा पंचशताब्दि महोत्सव १९७७ मध्ये साजरा झाला, ही अतीव आनंदाची व समाधानाची बाब म्हणतां येईल, समाधान अशासाठीं कीं, एका समाजाच्या संधारणाचे व संघटनाचें कार्य संतत पांच शतकें यशस्वीपणें पार पाडून तो समाज अधिकाधिक ऊर्जस्वल बनविण्याऱ्या मठाच्या यशोगाथेचें हें संकीर्तन होते. आणि आनंद अशासाठीं कीं, असा हा अपूर्व सोहळा घडवून आणण्याचें व त्यांत सहभागी होण्याचें भाग्य मठानुयायांना लाभलें. हा सोहळा स्वतंत्र गोव्यांत साजरा झाला, हाही एक विशेष होय. श्रीमठाच्या इतिहासांत यापूर्वी महत्त्वाचे टप्पे आले नाहींत असें नव्हे. पण त्या टप्प्याचें कायम स्मरण राहावें, इतिहासांत त्यांची कायमची नोंद राहावी अशा दृष्टीनें त्यांना सोहळ्याचें रूप देणें पारतंत्र्यामुळें शक्य झालें नसतें. पांच शतकांची गौरवशाली परंपरा असलेला असा हा मठ आहे. मठाची पंचशताब्दि साजरी करण्यामागील हेतु आत्मप्रौढीचा नव्हता. मठाला तशा गोष्टींची गरजहि नाहीं. कारण कसल्याहि प्रकारची जाहिरातबाजी वा प्रचार न करतां गेलीं पांच शतकें मठानें आपलें अंगिकृत कार्य अखंडितपणें चालविलें आहे. हें कार्य केवळ शिष्यपरिवारालाच नव्हे, तर इतरांनाही ज्ञात आहे. आणि सर्वांनाच ह्या कार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेणें भाग पडलेलें आहे.

श्रीमठाला तेवीस स्वामींची अखंडित परंपरा लाभली आहे आणि या स्वामींनीं अक्षरशः आसेतु हिमाचल पुण्यसंचार करून धर्म व अध्यात्म यांचा प्रचार व प्रसार केला, अनेक अस्वस्थ मनांना दिलासा दिला.

पंचशताब्दि महोत्सवाचा एक भाग म्हणून पर्तगाळी विकास योजनेचा शुभारंभ करण्यासाठी चैत्र शुद्ध द्वितीया शके १८९९, दिनांक २१ मार्च १९७७ हा दिवस निश्चित करण्यांत आला. ह्या दिवसाचें महात्म्य मठाच्या व मठानुयायांच्या दृष्टीनें

आगळेच आहे. त्या दिवशीं श्रीमठ संस्थापनेस ठीक ५०२ वर्षे पूर्ण झालीं होतीं. त्या दिवशीं ५०२ वर्षांपूर्वी फलिमारु मठाधीश (उडपी) श्रीरामचंद्रतीर्थ बदरिकाश्रमांत गेल्यावेळीं समवेत असलेल्या माधव नामक अत्यंत चाणाक्ष, हुशार व कुलशीलसंपन्न अशा ब्रह्मचाऱ्यास संन्यासाश्रम देऊन श्रीमन्नारायणतीर्थ नामाभिधान बहाल केलें आणि श्रीवीर रामचंद्राची मूर्ती त्यांच्या स्वाधीन करून पश्चिम भारतात धर्मोपदेशासाठीं प्रेषित केलें. हेच श्रीनारायणतीर्थ स्वामी महाराज प्रस्तुत मठाचे संस्थापक होत. विशेष योगायोग हा कीं शालिवाहन शकाच्या तिथीनुसार मठाचे विद्यमान स्वामीजी श्रीमत् विद्याधिराजतीर्थ यांच्या गुरुपीठारोहणाची तिथीही चैत्र शुद्ध द्वितीया हीच आहे. त्यामुळें मठानुयायांच्या दृष्टीने हा दिवस, एक प्रकारें कपिलाषष्ठीचा योग ठरला.

मठाची स्थापना झाली त्या सुमारास भारताचा पश्चिम भाग इतिहासाच्या दुर्दैवी फेऱ्यांत सांपडला होता. खुद्द गोव्यांत पोर्तुगीज अधिसत्ता प्रस्थापित होऊन त्यांनीं ख्रिस्तीकरणाचें सत्र आरंभिलें आणि अनेक लोक धर्म व संस्कृतिरक्षणासाठीं आपापल्या कुलदेवांचे स्मारक घेऊन सुदूर प्रदेशांत जाऊन राहिले. सामान्यपणें वेगळ्या वंशाच्या व भाषेच्या वातावरणांत नव्यानेंच स्थायिक होणारे लोक एक-दोन शतकें कशाला, एक-दोन पिढ्या उलटल्या कीं आपल्या मूळ व्यक्तिमत्वाचा विसर पडून तेथील समाजजीवनाच्या अंवतीभंवतीच्या परिसराचा भाग बनतात. पण सारस्वत समाजाच्या बाबतींत अशी गोष्ट घडली नाहीं. आपली मूळ भूमि सोडून अनेक शतकें उलटल्यानंतरहि त्यांनी आपलें स्वतंत्र व्यक्तित्व, स्वभाव, स्वसंस्कृति व स्वपरंपरा राखिली आहे, याचें श्रेय समाजाच्या अंगभूत प्रकृतीला जसें जातें तसेंच, किंबहुना त्याहून अधिक प्रमाणांत, स्वामींचा यासाठीं महत्त्वाचा हातभार लागला आहे.

पर्तगाळी मठाच्या स्वामींनी जेव्हां जेव्हां संधि मिळाली तेव्हां तेव्हां जेथें जेथें शिष्यपरिवार पोहोंचला आहे तेथें तेथें जाऊन धर्म व संस्कृतीचा प्रचार व प्रसार केला आणि मठानुयायांना एकत्र ठेवणारा निष्ठातंतु बळकट बनविण्याचें महाकार्य पार पाडलें. मठानुयायांचे वैयक्तिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास व त्यांना एकसंघ राखण्यास मदत केली. परंतु मठाधिपतींनी हें कार्य कितीहि निष्ठापूर्वक चालविलें तरी ऐतिहासिक कारणांसाठीं त्यावर मर्यादा पडत होती. कारण मुख्य मठ व बहुसंख्य शिष्यपरिवार जेथें होता तो गोवा पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं पारतंत्र्यांत दिवस

कंठीत होता. तर मठानुयायी गोव्याबाहेर जेथें वास्तव्य करून होते ते प्रदेश विभिन्न व्यवस्थेखालीं विभागले गेले. परिणामीं मठाच्या शिष्यपरिवारांमधील आपसांतील संपर्क खंडित झाला. समाजाचे एका अर्थाने परस्परांना एकत्र ठेवणारे धागेच तुटले व त्यांचा गुंता झाला. मात्र गुंत्यांत अडकलेल्या या धाग्यांचें एक टोंक दृढपणें मठाकडे जोडलेले राहिलें आणि म्हणूनच परस्परांशीं संपर्क तुटूनहि शिष्यपरिवाराची निष्ठा मठाशीं दृढपणें बद्ध राहिली.

भारत पूर्वीच स्वतंत्र झाला होता. गोवाहि मुक्त झाला, अशा वेळीं मठाकडे दृढपणें बद्ध असलेल्या निष्ठेच्या धाग्याचा मागोवा घेत, त्याचीं टोकें जमवून तीं नव्यानें एकत्र जोडून एक सलग धागा पुन्हा बनविण्याचा प्रयत्न म्हणून मठाचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचें ठरलें. पोर्तुगीज राजवटींत गोव्यांत खूपच धार्मिक छळ झाला. देवालयें उद्ध्वस्त झालीं. समाज भंगला. पण पर्तगाळी मठाच्या शिष्य परिवारांत बसत असलेल्या सुप्त अंशाला फुंकर घालून मठानेच तो प्रज्वलित केला. सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे अनेक प्रश्न निर्माण झाले. ते स्वामींच्या आज्ञेनें व हस्तेक्षेपानें सामोपचारानें मिटविले गेले. संस्कृतीला धोका निर्माण झाला असतां मंदिरांची पुन्हा प्रस्थापना करवून नव्याने संस्कृति विकसित करण्याचें कार्य मठानें केलें. जें गोव्यात घडलें तेंच इतर राज्यांतहि घडलें आणि म्हणूनच केरळसारख्या सुदूर प्रदेशांतही सारस्वत समाज एक लहानसें मंदिर उभारून एकोप्यानें राहूं शकला व त्याने गोव्याशीं भावनिक संबंध कायम ठेवला.

मठाचे विद्यमान स्वामीजी श्रीमत् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनामुळेंच मठाची पंचशताब्दि साजरी करण्याचा योग निर्माण झाला. श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांची दिव्यदृष्टि, शिष्यपरिवाराला संघटित करून राष्ट्र व समाज कार्यासाठी अधिक प्रवण करण्याची प्रामाणिक तळमळ आणि मठाचीं सूत्रें हातीं आल्यापासून त्यांनी त्या दिशेनें चालविलेले योजनाबद्ध प्रयत्न यांचाच परिणाम म्हणून हा पंचशताब्दि महोत्सव घडून आला. स्वामीजींचा धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म व वेदान्त यांचा अभ्यास तर सखोल आहेच पण त्याचबरोबर आधुनिक विज्ञान, समाजशास्त्र, इतिहास आदि विषयांच्या चिकित्सक परिशीलनाची जोड त्यांच्या उपजत अभिजात प्रज्ञेला लाभलेली असल्यामुळें, त्यांच्या कार्यकालांत अल्पावधीत मठाची प्रतिष्ठा व शिष्यपरिवाराचा माथा उन्नत बनला आहे आणि

शिष्यवर्ग मठाकडे अधिक विश्वासानें व भविष्यविषयींच्या अतूट श्रद्धेनें आकृष्ट झाला आहे.

मठाचा पंचशताब्दि महोत्सव, साजरा करताना विशिष्ट उद्दिष्टें नजरेसमोर ठेवून तीं साध्य करण्याच्या दृष्टीनें एक महोत्सव समिती स्थापण्यात आली. शिष्यपरिवारा मधील मध्यंतरीच्या काळांत तुटलेले धागे पुन्हा जुळविण्याचें महत्त्वाचें कार्य होतें. दिनांक ८, ९ व १० एप्रिल १९७७ असे तीन दिवस पर्तगाळी येथें शिष्यपरिवाराचें एक स्नेहसंमेलन घडवून आणण्यांत आलें. स्नेहसंमेलनाच्या निमित्तानें देशांत सर्वत्र विखुरलेल्या शिष्यपरिवाराला परस्पर परिचय व कुलदेवतांचें दर्शन घडावें हा या नियोजित संमेलनाचा मुख्य उद्देश असला तरी तो एकमेव हेतु नव्हता. या स्नेहसंमेलना द्वारें समाजाचे प्रश्न समजून घेण्याचा समितीचा प्रयत्न राहिला. वास्तव्य-प्रदेशा प्रमाणें शिष्यपरिवाराचे प्रश्न भिन्न आहेत. ते सोडविण्याची एखादी कायम व्यवस्था करण्याच्या दृष्टीने या स्नेहसंमेलनांत एक विचार विनिमय झाला. खुल्या अधिवेशनानें या स्नेहसंमेलनाची सांगता झाली. आणि यांत सहभागी होणारा प्रत्येक मठानुयायी नव्या प्रेरणा, शक्ति व उत्साह बरोबर घेऊन परतला.

पंचशताब्दि महोत्सवाचा भाग म्हणून ज्या अनेक योजना आंखण्यात आल्या, त्यांत जीर्ण मठांच्या जीर्णोद्धाराचा समावेश आहे. या योजनेंत गंगातटीं असलेल्या आद्य मठाचा जीर्णोद्धार व देव-प्रतिष्ठा या सारखीं कार्ये महोत्सव सोहळ्याआधींच पार पडलीं होतीं. त्याचप्रमाणें पर्तगाळी मठवास्तूच्या जीर्णोद्धाराची योजनाहि आंखण्यांत आली. पर्तगाळी मठ हें अध्यात्म व संस्कृतीचें केंद्र व्हावें या दृष्टीनें आंखलेली ही बृहद्‌योजना साकारल्यानंतर कार्यक्रमासाठीं विशाल सभागार, धार्मिक विधिव्यवस्था आणि अन्य सुविधा उपलब्ध होतील. पर्तगाळी येथें एक संस्कृत विद्यापीठ स्थापण्याची योजना विचारांत असून हे सर्व कार्यक्रम व योजना टप्प्याटप्प्यानें हातीं घ्यावयाच्या आहेत.

हीं सर्व कार्यें असलीं तरी मुख्य कार्य विखंड झालेल्या समाजाला अखंड बनविण्याचें आहे. समाज अखंड बनविण्याचा प्रयत्न खूप अंशीं भौतिक असला तरी सामाजिक व आर्थिक गरजेंतून तशी आवश्यकता निर्माण झाली आहे. समाजाचा एक वर्ग सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास राहिला तर समाजाला स्वास्थ्य लाभत नाहीं. तसेंच एका संप्रदायाचे लोक पुढारलेले व अन्य घटक मागासले राहिले तर समाजाचा निकोप विकास होत नाहीं. हा

सर्व असमतोल दूर करणें हाही मठाचा प्रयत्न राहील. त्यासाठीं शिष्यपरिवार प्रथम संघटित करून त्यांचे प्रश्न सोडवितानाच सभोवतालच्या अन्य समाजाच्या उद्धरणासाठीं मदतीचा हात देणें हा मठाचा यापुढील कार्याचा भाग राहील. कारण शिष्यपरिवारा बरोबरच अन्य समाजहि समस्यामुक्त झाला पाहिजे. त्यांतच शिष्यपरिवाराचें हित आहे अशी मठाची मनोमन धारणा आहे. पुंजक्या पुंजक्यानी विकास व समृद्धी येऊन सभोवतालचा परिसर वैराण वाळवंटासम राहिला तर वाळवंट त्या समृद्धीच्या हिरवळीला ग्रासून टाकण्याचा धोका संभवतो. या मागें मठाचा अभिनिवेश वा वृथा अभिमान नाहीं. मठानुयायांची मनोमन धारणा आहे कीं राष्ट्रीय एकात्मतेचा आरंभ समाजांतील वेगवेगळ्या घटकांमध्ये एकात्मता विकसित करूनच होऊं शकतो. मठाच्या यापुढील प्रत्येक योजना व कार्यक्रमा मागील उद्देश व दिशा या राहातील. पंचशताब्दि महोत्सव समितीनें हें नवें अंगिकृत कार्य पार पाडण्यासाठीं आणि स्वतःबरोबरच एकंदर समाज आर्थिक दृष्ट्या समृद्ध वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ, समाधानाच्या दृष्टीनें परिपूर्ण व सांस्कृतिक दृष्ट्या उन्नत बनविण्यासाठीं स्वयंसेवी वृत्तीने पुढें यावें आणि त्या दृष्टीनें संकल्पबद्ध होऊन नवीन प्रेरणा, चेतना व उज्ज्वल भविष्याची दृढ आशा शिदोरी गांठीशी बांधून कार्यप्रवण होण्याचा संकल्प करून संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

❁

पंचशताब्दि महोत्सव हा पांच शतकांपर्यंत चाललेल्या समाज विघटनेची प्रक्रिया बदलून समाज संघटनेच्या कार्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ ठरला. पंचशताब्दि महोत्सव हा दुरावलेल्या बांधवांच्या स्नेहमीलनाचा सोहळा होता. अनेक हरवलेलीं नातीं पुन्हा गवसलीं आणि सारस्वत समाजाच्या एकात्मतेची आवश्यकता तीव्रतेने जाणवूं लागली. इतिहासाला कलाटणी देणारा हा क्षण परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ ह्यांच्या प्रेरणादायी कृपाशिर्वादानेच अवतरला. त्या क्षणाची एक चिरस्मृति रहावी या दृष्टीने मठानुदायी वर्गाने एक पुरस्काराची योजना आंखली. कोणत्याहि क्षेत्रांत मानवतेची उत्तम सेवा केलेल्या व्यक्तीला चैत्र शुक्ल द्वितियेला (श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींच्या गुरुपीठारोहणाच्या

तिथीला) पर्तगाळ मठांत हा पुरस्कार प्रदान करण्यांत येतो. रोख रुपये पंधरा हजार, पुरातन वटवृक्षाची प्रतिकृति आणि मानपत्र या स्वरूपांत हा पुरस्कार दिला जातो.

ज्या ईशान्यप्लवा कुशावती नदीच्या किनाऱ्यावर श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची प्राचीन वास्तू उभी आहे, तेथून सुमारे दोनशें मीटर उत्तरेकडे एक पुरातन वटवृक्ष आहे. त्या परिसराला ब्रह्मस्थान असें संबोधतात. प्राचीन काळीं पैंगी ऋषीचें तें तपस्याक्षेत्र होतें असें मानलें जातें. या वटवृक्षाला सुमारे दोनशें वीस पारंब्या असून त्याचा पूर्व-पश्चिम विस्तार सुमारे २३५ फूट पसरलेला आहे व उत्तरेकडून दक्षिणेकडे तो वटवृक्ष सुमारे २२५ फूट विस्तारला आहे. किमान एक हजार वर्षांपूर्वीचा हा वृक्ष असावा असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. या ठिकाणीं एक ईश्वरलिंग असून एकंदर परिसर घनदाट छायेमुळें, मुक्त खेळणाऱ्या हवेमुळें व पशु-पक्षांच्या सान्निध्यामुळें अत्यंत प्रसन्न असतो. हजारों वर्षें या स्थानाचें पावित्र्य स्थानिक लोक अत्यंत दक्षतेने सांभाळीत आले आहेत.

या वटवृक्षाच्या सान्निध्यांत, किंबहुना वटवृक्षाप्रमाणेच श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचा गेलीं पांच शतकें विकास होत राहिला आणि त्याच्या शाखा आसेतुहिमाचल पसरलेल्या असून त्याचीं पाळेंमुळें असंख्य मठानुयायांच्या हृदयामध्यें खोलवर रुतलीं आहेत. पांच शतकांचा पंचशताब्दि महोत्सव वैभवाने साजरा झाला. या महोत्सवाच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्याधिराज पुरस्काराची योजना साकारलेली असून त्या पुरस्काराचें स्मृतिचिन्ह म्हणून पुरातन वटवृक्षाची निवड करण्यांत आली.

# ६. संघटनाची प्रक्रिया

श्रीविद्याधिराजतीर्थ १९७३ सालीं ज्या तिथीला श्रीगुरुपीठावर आले तो दिवस श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या संस्थापनेचा दिवस होता. पांच शतकें पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या श्रीमठाच्या तोंवर बावीस पुण्यवंत स्वामीजींची अखंड परंपरा लाभली होती. श्रीविद्याधिराजतीर्थ हे परंपरेंतील तेविसावे स्वामी.

श्रीगुरुपीठावर येतांच त्यांनी श्रीमठसंस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचा संकल्प जाहीर केला आणि एकदम युद्ध पातळीवर ते सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत झाले. आपल्या कारकिर्दीचा शुभारंभ त्यांनी वारणासी क्षेत्रांतील श्रीसंस्थानच्या आद्य मठाच्या जीर्णोद्धाराद्वारें केला व त्यांच्या श्रीगुरुपीठारोहणाच्या रौप्यमहोत्सवी वर्षांत (१९९८) त्यांनी दुर्लभ अशी श्रीशैलक्षेत्राची यात्रा करून वास्को (गोवा) येथें नूतन मठवास्तु बांधली.

१९ मार्च १९९९ (चैत्र शुक्ल द्वितीया, शके १९२१) रोजीं तीन टप्प्यांनी जीर्णोद्धार व विस्तार करण्यांत आलेल्या अतिभव्य अशा पर्तगाळ येथील मुख्य मठाच्या वास्तूचें विधिवत् उद्‌घाटन केलें. या सव्वीस वर्षांत श्रीस्वामीजींनी जेवढे कार्य केले तेवढे यापूर्वींच्या पांचशें वर्षांत होऊ शकले नव्हते असे म्हटलें तर ती अतिशयोक्ति ठरू नये. पाव शतकाच्या कालावधीत श्रीस्वामीजींनी जे संकल्प केले ते सारे पूर्णत्वास नेले, अशा कार्यांमध्यें जुन्या मठवास्तूंचे जीर्णोद्धार व विस्तार, सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती स्थापन झाल्या तेथें नूतन मठवास्तूंची बांधणी, श्रीमठाच्या कक्षेंतील देवमंदिरांची डागडुजी व त्या मंदिरांमध्यें नूतन विग्रहांची प्रतिष्ठापना, यज्ञयाग व अनुष्ठानांद्वारे धर्म व धार्मिकतेच्या क्षेत्राचा विस्तार, ठिकठिकाणीं चातुर्मास्य व्रताचरण करून त्या त्या परिसरांतील समाजवृंदामध्यें कुलदेव व गुरुपीठांवरील श्रद्धा दृढतर करणे आणि संन्यस्त

जीवनाची सारी व्रते कर्तव्यनिष्ठेने पाळून आपली वैयक्तिक अध्यात्म साधना व स्वाध्यायरूपी ज्ञानार्जना महायज्ञ अखंड चालू ठेवला.

विसावें शतक शेवटच्या टप्प्यांत पोंचत असताना श्रीस्वामीजी श्रीगुरुपीठावर आले व श्रीमठाचा पाया अधिक दृढ व व्यापक बनवून, समाज अधिक संघटित व उन्नत बनवून एकविसाव्या शतकाची संभाव्य आव्हाने पेलण्याची शक्ति त्यांच्यांत विकसित केली. दोन शतकांमधील दुवा बनताना परंपरेशीं फारकत येऊं न देतां केलें. त्यांच्या या कार्याची दखल इतिहास घेईलच.

या ठिकाणीं त्यांच्या अष्टसिद्धिच्या विविध पैलूंची आपण कल्पना घेऊ या. पीठावर आल्यापासून सामाजिक व सांस्कृतिक, त्याचप्रमाणें धार्मिक कार्यांचा व्याप सतत विस्तारत राहिला तरी पूज्य श्रीस्वामीजींनी आपली स्वाध्याय साधना अखंड चालू ठेवली. या साधनेचा कळस म्हणजे कल्याणपुर येथें सुरू केलेल्या श्रीमन्न्यायसुधा पाठाची यशस्वी परिपूर्ति होय.

श्रीमन्न्यायसुधा या ग्रंथाचे रचयते, लोकविख्यात श्रीमद् जयतीर्थ गुरु सार्वभौमहोत. सुधा ग्रंथ ही त्यांची महामेरु गणावी अशी कृति आहे. जगत्प्रकाशक अशा सूर्याप्रमाणें सज्जनांच्या बुद्धींतून अज्ञानरूपी अंधःकार दूर करण्याचें सामर्थ्य या ग्रंथराजांत आहे.

श्रीवेदव्यासांनी वेदांचे विविध विभाग पाडून त्यांच्या अर्थ निर्णयासाठीं ब्रह्मसूत्रें रचलीं. भगवंताचीं विविध स्वरूप लक्षणें कोणतीं, वेदांपासून कोणता निर्णय करावा, भगवंत हा वेदांच्या सर्व पदांपासून कसा प्रतिपाद्य असतो याचें सयुक्तिक दृढीकरण करणें हा ब्रह्मसूत्राचा उद्देश होय. या सर्व सूत्रांवर श्रीमध्वाचार्य यांनी भाष्य, अणुभाष्य, न्याय विवरण व अनुव्याख्यान असे चार व्याख्यान ग्रंथ लिहिले. त्यांतील अनुव्याख्यान श्लोकरूपी असून तो ब्रह्मसूत्राचा अत्यंत प्रौढ विमर्षात्मक ग्रंथ आहे.

सकृत्दर्शनीं श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचे अवलोकन करताना इक्षुदंडा प्रमाणे कोणताच रस अनुभवास येत नाहीं. पण मंथन सुरू होतांच त्याच्या दिव्य रसाचा अनुभव येऊं लागतो. या ग्रंथाच्या अध्ययनाने भारतीय तत्त्वशास्त्राचें अनन्य असदृश्य पांडित्य प्राप्त होत असतें. हा ग्रंथ श्रीकर म्हणजे भौतिक, आध्यात्मिक सकल ऐश्वर्य देणारा आहे अशी मध्वमतानुयायी लोकांची मान्यता आहे.

## पूज्य श्रीस्वामीजींचें जन्मस्थान : पंचगंगावळी

दक्षिण कन्नड जिल्ह्यांतील गंगोळ्ळी हा गांव संगम क्षेत्रावर वसलेला आहे. सह्याद्रि पर्वतरांगांच्या कुशींत जन्म घेतलेल्या पांच लोकमाता (गंगा) आपल्या दुतर्फा पसरलेला परिसर सुजलाम् सुफलाम् करीत सागर सान्निध्यांत पोचतात तेव्हां थोड्याफार थकून भागून मंदावतात आणि आपल्या कार्याची परिपूर्ति झाल्याच्या कृतार्थतेने काहींशा भावपूर्ण आवेशांत स्वतःस सागराच्या विशाल जलाशयांत झोंकून देऊन आत्मविलोपन करून बसतात. या पांचहि नद्यांचीं मुखें गंगोळ्ळीच्या किनाऱ्यावर उभे राहिल्यास पहायला मिळतात. सागर-संगम पाहतांना हृदयांत ऊर्मि उसळूं लागतात. वेळ संध्याकाळची असेल तर सुदूर पश्चिमेला क्षितिजाकडे झेप घेणारें लालभडक सूर्यबिंब पहायला मिळतें. मावळत्या सूर्याचे लाल सोनेरी किरण समुद्राच्या पृष्ठभागावर व संगमस्थानावर झळाळतात. त्या सह्य सोनेरी किरणांच्या स्पर्शाने संथ पाणी शहारतें आणि गुदगुल्या झाल्यागत तें थरारतें. त्यांतहि मावळत्या सूर्याचें दर्शन घेण्यासाठीं जेव्हां मासोळ्यांच्या समुहांमध्यें स्पर्धा लागते तेव्हां तें दृश्य अधिक मनोहर असतें. क्षणार्धांत सूर्यनारायण धीरगंभीरपणें सागरांत एक डुबकी घेतो आणि पुन्हा डोकें वर काढल्याचा आभास निर्माण करीत अदृश्य होतो. पश्चिमेकडील आकाशांत लालिमा फांकतो आणि पूर्वेकडील आकाशांत डौलदार चंद्र रिक्त आकाशाचा ताबा घेऊं लागतो. आणि मग सूर्य गेल्याची खात्री करण्यासाठीं एक एक तारका आपल्या कवाडाआडून हळूच डोकावूनं पाहते आणि सूर्य अस्तास गेल्याची खात्री करून निर्धास्तपणे आपआपल्या अंगणांत वागडूं लागतात आणि पाहतां पाहतां सारें आकाश ज्योतिर्मय बनून जातें. भूतलावर काळोखाचें पांघरूण पसरत असतानाच नभांगण दीपोत्सव साजरा करीत असतें.

पहांटेच्या वेळीं अनुभव वेगळाच असतो. पूर्व क्षितिजावरील सूर्योदय डोळ्यांचें पारणें फेडतो आणि त्याची प्रभा क्षितिजाचें कवच भेदून इतस्ततः पसरते तेव्हां तारका घाबऱ्या घुबऱ्या होऊन ढगांआड जाऊं लागतात आणि चंद्र देखील आपला डौल आवरीत थोडासा निस्तेज बनूं लागतो.

वेळ सकाळची असो, तिन्हीसांजेची असो वा मध्यान्हाची, पंचगंगांचा प्रवाह अखंड वहात असतो. नगाधिराजकडून आणलेली तीर्थाची कावड एक एक प्रवाह सागराकडे अलगद सुपूर्द करीत राहतो.

अशा श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचें अनन्यभावें अध्ययन व चिकित्सक परिशीलन श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी व्यासंगपूर्वक केलें. तो एक बौद्धिक मंथनाचाच अनुभव होता. त्यातून निघालेलें हलाहल पचवून जीं अमोल रत्नें प्राप्त झालीं, तो गुरुवर्यांनी मिळविलेला ठेवा आहे. या तेजस्वी रत्नांचें ओझरतें दर्शन श्रीगोकर्ण मठाधीशांनी कल्याणपुर येथें दि. ४ जुलै १९९८ रोजीं झालेल्या एका विशेष कार्यक्रमांत भक्तगणांना घडविलें. फलिमारु तथा भंडारकेरी मठाधीश श्रीमद् विद्यामान्यतीर्थ यांच्या चिकित्सक उपस्थितींत श्रीमन्न्यायसुधा मंगल पाठ झाला हें विशेष. तो एक अमृतानुभव होता. श्रीमन्महाभारत तात्पर्यनिर्णय पाठाचा शुभारंभ येथील श्रीवेंकटरमण देवस्थानांत चातुर्मासाच्या वेळीं (१९९६) करण्यांत आला. आणि त्याच्या परिपूर्ति नंतर मंकी चातुर्मासाच्या पूर्वसंध्येंवर (१९९८) त्याच ठिकाणीं एक विशेष समारंभ आयोजित करण्यांत आला. या समारंभाला उपस्थित विद्वज्जनानी श्रीस्वामीजींचें कार्यपूर्तीबद्दल अभिनंदन केलें.

पर्तगाळ मठांतील जीवोत्तम वैदिक पाठशाळेची गुणवत्ता वाढवून शिस्तबद्ध अभ्यासक्रमाद्वारें विद्यार्थ्यांना वेद, संस्कृत, धर्मशास्त्र, ज्योतिष आदि विषयांचे क्रमबद्ध शिक्षण दिलें जातें. या पाठशाळेंतून दरवर्षीं सुमारें पन्नास विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असतात. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमाचें हें गुरुकुल देशभर ख्याति मिळवून बसलें आहे.

मठक्षेत्राच्या पलीकडे जाऊन समाजाचे प्रश्न व त्यांचीं दुःखें ओळखून तीं दूर करण्यासाठीं दोन धर्मादाय विश्वस्त मंडळांची स्थापना केलेली आहे. स्वामी द्वारकानाथ विश्वस्त मंडळ व श्री विद्याधिराज धर्मादाय विश्वस्त मंडळ हीं तीं मंडळें होत. शिक्षण, आरोग्य, सामाजिक संस्कार इत्यादि क्षेत्रांत हीं मंडळें समाजाला सहाय्य करीत आहेत.

# ७. विविध तीर्थयात्रा

पंचमहाभूतांनी व्यापलेला भूतल विपुल विविधतेने भरलेला आहे. बर्फाच्छादित हिमशिखरें आणि भूगर्भांतील हिरे व सोन्याच्या खाणी, सुपीक भूमि, नापीक भूमि, तऱ्हेकवार जलाशय, वृक्षवल्ली आणि वनस्पतींचे अनंत प्रकार, जलचर आणि भूतलावर संचार अथवा आकाशांत विहार करणारे प्राणी ... देवाच्या दुनियेंत नजर टाकूं तिथें अद्‌भूत आश्चर्य पसरलेलें आहे. उकळत्या पाण्याचे निर्झर, शीतजलाचे प्रवाह, औषधी गुणधर्म असलेली हवा, पाणी आणि वनस्पती ही सारी देवाची निर्मिती आहे.

भूतलावर देवाने कांहीं स्थळें अशीं निर्मिलीं कीं जेथील वैशिष्ट्यांमुळें तीं तीर्थस्थाने म्हणून मान्यता पावलीं. तनमनाची शुद्धि करणारीं हीं तीर्थस्थाने भारतांत मुबलक आहेत. सारीं स्थाने हजारों वर्षांपासून आपल्या ऋषिमुनींनी व साधुसंतांनी पवित्र पावन तीर्थक्षेत्रें मानलीं. अर्थांत त्या प्रदेशाचें, तेथील जलाशयांचें निरीक्षण परीक्षण करूनच पवित्र असल्याचा निर्वाळा संतमहंतांनी दिला. निसर्गशक्तीचें त्या ठिकाणीं केंद्र असतें. पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीचा इष्ट प्रभाव त्या केंद्रावर पडत असावा, न पेक्षां केवळ बाह्य दृष्टीला शांत, निर्मळ व प्रसन्न सुंदर वाटणारीं एकापेक्षा एक अधिक सरस अशीं स्थाने वगळून तपस्वी महर्षींनी विशिष्ट स्थाने निवडलीं नसतीं. तीर्थस्थानाची निवड झाल्यानंतर संतांच्या समागमाने तेथील पावन शक्ति वृद्धिंगत झाली. धर्म व धार्मिकतेचें चिंतन, मनन व वेदाध्ययन, यज्ञयाग यांसारख्या प्रवृत्तींमुळें तीर्थस्थानाचें वायुमंडळ पुण्यमय व्हायला मदत झाली. अशा तीर्थांमध्यें वास करताना आत्मानंदाचा जो अनुभव येतो तो वेगळाच!

संन्याशांसाठी तीर्थयात्रा एखाद्या आवश्यक व्रतासारखी असते. संन्याशी हे प्रकृतीने व धर्माने परिव्राजक असतात. भौतिक समृद्धीच्या वातावरणांत अधिक काळ राहिल्याने, तेथील सुख-सोयींबद्दल मोह निर्माण होण्याचा, चित्त विचलीत होण्याचा धोका असतो. तसें झालें तर तो संन्यस्त व्रताचा द्रोह ठरेल. त्या दृष्टीनेही अखंड परिभ्रमण करण्याचा शिरस्ता संन्याशांनी पाडून घेतला आहे.

# वारणासी क्षेत्राचें महत्त्व


वारणासी या तीर्थक्षेत्राला काशी, बनारस या नांवानेंही ओळखतात. पवित्र गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेली ही नगरी भारतीय संस्कृतीचें व हिन्दु आचारविचारांचे हार्द आहे. नगाधिराज हिमालय हें अनेक तीर्थांचें माहेर असले तरी सामान्य जनांसाठीं तो परिसर दुर्गम असल्यामुळें धर्म, संस्कृति, अध्यात्म यांचे केंद्र वारणासीच बनले. आसेतुहिमाचल विस्तारलेल्या या देशाच्या कानाकोपऱ्यांतील ब्राह्मण विद्यार्जनासाठी आणि आपल्या जिज्ञासेच्या पूर्तिसाठी, धर्मशास्त्राचा अन्वयार्थ समजून घेण्यासाठी किंवा केवळ उदात्त वातावरणांत वेदांचें श्रवण करण्यासाठीं काशीनगरींत एकत्र होत असत. या नगरीने अनेक धर्मशास्त्रावरील वादविवाद ऐकले आणि भारतीय संस्कृतीला उदात्तता व तेजस्विता देण्याचें कार्य अविरत चालू ठेवलें.

काशी शहराचें महत्त्व व महात्म्य एवढ्याने संपत नाही. खऱ्या अर्थाने काशी ही देवभूमि आहे. त्या भूमीचीं वर्णने करणारे असंख्य ग्रंथ उपल्ब्ध आहेत. प्रत्येक ग्रंथामध्ये काशीची वेगवेगळीं वैशिष्ट्यें नमूद केलेलीं आहेत. ब्रह्मवैवर्त पुराणामध्ये काशीरहस्यम् नावाचा एक वेगळाच खंड आहे. सव्वीस अध्याय व २७०० श्लोकांच्या या खंडांत काशीचें सर्वार्थाने सुंदर शब्दांत वर्णन केलेलें आहे. काशी म्हणजे अनावृत ब्रह्मस्वरूप असून त्या नगरीविषयी जाणणे म्हणजे सर्वज्ञ होण्यासारखेच आहे. श्रीकाशीखण्ड नांवाच्या ग्रंथांतहि काशीनगरीचे तपशीलवार वर्णन वाचायला मिळते. त्या काशी खंडाच्या ५९ व ६० व्या अध्यायांत पंचनद व बिन्दुमाधव यांचे वर्णन व कथन करण्यात आले आहे. पंचनदला पंचगंगा घाट असेंहि म्हणतात. या पंचगंगा घाटावर श्रीसंस्थानचा पुरातन मठ आपली उंच फडकावीत दिमाखाने उभा आहे.

पंचगंगा घाट हे भगवान् श्री विष्णूचे निवासस्थान मानलें जातें. भूलोक, भुवर्लोक व स्वर्लोक या तिन्ही लोकांमध्ये काशी क्षेत्र परमपवित्र मानण्यांत येते आणि या परमपवित्र काशीमध्ये भगवान् विष्णूने आपल्या निवासासाठी निवडलेले पंचनदतीर्थ श्रेष्ठतम व पवित्रतम असे स्थान ठरते.

❁

विशाल काशी नगरींत पंचगंगा घाटावरच श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची शाखा उभारण्यासाठी आद्य मठाधीशांना कोणती गोष्ट प्रवृत्त करून गेली




पीठारोहण

याचा आपण अंदाज करू शकतो. काशी खंडातील पंचनद महात्म्यांत त्या घाटाबद्दल काय लिहिले आहे ते पाहूंया. श्रीकाशीखंडात अगस्त्य ऋषीने षडानन कुमार कार्तिकेय याला प्रश्न विचारले व कार्तिकेयाने जिज्ञासेचे समाधन केले अशा स्वरूपात हे वर्णन येते.

पंचनद हे इतके पवित्र तीर्थ आहे की त्याचे नांव उच्चारतांच पाप नष्ट होत असते असे सांगून कार्तिकेय म्हणतात, खुद्द तीर्थराज प्रयाग या पंचगंगा घाटावरील पंचनद तीर्थात वास करीत असतात:

देशांत अनेक तीर्थे आहेत. या तीर्थावर वेगवेगळ्या भागांतील लोक स्नान करून आपल्या विविध प्रकारच्या पापांतून मुक्त होत असतात. लहान सहान तीर्थे आपण वर्षभरांत गोळा केलेलीं पापें माघ महिन्यांत सूर्य मकर राशींत असताना प्रयागला जाऊन ती तीर्थराजाकडे सुपूर्द करीत असतात आणि हीं सारीं पापें घेऊन तीर्थराज-प्रयाग काशीला येतात. आणि पंचनद तीर्थावर एक दिवस स्नान करून ती तेथे विसर्जन करीत असतात. अशा या पंचनद तीर्थाची उत्पत्ती कशी झाली याची एक कथा या खंडात वाचायला मिळते.

कार्तिक महिना हा पंचनद तीर्थाच्या दृष्टीने पवित्रतम मानण्यांत आला आहे. या पंचनदतीर्थाला सत्ययुगांत धर्मनद, त्रेतायुगांत धूतपापा, द्वापारयुगांत बिंदुतीर्थ व कलियुगांत पंचनद असे नांव झालेले आहे. सत्ययुगांत शेकडो वर्षे तपश्चर्या करून मिळणारे फळ केवळ कार्तिक मासांत पंचनद तीर्थांत स्नान केल्यावर मिळू शकते. आणि तेवढेच पुण्य कार्तिक महिन्यांत एकदांच पंचनद तीर्थांत स्नान केल्याने मिळूं शकते.

**व्रतिनः कार्तिके मासि स्नातस्य विधिवन्मम।**
**दामोदर गृहाणार्घ्यं दनुजेन्द्रनिषूदन।।**

श्रीविष्णूचे स्मरण करून व्रतस्थ लोक वरील श्लोकाचे उच्चारण करतात व अर्घ्य अर्पण करतात. श्लोकाचा भावार्थ असा.

'दैत्येंद्र विघातक दामोदरा, मी पूर्ण कार्तिक महिना या बिन्दुतीर्थात विधिपूर्वक स्नान केले आहे. माझ्या अर्ध्याचा स्वीकार करावा!'

स्कन्द पुराणांत विष्णू भगवान् अग्निबिंदु ऋषीला सांगतात, 'सर्व स्थानांमध्ये आनंदवन पवित्र आहे. त्याहून पवित्र आहे पंचनद तीर्थ. कारण तेथे मी स्वतः निवास करीत आहें!' (स्कन्दपुराण, चतुर्थ खण्ड, बिन्दुमाधव महात्म्य अध्याय सात)

वारणासी क्षेत्रीं पंचगंगा घाटावर भव्य जीर्णोद्धारित मठवास्तु श्रीसंस्थानाची

पताका डौलाने फडकावीत उभी आहे. गंगा, यमुना, सरस्वती, किरणा तथा धूतपापा या पाच नद्यांचा येथे संगम होत असल्यामुळें या तीर्थाला पंचगंगा तीर्थ असें म्हणतात. वारणासींतील तें स्थान पवित्रतम मानलें जातें.

काशी खंडांत असें नमूद करण्यात आलें आहे की, अग्निबिंदु ऋषीला वर देऊन भगवान् विष्णुने बिंदुमाधवाचे रूप घेतलें व ते तेथें प्रादुर्भूत झाले.

**प्रयागे माघमासे तु सम्यक्स्नातस्य यत्फलम् ।**
**तत्फलं स्याद्दिनैकेन काश्यां पञ्चनदे ध्रुवम् ।।**

(काशी खंड. ५६/११६)

ह्या तीर्थाचें महात्म्य फार मोठें आहे. प्रयाग येथे महिनाभर स्नान करून मिळाणारे पुण्य पंचगंगेंत केवळ एका दिवसाच्या स्नानाने मिळतें.

या तीर्थाचे दुसरें वैशिष्ट्य असें की त्याची तीर्थ देवता विष्णु असून कार्तिक महिना ह्या स्नानासाठीं अनुरूप मास मानला जातो.

अशा पवित्र स्थानी श्रीसंस्थानचा मठ श्रीमठाचे संस्थापक श्रीनारायणतीर्थ यांनीच उभारला. विशिष्ट परिस्थितींत काशी नरेशाच्या भक्ति व आदरास ते पात्र ठरल्यावर घाटावर बसून चिंतन करणाऱ्या या सारस्वत मुनीला काशी नरेशांनी तेथें बिंदुमाधव सान्निध्यांत मठ वास्तु उभारण्यासाठीं जागा दान केली.

काशींतील उंच पंचगंगा घाट हें पवित्रतम स्थान मानलें जातें. शिवाय वारणासींत पंचगंगा ईशान्य वाहिनी झालेली आहे. देव मंदिरासाठी जागा निवडतांना ज्या ठिकाणी जलवाह ईशान्येकडे वळतो तें ठिकाण निवडण्याची शिफारस तंत्रसार संग्रहांत ठळकपणे येऊन जातें.

**प्रागुदक्प्रवणे देशे कुर्याद्देवालयं सुधीः ।।**

(श्रीमध्वाचार्य लिखित तंत्रसारसंग्रह अ ३-४५)

आनंद रामायणांत भगवान् रामचंद्रांच्या तीर्थयात्रांची माहिती देणारे एक स्वतंत्र यात्राकांड आहे. प्रभु रामचंद्रांनी केलेल्या यात्रांचे विवरण तेथे वाचायला मिळते. अशा यात्रांमध्ये कार्तिक मासांत त्यांनी पंचगंगा घाटावर गंगास्थान केल्याचा उल्लेख आहे. त्यांनी वर्षभर काशील वास्तव्य करून तेथे घाट बांधले आणि तेथून ते च्यवनाश्रम, शोण, गंगासंगम, गंगा-गंडकी संगम, नारायणी-गंडकी संगम, हरिहर क्षेत्र (सोनापूर), राजगृह इत्यादि ठिकाणी गेल्याचा उल्लेख आहे.

आनंद रामायणांतील पंचगंगा घाटावरील कार्तिक स्नानाशीं संबंधित श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

**तथा चकार रामोऽपि घट्टबन्धनमुत्तमम्।**
**दृश्यते प्रत्यहं यत्र काश्यां रामः ससीतया।।**
**चकार पंच गंगायां कार्तिक स्नानमुत्तमं।**
**काशीवासं वर्षमेकं चकार धर्मतत्परः।।**

(आनंद रामा. २/६/३७-३८)

संपूर्ण कार्तिक मासांत पंचगंगा घाटावर स्नान करणे शक्य झाले नाही तर कार्तिक शुक्ल त्रयोदशी, चतुर्दशी व पौर्णिमा असे तीन दिवस गंगास्नान केल्यानेही कार्तिक स्नानाचे पुण्य पदरी पडते असे म्हणतात.

**वारणस्यां पञ्चनदे त्र्यहं स्नानास्तु कार्तिके।**
**अमी ते पुण्यवपुषः पुण्यभाजोऽति निर्मलाः।।**

काशी क्षेत्रांतील पंचगंगा तीर्थांत पांच नद्यांचा संगम, झालेला आहे. गंगा रत्नमालेत त्याबद्दल असे वर्णन येऊन जातें.

**गंगा भारति सूर्य सूनु किरणा बा धूतपापा तसे।**
**पांची एकवटोनि तीर्थ निपते ते पंच-गंगा असे।।**

या पवित्र ठिकाणी आद्य मठ उभा झाला तर वैष्णव संप्रदायी सारस्वत समाजाला तो तारक ठरेल ही श्रीनारायणतीर्थांची श्रद्धा पांच शतकांच्या इतिहास अवलोकनानंतर किती सार्थ होती याची कल्पना करूं शकूं.

## वारणासीचा आद्य मठ

श्रीसंस्थानचें मुख्यालय गोव्यांत कुशावती तीर्थी पर्वत रांगांच्या पायथ्याशीं उभारण्याचें श्रेय श्रीमठ परंपरेंतील सहावे स्वामी परमपूज्य श्रीरामचंद्रतीर्थ यांना दिलें जातें. श्रीरामचंद्रतीर्थ काशीयात्रेला गेले असतां प्राचीन मठवास्तूच्या आवारांत पंचगंगा घाटावर चिंतनासाठी वसले होते. भूगोल लक्षात घेतां परशुरामभूमीत मुख्यालयास अनुरूप अशी मठवास्तू उभारण्याची प्रेरणा त्याना तेथे झाली आणि ज्या ठिकाणी कुशावती नदी सह्याद्रि पर्वतरांगांच्या पायथ्याशी ईशान्य वाहिनी झालेली त्याना

दिसली तेथे त्यानी पर्तगाळ मठवास्तु उभी केली असें मानण्यासाठीं पुरेसे दाखले उपलब्ध आहेत.

पर्तगाळ मठस्थापनेबद्दल अनेक आख्यायिका प्रचलित असल्या आणि त्या निराधार ठरवितां येत नसल्या तरी जागेच्या निवडीमागें ईशान्यवाहिनी जलप्रवाहाचे महात्म्य प्रेरणारूप ठरलें यांत शंकाच नाही.

इतिहासाच्या प्रदीर्घ कालावधीत वारणासीवर परकी राजवटीच्या जुलमाचीं अभ्रें आलीं, पण गंगेच्या पात्रांत तेहतीस फूट उंचीच्या चंबुतऱ्यावर उभा असलेला गोकर्ण मठ सुरक्षित राहिला. तरी या वास्तूवर अनेकांची वक्रदृष्टि अनेकदां गेली. श्रीव्यासतीर्थ शिष्य स्वामीजी विद्याभ्यासासाठीं येथें गेले असतां आपल्या गुरुवर्यांना त्यांनी पाठविलेला संदेश फारच बोलका आहे. या मठवास्तूवर अनेकांच्या वक्र नजरा फिरून जात असल्याने गुरुवर्यांनी जातीने त्या मठवास्तूंत अधूनमधून वास्तव्य केल्याशिवाय वास्तू सुरक्षित राहणार नाही. या तगाद्यामुळेंच श्रीलक्ष्मीनारायण तीर्थ वारणासीला गेले व तेथील जीर्ण होऊ लागलेल्या मठवास्तूच्या जीर्णोद्धाराचे कार्य हातीं घेतले. ते पूर्ण होण्यास आठ वर्षे लागली. जीर्णोद्धार चालू असतांना श्रीस्वामी वारणासी मुक्कामाला जात आणि कल्पवास काळांत प्रयागराजची यात्रा करीत. कल्पवासकाळ पूर्ण होतांच मुख्यालय असलेल्या श्रीपर्तगाळ मठीं रामनवमीच्या उत्सवासाठी परतण्याचा शिरस्ता असायचा. शेवटच्या यात्रेहून परतत असताना फाल्गुन वद्य ७ मी च्या दिवशीं, रामनवमीला सतरा दिवस असतांना, वार्धक्य व परिश्रमाने थकलेला देह त्यांनी नाशिक तीर्थी गोदावरी तटीं ठेवला. (शके १६२३). त्या स्थानावर श्रीमठाने जमीन संपादन केलेली असून तेथेहि मठवास्तु उभारण्याचें काम श्रीविद्याधिराजतीर्थांनी केले.

आज पंचगंगा घाटावर जी जीर्णोद्धारित भव्य मठवास्तु उभी आहे, तिचा जीर्णोद्धार विद्यमान गुरुस्वामी श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांनी १९७५ सालीं करविला आणि तदनंतर जेव्हां त्यांनी तेथे वास्तव्य केलें तेव्हां मठानुयायी वर्गालाहि अनायासें वारणासी यात्रा करण्याची सुसंधि लाभली. श्रीस्वामीजींनी १९७९ सालीं वारणासी मठांत चातुर्मास व्रताचरण केलें. त्या प्रसंगीं वारणासीमधील अ. भा. महाराष्ट्र तीर्थ पुरोहित संघाने श्रीस्वामीजींना संस्कृत भाषेंतून जें मानपत्र अर्पण केलें तें अर्थपूर्ण व बोलकें आहे. (परिशिष्ट पहा)

# ८. प्रयागचा कल्पवास

गंगा, यमुना व सरस्वती या तीन लोकमातांचें संगम क्षेत्र तीर्थराज प्रयाग. भूतलावरील समस्त तीर्थांचा तो अधिपति. वेदकाळापासून या तीर्थक्षेत्राचें महात्म्य ऋषिमुनींनी पदोपदीं प्रतिपादलेलें वाचायला मिळतें.

भारतांत तीर्थक्षेत्रें अनेक असलीं तरी प्रयागचें महत्त्व वेगळें आहे. सारस्वत संप्रदायांची जननी मानली जाणारी वैदिक सरस्वती या ठिकाणीं गंगा तथा यमुनेच्या संगमांत गुप्तपणे सामील होत असल्याच्या मान्यतेमुळे सरस्वतीच्या लेकरांसाठी तीर्थराज प्रयाग हें पवित्रतम तीर्थस्थान बनलें आहे.

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेंतील विद्यमान तेविसावे गुरुस्वामी परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपादं वडेर यांनी श्रीमुखसंवत्सरांत सन् (१९९३) मकर मासांत प्रयाग क्षेत्रीं कल्पवास व्रताचरण केलें तेव्हां समस्त सारस्वत समाजाचे लक्ष पुन्हा एकदां या त्रिवेणी संगमाकडेवळलें.

यापूर्वीं श्रीस्वामीजीनी चतुर्धाम (रामेश्वर, बद्रिकाश्रम, द्वारका व जगन्नाथपुरी) यात्रा केली तेव्हां सारस्वत समाज बांधवांना गुरुसमवेत तीर्थाटन करण्याची संधि प्राप्त झाली होती. स्वामीजीनी सप्तमोक्षपुरीची - अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जैन) व पुरी - दिग्विजयी यात्राही शिष्य-परिवारासह वैभवाने पूर्ण केली होती. किंबहुना गुरुपीठावर आल्यापासून श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आसेतु-हिमाचल देशाटन करून देवदैवतांचें संदर्शन व विविध तीर्थस्थानांमध्यें शास्त्रसंमत पूजाअर्चना करून समाजाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. या सर्व यात्रा करतांना स्वामीजींचा एक कटाक्ष राहिला आणि तो म्हणजे श्रीमठ परंपरेंतील पूर्वस्वामीजींनी केलेल्या सर्व यात्रा संदर्शनाची पुनरुक्ति आपणाकडून घडावी हा होय.

हिमालयांत बदरीकाश्रमांत चातुर्मास व्रताचरण करून नंतर अल्पावधींत तेथें मठवास्तु उभारलेल्या श्रीमद् विद्याधिराजतीर्थांनी प्रयागतीर्थांतील कल्पवासाची योजना कां आंखली? मठाच्या इतिहासाच्या विविध स्वामीजींनी आठदां कल्पवास व्रताचरण केलें

होतें, ही गोष्टच विद्यमान स्वामीजींनी प्रेरणा देती झाली यांत संशय नाही. पण त्या निमित्ताने तीर्थराज प्रयागची महति आणि कल्पवास व्रताची पुण्याई सारस्वत समाजाला विदित होऊं शकली.

त्रिवेणी संगमांतील पाण्याची पातळी पावसाळ्यात व्यापक प्रमाणांत वाढते आणि सारा परिसर जलमय होऊन जातो. प्रयाग क्षेत्रांत महापुरांचे पाणी अडविण्याचें काम एका दिशेने भक्कम पुरातन विशाल किल्ल्याचे तट करतात तर दुसरीकडे खास बांधण्यांत आलेले बांध. पावसाळा संपतांच पुराचें पाणी ओसरूं लागतें आणि समुद्रकिनारीं धवल रेतीचें वाळवंट तेवढें शिल्लक राहतें. या वाळवंटांतच कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें.

धर्मशास्त्रानुसार मकरमासांत म्हणजे पौष पौर्णिमेपासून माघ पौर्णिमेपर्यंत कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें. नदीच्या वाळवंटांत त्रिवेणी संगमालगत दृश्य-अदृश्य अशा तिन्ही पवित्र नद्यांच्या प्रवाहाचे नादनिनाद कानी पडतील अशा ठिकाणीं जप, तप, चिंतन-मनन करून भगवद् आराधनेंत एक महिना व्यतीत करावयाचा असतो. त्रिवेणी संगमांत नित्य स्नान अखंड आराधना करण्यासाठीं देशाच्या विविध भागांतून लक्षावधी साधुसंन्यासी, संतमहंत व श्रद्धाळू भाविक संगमतीरीं एकत्र येऊन त्या ठिकाणी पर्णकुटी बांधून महिनाभर व्रताचरण करीत असतात. अशा पद्धतीने व्यतीत केलेला मास हा कल्पसमान असतो, असे धर्मशास्त्र सांगतें. एक हजार चतुर्युगें म्हणजे ४३२ कोटी वर्षे, म्हणजेच एक कल्प होय. जीवन-मरणाच्या फेऱ्यांत प्रत्येक प्राण्याला पुनरपि जनन व पुनरपि मरणाचे फेरे ४३२ कोटी वर्षेपर्यन्त करावे लागतात व ते पूर्ण होईपर्यन्त त्या आत्म्याला सद्गति लाभत नसते. मात्र कल्पवास व्रतामुळें संचित होणाऱ्या पुण्याईच्या जोरावर जनन-मरणाचे हे फेरे टाळतां येतात.

त्यावर्षीं प्रयागराज तीर्थस्थानी संगमाजवळ जीवोत्तम आश्रम उभारण्यांत आला. फेब्रुवारी दरम्यानचा काळ, ध्यान, चिंतन व पूजाआराधनेंत व्यतीत केला. या निमित्ताने शेंकडो मठानुयायी भाविकांनीहि तीर्थयात्रा करून त्रिवेणी संगमांत स्नान करण्याची व त्या पवित्र ठिकाणी गुरुवर्यांचे आशिर्वाद प्राप्त करण्याची दुर्मिळ संधि साधली.

कल्पवास यात्रेसाठी परमपूज्य श्रीस्वामीजी श्रीक्षेत्र वारणासीहून प्रयागला गेले आणि तेथून नैमिषारण्य मार्गे वारणासीला परतले. नैमिषारण्य यात्रेची प्रेरणा ही पुरातन ग्रंथांतील त्या स्थळाची महति वाचूनच श्रीस्वामीजीना झाली. प्राचीन काळीं तेथील गगनस्पर्शी विशाल वृक्षांच्या शीतल छायेंत बसून ऋषिमुनि व ज्ञानी तपस्वी तपःसाधना करायचे. ऋषिश्रेष्ठांच्या वास्तव्याने पुनित झालेल्या या स्थानाचे दर्शन कल्पवासाहून वारणासीला परतते वेळीं श्रीस्वामीजींनी

घेतलें. पण या यात्रेंत श्रीस्वामीजींनी श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कक्षेंतील वारणासी येथील पुरातन मठवास्तूंत वास्तव्य केलें हें विशेष.

या सर्व यात्रा व कल्पवासाच्या कालावधींत पश्चिम भारतांत सर्वत्र विखुरलेल्या सारस्वतांनी श्रीस्वामीजींबरोबर ही तीर्थयात्रा घडते ही गोष्ट भाग्याची मानून ते विविध यात्रांमध्ये सामील झाले. कांहीं क्षेत्रांच्या, विशेषतः बदरीनाथ क्षेत्राच्या, यात्रेंत सहभागी होऊं इच्छिणाऱ्या भाविकांची संख्या इतकी प्रचंड होती कीं मुंबई ते बद्रिनाथ व परत मुंबईपर्यंत त्या सर्वांचा प्रवास सुखकर व आनंददायी व्हावा यासाठीं खास वाहने, प्रत्येक वाहनांत जाणकार मार्गदर्शक यांची व्यवस्था तर करावी लागलीच, त्याशिवाय प्रवासांत व मुक्कामांत त्यांच्या आहार व निवासाचीहि व्यवस्था करावी लागली. ही सर्व व्यवस्था निर्दोष राहील याची दक्षता श्रीस्वामीजींनी जातीने घेतली. परिणामी श्रीस्वामीजींबद्दलच्या भक्ति व आदराच्या भावनेला कृतज्ञतेची जोड मिळूं शकली.

❁

कालयुक्त नाम संवत्सरीं कार्तिक शु. ११ शी (शनिवार दि, ११-११-७८) या दिवशीं श्रीस्वामी सकाळीं ८-०० वाजतां अयोध्या शरयू नदीतीरावर जाऊन नदींत स्नान करून पंड्या लोकांकडून आपल्या हातून संकल्पपूर्वक गोपूजा व गोदान करवून घेतलें. नंतर स्वामीजींनी शिष्य परिवारासह काळा राममंदिर वगैरे क्षेत्रदेव व देवमंदिरांचे संदर्शन करून दुपारीं १२-०० वाजतां तीन मोटारगाड्यांतून २०० कि. मी. अंतरावरील प्रयाग क्षेत्राकडे प्रयाग घेतलें. सायंकाळीं श्रीस्वारी प्रयाग क्षेत्रांतील त्रिवेणी संगमावर येऊन पोंचली त्यावेळीं सूर्यास्त झाला होता. मध्यम आकारच्या (साधारण तीन टन माल भरण्याएवढ्या) तीन होड्या भाड्याने घेऊन स्वामीजी संगमाजवळ जात असतांना सर्वत्र काळोख झाला. वाराहि जोराचा सुटला होता. वाऱ्याच्या दाबामुळें नदीला समुद्रासारख्या लाटा येऊं लागल्या होत्या.

स्वामीजी अवगाहन स्नानची (संगमांत उतरून पाण्यांत बुडून स्नान) करण्याकरितां उद्युक्त झाले असतां बरोबर असलेले नरसिंह भटजी यांनी आतां स्नान करूं नये असें सुचविलें. वाऱ्याच्या दाबाने एका बाजूला लाटा उसळत होत्या तर दुसऱ्या बाजूने पाण्याला धारहि लागली होती. त्यामुळें साहजिकच नरसिंह भटजींना स्वामी संगमांत उतरणार याची भीति वाटली व ते स्वामीजींना आपल्या स्नान करण्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करूं लागले. परंतु कार्तिक एकादशींचें स्नान संगमांत उतरून करण्याचा स्वामीजींचा निर्धार होता. नरसिंह भटजी स्वामीजींना विनवीतच होते. स्वामीजींनीं

सांगितलें, आम्ही आमच्या हाताला उत्तरीयाची गांठ मारतों आणि दुसरें टोंक तुमच्या हातांत देतों. तुम्ही तें घट्ट पकडून ठेवा. तुम्ही वस्त्र ओढल्यावर आम्ही सुखरूपपणें वर येऊं शकतों. त्यामुळें तुम्हाला घाबरण्याचे कारण नाहीं'. पण तेवढ्याने नरसिंह भट यांचे समाधान झाले नाही. ते आपलें म्हणणें सोडिनात. स्वामीजीं बरोबर रंगप्पा पांडुरंग कामत हेहि होते. त्यांना मध्यस्थ धरून स्वामीजींना स्नानापासून परावृत्त करावें अशी विनंती नरसिंह भट यांनी केली.

होडिवाल्यांनीहि स्नान करण्यास कोणत्याच प्रकारचा धोका नसल्याची ग्वाही दिली. तीनहि होड्या तीन बाजूंना त्रिकोणाकृति उभ्या करून मध्यें सुरक्षित अशी कुंडासारखी जागा तयार करण्याची तयारी दर्शविली. तरी नरसिंह भटजी तयार होईनात.

'येथील देश काल परिस्थिती आमच्या ओळखीची नाहीं. तेव्हां स्वामीजीनी इथें स्नान करूं नयेच'. असा ते हट्ट घेऊन बसले. स्वामीजी ऐकेनात हें पाहून त्यांचा कंठ भरून आला. रुद्ध कंठाने ते स्वामीजींना म्हणाले, 'स्नान करायचेंच असल्यास स्वामीजींनी होडींत पाटावर बसून स्नान करावें. होडीच्या कांठाजवळूनच संगमाचें पाणी वहात आहे. तें घेऊन स्वामीजींनी स्नान करावें. पाणी गंगेचें असल्याने त्या पाण्यानेंहि गंगास्नानच केल्या सारखें होईल.'

स्वामीजींनी संगमांत उतरावें कीं न उतरावें असा वादविवाद चालत असतानाच गंगानदीची एक जोरदार लाट स्वामीजी बसलेल्या होडीच्या एका बाजूला आपटली आणि वर उसळून होडींत पाटावर बसलेल्या स्वामीजींना सचैल स्नान घडवून गेली.

स्वामीजी म्हणाले, 'आतां आम्ही सत्तर टक्के भिजलों आहोंत, तेव्हां संगमांत उतरून पूर्ण स्नान करायलाच हवें.'

'स्वामीजींना गंगेनेच स्नान घातलें तेव्हां स्वामीजींनी संगमांत स्नान करावें अशीच गंगामैयाचीहि इच्छा दिसते. तेव्हां आतां स्नानाला विरोध करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. स्वामीजींच्या इच्छेप्रमाणेंच होऊं द्या'. असें रंगाप्पा पांडुरंग कामत यांनी म्हटले व नरसिंह भटजींनी मनांत कोणताहि विकल्प ठेवूं नये असा दिलासा दिला.

स्वामीजींनी संगमांत उतरून स्नान केलें. नंतर होडींत बसून थोडा वेळ जपानुष्ठान केलें आणि तीरावर येऊन मोटार-गाड्यांतून काशीला प्रयाण केलें.

श्री. रंगाप्पा कामत मागाहून उद्‌गारले, 'आमच्या कडून स्वामीजींनी त्रिवेणी संगमांत उतरण्यास विरोध झाला, तरी गंगा स्वामीजींना स्नान घडवून गेली. स्वामीजींच्या दृढनिश्चयाचा व तपोनिष्ठेचा हा चमत्कारच होय.'



श्री विद्याधिराजतीर्थ प्रार्थना करीत असताना

# ९. गंडकी यात्रेमागील मनोभावना

अनादिकालापासून हिमालय हे भारतीय जनमानसाचे एक आकर्षण केंद्र बनून राहिलेले आहे. स्वर्गाला माथा टेकवून बसलेल्या या नगाधिराजाची हिमाच्छादित शिखरे भारतीयांसाठी अनाकलनीय व दुर्गम अशी तीर्थक्षेत्रें आहेत. अथांग नील आकाशांत विहार करणारे कृष्णधवल मेघ त्या शिखाराशी हितगुज करतात आणि तेथील देवभूमीचे बारकाईने अवलोकन करू शकतात याचा हेवा भारतीय जनमानसाला सदैव वाटत आला आणि त्यासाठी त्या कृष्णधवल मेघांमार्फत देवलोकांत संदेश पाठविण्याची कल्पना आपल्या लोककाव्यामध्ये रूढ होऊ शकली.

भारताच्या उत्तर सरहद्दीवर पहुडलेला हिमालय तंग असला तरी आपल्या धर्म संस्कृतीचा व राष्टीय अखंडत्वाचा तो रखवालदार आहे अशीही एक भावना भारतीय मानसांत दृढ झालेली आहे. त्यामुळे सागरतीरावर राहणाऱ्या जनसमुदायापासून थेट हिमालयाच्या पायथ्यापर्यंत देशांत सर्वत्र बिखुरलेल्या लोकांच्या मनात आयुष्यात एकदा तरी हिमालयाची यात्रा करावी अशी सुप्त-व्यक्त अभिलाषा घर करून राहिलेली आहे. जे भाग्यवान हिमालयाच्या उत्तुंग शिखरांचे गिर्यारोहण करून परतले त्यांनी येताना आपल्या यात्रेची कटु-मधुर संस्मरणे बरोबर आणली आणि तीं स्वकीय समाजाला कथन केलीं. या संस्मरणापासून प्रेरणा घेऊन नवे यात्रेकरू तयार झाले. ही प्रक्रिया अव्याहत चालू राहिली. हिमालयांत दुर्लभ अशी पुण्यक्षेत्रे आहेत आणि त्या प्रत्येक क्षेत्राशी निगडीत चित्तवेधक पौराणिक आणि लोककथांचे वलय आहे. या कथा यात्रेकरू जितक्या अवीट आवडीने सांगतात तितक्याच श्रद्धेने इतर लोक त्या ऐकतात.

लोकमाता गंगा स्वर्गातून हिमालयांत अवतरली आणि तेथून ती प्रवाही बनून मैदानात उतरली आणि सागर संगमापर्यंतच्या आपल्या यात्रेत तिने नद्या-नाले व जलस्रोत आपल्या प्रवाहाशी एकरूप करवून अनेक तीर्थस्थाने निर्माण केली. आपल्या दीर्घ प्रवासांत वाटेतील परिसरांतील लोकजीवन समृद्ध केले, सारी भूमि सुजलाम्-

सुफलाम् करून संस्कृतीच्या अभ्युदयाला हातभार लावला. याच गंगामैय्याच्या दर्शनाने व स्नानाने पापक्षालनहोऊन मानवी जीवन सार्थकी लागते ही भावनाही बळावली आहे. जी गोष्ट गंगेची, तीच हिमालयातींल इतर नद्यांची. या लोकमातांचे दर्शन घेऊन त्यांच्या उगमापासून संगमापर्यंत आणि पुन्हा संगमापासून उगमापर्यंत परिक्रमा करण्याची प्रथाही अनंत वर्षे प्रचलित आहे. पण हिमालय केवळ लोकजीवनाचा स्रोत असलेल्या नद्यांचे उगमस्थान नव्हे, तेथे इतरही अनेक पूजनीय, दर्शनीय अशा गोष्टी आहेत. मानस सरोवर, गौरीशंकर, कैलास, नीलकंठ आदि शिखरे; गंगोत्री-यमुनोत्री, केदार व बद्री सारखीं तीर्थस्नाने, शुद्ध हवेतील मानवी कोलाहलापासून मुक्त अशी तपस्या केंद्रे हे सारे हिमालयाचे वैभव आहे. हिमालय हे केवळ पर्यटन केंद्र नव्हे. तेथे पर्यटकांना आनंद मिळतोच; पण ती साधकांची तपोभूमि आहे. भारतीय अध्यात्म साधनेचे ते खुले विद्यापीठ आहे. म्हणूनच सर्व प्रकारचे साधक, उपासक आवर्जून हिमालयाची यात्रा करतात.

एके काळी हिमालयाची यात्रा फारच जिकिरीची व अवघड होती. समुद्र सपाटी पासून हजारो फूट उंचीवर असलेल्या हिमालयाच्या कुशीतील तीर्थस्थानांपर्यंत पायी यात्रा करावी लागे. अलिकडच्यां काळांत वाहनांची साधने उपलब्ध असल्याने हिमालयाची यात्रा सुलभ बनली आहे.

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या अनेक स्वामीजींनी हिमालयातील तीर्थस्थानांच्या यात्रा केल्याच्या नोंदी मठाच्या दफ्तरांत सांपडतात. अलिकडेच श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजीनी बदरीनाथची यात्रा केली व तेथे चातुर्मास्यव्रताचे आचरणही केले. इतकेच नव्हे, तर बदरीनाथ येथे एक मठवास्तू बांधून ती समाजाला अर्पण केली. त्यामुळे मानवी गजबजापासून दूर असलेली ही तीर्थस्थाने यात्रेकरूंसाठी आता खुली झालेली आहेत.

गेल्या काही शतकांमध्ये भारत वर्षाचा इतिहास बदलला आणि इतिहासा बरोबरच भूगोलही थोड्याफार प्रमाणात बदलत राहिला. मानवी संपर्क व संस्कृतीच्या पल्याड असलेले प्रदेश यात्रेकरूंच्या बर्दळीने गजबजू लागले तर दुसरीकडे राष्ट्रीय सरहद्दी हिमालयाच्या पाठीवर उभ्या झाल्या. त्यामुळे या आपल्या प्राचीन सांस्कृतिक व आध्यात्मिक ठेव्याच्या काही भाग आपल्या आवाक्याबाहेर जाऊन बसला.

नेपाळ हे जगातील एकमेव हिंदू राष्ट्र. या नेपाळ देशाला भिडून साध्या चीनचा

भाग बनलेल्या तिबेटचा प्रदेश आहे. नेपाळ व तिबेटच्या सरहद्दी हिमालयांत एकमेकांना भिडतात. या दोन देशांमध्ये विशाल निर्जन प्रदेश आहे, जो अनेक ठिकाणी खडकाळ, अनेक ठिकाणी रेताळ व बऱ्याच ठिकाणी हिमाच्छादित आहे. तेथवर जाण्यासाठी वाहनाची सोय नाही आणि सरकारी निर्बंधही आहेत. परंतु आपल्या प्राचीन ऋषिमुनींना हे क्षेत्र अवगत होते आणि त्यांनी तेथवर यात्रा करून तेथील तीर्थांची विलोभनीय वर्णने लिहून ठेवलेली वाचायला मिळतात.

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेतील तिसरे यतिवर्य श्री जीवोत्तमतीर्थ हे इ.स. १५१८ ते १५८८ या कालावधीत श्रीगुरुपीठावर होते. त्यांची विद्वत्ता व पुण्याई अपूर्व होती, असा उल्लेख त्यांच्या समकालीन मठाधिशांनी व इतिहासकारांनी लिहून ठेवलेला वाचायला मिळतो. त्यांनी आपली तपसाधना करताना आसेतु-हिमालय अनेक यात्रा केल्या आणि आपलें जीवन अनुभवसंपन्न केलें. या यात्रांच्या जोडीला उपजत बुद्धि व ज्ञानसाधना यांच्या मदतीने त्यांनी आपल्या मनाची खोली, बुद्धीची विशालता आणि दृष्टीची व्यापकता विस्तारली. आजही मठाच्या नांवांत त्याचें नांव ठळकपणें अनुस्यूत झालेलें आपण पाहातों.

श्रीजीवोत्तमतीर्थ हे मूळ बसरूरचे. मठपरंपरेंतील दुसरे स्वामी श्रीवासुदेवतीर्थ यांनी माघ शुद्ध चतुर्थी शके १४३९ रोजी त्यांना आश्रमदीक्षा दिली. श्रीजीवोत्तमतीर्थांची सारी कारकीर्द असामान्य व तेजस्वी होती. ते एक थोर तपस्वी म्हणून ओळखले जात. त्यांनी आसेतु-हिमालय पायीं भ्रमण करून देशदर्शन व तीर्थयात्रा केल्या. श्रीमठाच्या स्वामीजींच्या आराध्य दैवताचें स्थान मिळविणारी श्रीवीरविठ्ठल प्रतिमा श्रीजीवोत्तमतीर्थांना शिला नदीच्या परिसरांतील यात्रेंत सांपडली होती. त्यांचा अध्यात्मविद्येतील अधिकार फार मोठा होता. ज्ञानसाधना व योगसाधना अचाट होती. आपण केलेल्या यात्रांचे वर्णन मोजक्या, समर्पक व सूचक शब्दांत श्रीजीवोत्तमतीर्थांनी लिहिले आहे. 'तीर्थावळ' या नांवाने प्रसिद्ध असलेल्या काव्यांत गंडकी यात्रेबद्दल ते म्हणतातः

तेथून जातां उत्तरप्रांता कुंटली शरीराची आशा।
श्रीशैलपर्वत उल्लंघोनि जातां बहुत झालो खासावीस।
विषाचा ल्हारी आंगि चडोनियां पडलों श्वासोश्वास।
सुरम्ये गाईचे भेटले कल्प चंवरां तियेचें पुच्छ।

**तियेचे दुग्धें स्नान बिठ्ठला करितां बहुत मनिं उल्हास।**
**मानस सरोवर पाहिलें तीर्थ तैसें निळे आकाश।**
**स्वर्णाच्या खाणि चोहोंकडे अदृश्य क्रीडति हंस।**
**परतोनि येतां गेलो उत्तर दिशे मुनि जन करतिल वास।**
**अवघड देखिले गंडकेच्या आधिं करोनि बहुत प्रयास**
**मुख्य क्षेत्र तीर्थ पाहिलें जें का शालिग्राम असंख्यात।**
**देवांचा पर्वत पाहिलें विष्णुक्षेत्र दिसेल चाळीस कोस।**
**धन्य झालों।।**

भारतांतील हिंदू लोक ज्या शाळीग्रामाची पूजा करतात ते शाळीग्राम केवळ गंडकी नदींत सापडतात हे विशेष. अर्थात त्या प्रदेशाची भौगोलिक रचना व तेथील वातावरण यामुळेच शाळीग्राम तयार होत असावेत.

शालिग्राम केवळ गंडकी पात्रांतच मिळतात. वरकरणी काळा दगड, त्यांत एक छिद्र, छिद्रांत बाहेर चक्रांची खूण, (शंख, गदा, पदम्, धनुष्य इत्यादि चिन्हेही आढळतात.) कित्येक चमकतात, कित्येक पारदर्शी असतात, कित्येकांवर पिवळी रेषा असते. शालिग्राम घरांत ठेवणें शुभकारक मानलें जातें. त्याला स्पर्शिलेलें जल तीर्थ होत असतें. शालिग्रामाची शास्त्रोक्त पूजा केली किंवा केवळ तुलसीदल अर्पण केलें तरी तो समस्त मनोकामना पूर्ण करतो, जन्मो-जन्मीच्या बन्धनातून मुक्ति देऊन परमानन्दाची मोक्षप्राप्ति करून देतो असें श्रद्धाळू लोक मानतात.

शालिग्राम हें महाविष्णुचें विग्रहरूप मांनलें जातें. शालग्राम अथवा सालिग्राम ही विशिष्ट प्रकारची शिळा होय. निसर्गाची ती एक अद्‌भूत देणगीच म्हणावी लागेल, मानवनिर्मित विग्रहाहून ती श्रेष्ठ मानली जाते.

पुराणांत सालिग्रामाची महिमा विविध प्रकारे वर्णिलेली आहे.

हिमालयांतून उतरून खालीं वाहणारी गंडकी हें शालिग्रामांचें जन्मस्थान. नारायणी, शाृलिग्रामी, हिरण्वती आणि हिरण्यवती या नांवांनी परम पवित्र ठरलेल्या या नदीचा उल्लेख महाभारताप्रमाणेच कित्येक इतर प्राचीन ग्रंथांमध्यें वाचायला मिळतो.

देवतातुल्य सालिग्रामांच्या उपलब्धिमुळें पुराणांनी गंडकी नदी परमपवित्र मानली आहे.

**तस्याम् भवा ये चाश्मनः चक्रचिन्हैरलंकृताः।**
**ते साक्षाद् भगवन्तोहि स्व स्वरूपधराः तरा।।**

अशी तिची ख्याती आहे. सालिग्राम हे गंडकी नदींत रूपित झालेली अमोनाईट शिळा असून त्यांची ओळख त्यांच्यावरील चक्रानुसार केली जाते. अधिकांश सालिग्रामांमध्ये लांबट छिद्र असतें. त्याला वदन असें म्हणतात. सालिग्रामाचा आकार आणि चक्रसंख्या यांवरून ते विष्णूच्या कोणत्या मूर्तीचें प्रतीक तें ठरविण्यांत येतें. सालिग्राम बहुतेक काळ्या रंगाचे असतात, पण त्यांत पांढरा, तपकिरी, आदि रंगहि सांपडतात. रत्नगर्भासारखे सालिग्राम पारदर्शी असतात. वदन, चक्र नसलेले सालिग्रामहि आहेत. काली गंडकी (कृष्ण गंडकी) च्या मूलस्थानीं दामोदर कुण्ड नांवाचें तीर्थ (तलाव) आहे. गंडकी नदीच्या खालचा भाग मुक्तिनाथ क्षेत्र नांवाने प्रसिद्ध पावला आहे. आणि त्यालाच शालग्राम क्षेत्र असेही म्हणतात.

**शालग्रामशिलाम् दृष्ट्वा यांति पापानि देहिनाम्।**
**सिंहं दृष्ट्वा यथा यान्ति वने मृगगणा भयात्।।**

सिंहाला पाहतांच जसे जंगलांतील हरण पळून जातात, तसेच सालिग्राम शिलेच्या दर्शन मात्रे माणसांचीं समस्त पापें दूर होतात, असें शास्त्रवचन आहे.

पुराण साहित्यामध्ये मुक्तिनाथ व गंडकी प्रदेशाचे महत्त्व व महात्म्याचे रसाळ वर्णन वाचायला मिळते. श्री विष्णुचीं जीं १०८ धामे आहेत, त्यातील एक मुक्तिनाथ येथे आहे असे मानले जाते. या मुक्तिनाथ धामी जो एखादी रात्र मुक्काम करील त्याचे सारे जीवन यथार्थ व कृतार्थ होतें अशीही मान्यता आहे.

गंडकी नदीबद्दल विविध प्राचीन, अर्वाचीन ग्रंथांमध्ये उद्बोधक माहिती लिहिलेली वाचायला मिळते. नेपाळमध्ये पहाडच्या खोऱ्यांतून तिचा उगम होतो. गंडकीच्या वेगवेगळ्या उगमांस सप्तगंडकी हें नांव देण्यात आलेलें आहे. ही धवलगिरी व गोसेनस्थान या पर्वतांमधून वाहते. यांतील मोठ्या प्रवाहास त्रिशूलगंगा हे नांव आहे. नेपाळांत या नदीस शाळीग्रामी, देव खोला, नरसिंह खोला (खोला म्हणजे नदी) अशी संज्ञा असून भारतांत ती नारायणी या नांवाने ओळखली जाते. ग्रीक भूगोलशास्त्रज्ञ हीस कोंडोचेटस् असे म्हणत. महाकाव्यांतील सदानीरा ती हीच असे लासेन म्हणतो. या नदीच्या जलाशयांत शाळीग्राम सांपडतात. या गंडकी नदीचे महत्त्व व महात्म्य अनादि काळापासून लोक श्रद्धेने प्रतिपादित आले आहेत. गंडकी नदीचे तीर्थ प्राशन

केल्याने माणूस तत्काळ पापमुक्त होत असतो. साळग्रामी या नांवानेहि ती ओळखली जाते. बौद्ध साहित्यांत तिचा हिरण्यवती असा उल्लेख आहे. महाभारतांत श्रीकृष्ण, अर्जुन व इंद्रप्रस्थाहून गिरीव्रजाला जात असतांना त्यांनी अग्नीची उत्पत्ती करणाऱ्या सर्व तीर्थांपासून बनलेली ही गंडकी नदी पार केल्याचा उल्लेख आहे. गंडकी स्नानामुळे अश्वमेध यज्ञ केल्याचे फळ मिळते.

महाभारतकार महर्षी वेदव्यासांनी गंडकीची गणना पापहारक अशा सात पवित्र नद्यांमध्ये केलेली आहे. पुराणानुसार विष्णुच्या गालावरील धर्मबिंदूपासून ही नदी उगम पावली (१४४). हिच्या पात्रांत जे गोटे आढळतात त्यावर चक्र असते असे पद्मपुराण म्हणते. (१.३८-३०) आख्यायिका अशी आहे की, गंडकीने विष्णूला प्रसन्न करण्यासाठी दीर्घकाळ तपश्चर्या केली. विष्णु प्रसन्न झाल्यावर तिने वर मागितला, तूं माझा पुत्र हो. विष्णूने तत्काळ तथास्तु म्हटले व सांगितलेः

**शाळग्रामशिलारूपी तव गर्भगतः सदा।**
**तिष्ठामि तव पुत्रत्वे भक्तानुग्रहकारणात्।**
**मत्सान्निध्यान्नदीनां त्वमतिश्रेष्ठा भविष्यसि।**

- हे गंडकी, शाळीग्राम शिलेच्या रूपाने मी तुझ्या उदरांत पुत्र म्हणून सदैव राहीन व भक्तांवर अनुग्रह करीन. माझ्या सान्निध्यामुळें तूं सर्व नद्यांमध्ये अतिश्रेष्ठ होशील.

या पार्श्वभूमीवर श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी बहुधान्य संवत्सरात गंडकी यात्रा करण्याचा जो निर्णय घेतला त्याचे महत्त्व सहज लक्षांत येईल. चातुर्मासाचे आचरण कर्नाटक मंकी येथे करून श्री काशी क्षेत्री गंगातटी पंचगंगा घाटावरील स्वीय मठीं अल्प मुक्काम करून गंडकी यात्रेला प्रयाण केले. यात्रेहून परतल्यानंतर काशी येथे पंचगंगा घाटावर कल्पवास केला.

# १०. जीवन एक अनंत यात्रा

तीर्थयात्रेला संन्याशाच्या जीवनात किती महत्त्व असतें याची मला कल्पना होती. सामान्य नागरिकांनी देखील तीर्थाटन करावें, ज्यायोगें पंडितमैत्री लाभते, सभेंत संचार करण्याची संधि मिळते आणि माणसाच्या बुद्धीचा व व्यक्तिमत्वाचा विकास होऊन स्वतःच्या अनुभवांतून कमावलेल्या ज्ञानामुळें नवी दृष्टि मिळते व प्रकृतिमातेच्या निर्मळ विस्ताराचा परिणाम होऊन मनाच्या कक्षा विस्तारतात असें जाणते लोक सांगत आले आहेत. परंतु खुद्द श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींच्या जीवनकार्याचा आढावा घेताना त्यांनी केलेल्या तीर्थयात्रांचा, घेतलेल्या अनुभवांचा उल्लेख केल्याशिवाय त्यांचें चरित्र अपुरें राहील. किंबहुना, त्यांच्या जीवनाचें स्वरूप एका परिव्राजकासारखें राहिलें आहे. जीवन ही एक अनंत पथावरील यात्रा असते. वाटेंत अनेक प्रकारच्या अडि-अडचणींना तोंड द्यावें लागतें. बदलत्या ऋतुचक्रानुसार हवामान बदलतें. विविध प्रकारच्या प्रकृति व विकृतींना सामोरें जावें लागतें. नमुनेदार माणसें भेटतात; त्यांना टाळतां येत नाहीं. हें सारें सहन करताना प्रकृतिमातेच्या खुल्या ज्ञानग्रंथांतून मधुसंचय करावयाचा असतो. कथोपनिषदांत सांगितल्याप्रमाणें :

> **"उत्तिष्ठित, जागृत प्राप्त वरान् निबोधत**
> **क्षूरस्य धारा निषिता दुरत्यया**
> **दुर्गं पथस् तत् कवयो वदन्ति ।।"** (कठोपनिषद् १.३.१४)

व उपनिषदांतील

> **"विज्ञानसारथिरथिर्यस्तु मनःप्रग्रहवान् नरः ।**
> **सोऽध्वनः पारम् आप्नोति तद् विष्णोः परमं पदम् ।।"**
> (कठोपनिषद् १.३.९)

या वचनांचें स्मरण होतें. म्हणून पुनरुक्तीचा प्रमाद पत्करूनहि मी गंडकी यात्रेंतील त्यांच्या अनुभवांचें संकलन येथें देत आहें. वासरीच्या रुपाने असलेल्या या नोंदी यात्रिकाची वाट किती खडतर होती याची कल्पना देण्यास पुरेशी आहे.

परमपूज्य श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींचा उत्तर कन्नड जिल्ह्यांतील मंकी या सागरतीरावरील चिमुकल्या खेड्यांत चातुर्मास व्रताचरणा निमित्त मुक्काम होता. गंडकी यात्रेची सारी रूपरेषा मंकी येथील नव्याने बांधण्यात आलेल्या श्रीव्यंकटरमण देवस्थानांत निश्चित झाली. भाद्रपद पौर्णिमेला (शके १९२०) व्रतसमाप्ति व्हावयाची होती. गंडकी यात्रेचें वेळापत्रक पाळावयाचें झाल्यास दिग्विजय उत्सवाला फांटा देणें क्रमप्राप्त झालें होतें. मंकीकरांचा थोडासा विरस झाला. परंतु एका दिव्य यात्रेचा शुभारंभ आपल्या गांवांतून व्हावयाचा आहे; त्यांत अडथळे आणूं नयेत, या भावनेने त्यांनी आनंदाने व्रतसमाप्तीचा औपचारिक समारंभ मध्यान्हापूर्वींच पूर्ण करून काढला. पूज्य श्री स्वामीजींना सोमवार दि. ७ सप्टेंबर पर्यंत मुंबईला पोंचणे आवश्यक होतें. एवढ्या दुर्गम यात्रेला निघण्यापूर्वी पर्तगाळी येथील मुख्य मठांत जाऊन श्रीरामदेवाला वंदन करावें आणि परंपरेंतील गुरुवर्यांच्या वृंदावनांचेंहि दर्शन घ्यावें असें श्री स्वामीजींच्या मनाने घेतलें होतें. दुपारीं ठीक १२.०० वाजतां पूज्य श्री स्वामीजींनी मंकी येथून प्रस्थान केलें.

मंकी ते पर्तगाळी प्रवास केवळ दोन तासांचा. पण पर्तगाळीला देशाच्या विविध भागांतून श्रीगुरुदर्शनासाठीं आलेल्या भाविकांची संख्या फार मोठी होती. त्यांना उद्देशून आशिर्वचनाचे दोन शब्द बोलणे भाग पडलें. मठानुयायी वर्गाच्या आग्रहावरून श्रीरामदेव सन्निधींत घृतज्योत प्रज्वलित करण्यांत आली. ('दीप जळे, विघ्न टळे' ही उक्ती अशीच श्रद्धेंतून रूढ झालेली असावी.) लगबगीने प्रार्थना करून व वृन्दावन दर्शन घेऊन पूज्य श्रीस्वामीजी दुपारीं ठीक ३.३० वाजतां बेळगांव मार्गे मुंबईला जायला निघालें. बेळगांव मधील भक्तगणांच्या भावनांची कदर करतां करतां दिवस मावळला. तरी रात्रीचा प्रवास करून मुंबईला पोंचणे आवश्यक होतें. मुंबई-वारणासी रेल्वे गाडी सुटण्याची वेळ सकाळीं ११.२५ ची होती.

रात्रीची वेळ आणि ओबड-धोबड रस्ता या दोन्ही कारणांसाठीं गाडी मुंबईला पोंचेपर्यंत सकाळचे सव्वासात वाजले. श्रीद्वारकानाथ भवन मठांत येऊन विश्रांती घेण्याचीहि उसंत नव्हती. स्नान-पूजा आटोपून मुंबापुरस्थ अनुयायांच्या गांठीभेटी सुरू झाल्या. श्रीराम मंदिराच्या प्रांगणांत आयोजित निरोप समारंभांत भाग घेणें क्रमप्राप्त होतें. तेवढ्यांत वर्तमान आलें कीं ७ सप्टेंबर रोजीं सकाळीं ११.२५ वाजतां सुटणार असलेली गाडी संध्याकाळीं ६.०० वाजतां सुटेल. सर्वांना ती इष्टापत्तीच वाटली. थोड्याशा मोकळ्या वातावरणांत समाजवृंदाशीं वार्तालाप होऊं शकला. समाजाच्या विविध थरांतील आबालवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संध्याकाळीं ६-०० वाजतां वारणासीकडे प्रयाण झालें.

मुंबईहून येणारी गाडी ८ सप्टेंबर रोजी रात्रौ ११ वाजतां वारणासी येथें दाखल झाली. श्री स्वामीजी पंचगंगा घाटावरील स्वमठांत पोहोंचेपर्यंत मध्यरात्र उलटली.

९ सप्टेंबरला सकाळीं पंचगंगा घाटावरील स्नान आटोपून श्रीस्वामीजींनी नित्य महापूजादि कार्यें यथासांग पार पाडलीं. गोरखपूरला जाणारी गाडी दुपारीं २.३० वाजतां वारणासीहून निघाली. गाडी सायंकाळीं गोरखपूरला पोहोंचल्यानंतर श्रीस्वामीजी गोरखनाथ मंदिरांत मुक्कामास दाखल झाले. मुंबईहून आलेल्या शिष्यपरिवारा शिवाय पोखरा येथील मणिपाल इस्पितळाचे प्रतिनिधि श्रीस्वामीजींना भेटून गेले.

दि. १० सप्टेंबर संध्याकाळ पर्यंत पोखरा येथें पोंचायचें होतें. त्यासाठीं सुनोवली येथें भारत-नेपाळ सरहद्द ओलांडून नेपाळ हद्दींत प्रवेश करणें आवश्यक होतें. नेपाळमध्ये नोंदणी झालेल्या दोन मोटर गाड्या व एक व्हॅन या प्रवासासाठीं वापरली. सकाळीं ९.३० वाजतां गोरखपुरहून प्रस्थान केलें व ठीक ११.०० वाजतां नेपाळच्या हद्दींत प्रवेश केला. वाटेंत नारायणगड येथें नारायणी नदींत श्रीस्वामीजींनी स्नान केलें व सायंकाळी ४.०० च्या सुमारास नारायणगड येथून प्रस्थान करून रात्रौ ८.०० वाजतां पोखरा येथें आगमन झालें. मणिपाल इस्पितळानें बांधलेल्या निवासी बंगल्यामध्यें श्रीस्वामीजींनी मुक्काम केला.

गंडकी यात्रेचा शुभारंभ पोखरा येथूनच करावयाचा होता. परंतु यात्रेला प्रस्थान करण्यापूर्वीं मणिपाल येथील रामदास माधव पै आणि त्यांच्या बंधूंच्या विनंतीवरून मणिपाल समूहाच्या आवारांत इस्पितळाची पाहणी श्रीस्वामीजींनी केली. या प्रसंगी विशेष स्वागत समारंभ आयोजित करण्यांत आला. ११ सप्टेंबर रोजी सकाळीं दहा वाजतां तीन लहान मोटारगाड्या घेऊन दुपारीं १२.०० पर्यंत मालडुंगा येथें श्रीस्वामीजी व इतर यात्रेकरू दाखल झाले. गंडकी यात्रेसाठीं नेपाळ येथील एका सरकारमान्य प्रवास-यात्रा कंपनी मार्फत मजूर, सहाय्यक, ट्रेक गाईड आदि व्यवस्था करण्यांत आली होती. यात्रा कंपनीचीं माणसें मालडुंगा येथें श्रीस्वामीजींच्या पथकांत रीतसर सामील झालीं. पदयात्रा सुरू करण्यापूर्वीं स्वामीजींनी काळी गंडकी नदींत स्नान केलें. त्यांच्या समवेत श्रीधर आचार्य, वेदव्यास आचार्य, नारायण हरिश्चंद्र पै (वेळगांव) विनायक भट्ट, उमेश प्रभु आणि मणिपाल इस्पितळाने उपलब्ध करून दिलेले नेपाळी साथीदार बलवीर बहादूर हे यात्रेकरूंच्या पथकांतील सहयात्री होते. पदयात्रा दुपारीं २.०० वाजतां सुरू झाली व यात्रेकरू मंडळी सायंकाळी ८.००

वाजेपर्यंत वेनी येथें पोंचली. गांवाच्या पलिकडे एक विशाल मैदान. त्या मैदानावर सहा तंबू उभारण्यांत आले आणि पदयात्रेतील पहिला मुक्काम त्या ठिकाणीं झाला. भाद्रपद कृष्ण पक्षांतील ती षष्ठी होती. तेरा किलोमीटर अंतर सहा तासांत तुडविण्यांत आल्याने प्रवासाचा थोडा थकवा सर्वांनाच जाणवला.

दि. १२ सप्टेंबर रोजीं वेनीहून यात्रेच्या पुढील टप्प्यास सकाळीं ७.०० वाजतां आरंभ करण्याचें ठरल्याने श्रीस्वामीजींनी पहाटे उठून नित्यपूजा उरकून घेतली होती. त्या दिवशीं अधिकाधिक अंतर तुडवण्याचा संकल्प करण्यांत आला होता. वाटेंत गलेश्वर बेगखोला येथें अल्प मुक्काम करण्यांत आला. त्या ठिकाणी पुलह ऋषींचा आश्रम आहे. स्वामीजींनी बेगखोला नदींत स्नान केलें आणि पदयात्रा पुढें चालू केली. सकाळीं ७.०० वाजतां निघालेलें पथक सायंकाळीं ५.३० वाजेपर्यंत मार्गक्रमण करीतच होतें. साडे दहा तासांच्या अखंड प्रवासाचा थकवा जाणवत होता. पण हवा व उत्साह अनुकूल असल्याने तो सह्य झाला. ५.३० वाजतां मंडळी टिपलिंग येथे पोंचली. या गांवांत एक लहानसे हॉटेल आहे. या हॉटेलच्या खुल्या जागेंत तंबू उभारून रात्रीचा मुक्काम केला.

दि. १३ सप्टेंबर रोजीं सकाळीं ७.०० वाजतां टिपलिंगहून प्रयाण घेऊन रातोपानीमार्गे दुपारीं १२.३० वाजेपर्यंत मंडळी ततोपानीला पोंचली, ततोपानी येथील तप्तकुंडावर श्रीस्वामीजींनी प्रोक्षण स्नान केलें आणि मुक्कामांत येऊन दुपारीं ३.३० वाजतां देवपूजा उरकून घेतली.

दि. १४ सप्टेंबर रोजीं ततोपानी येथें स्नान-पूजा आटोपून श्रीस्वामीजी व त्यांचे सहयात्री सकाळीं ९.०० वाजतां दानूमार्गे निघाले. संध्याकाळीं ६.०० वाजेपर्यंत यात्रा अखंड चालू राहिली. पहरीपाले येथें पोंचेपर्यंत सूर्यास्ताची वेळ झाली. परंतु रात्रीच्या मुक्कामासाठीं अनुरूप जागा कुठें मिळेना. हळूहळू काळोख दाटूं लागला. जागा शोधण्यांत कालापव्यय होऊं नये या विचाराने सुमारें २०० मीटर उंचीच्या डोंगराच्या पायथ्याशीं तंबू उभारून रात्रीचा मुक्काम केला. खडतर मार्गाने नऊ तास पायीं चालून १५ किलोमीटर अंतर तुडविण्यांत आलें होतें.

पहरीपाले येथून दुसऱ्या दिवशीं म्हणजे १५ सप्टेंबर रोजी सकाळीं ७.३० वाजतां लतेच्या दिशेने प्रयाण केलें. वाटेंत पुंजक्या पुंजक्याने कांहीं खेडी लागलीं. (घासा, कायकु, घुमावु). यात्रेकरूंनी सूर्याच्या उजेडांत अधिकाधिक अंतर तुडविण्याचा संकल्प करून सायंकाळीं ५ वाजेपर्यंत कालोपानी गांठलें. मूळ योजनेनुसार कालोपानी

येथील शाळेच्या मैदानांत तंबू उभारायचे होते. परंतु त्या दिवशीं शाळेचें वार्षिक स्नेहसंमेलन असल्यामुळें नदीच्या काठावरील माळरानातच तंबू उभारावे लागले.

दि. १६ सप्टेंबर रोजीं सकाळीं ७ वाजतां कालोपानीहून निघून कोखेथाटी, थाक, लार्जुंग, कोबांग सारखे चिमुकले गांव पार करीत मंडळी दुपारीं ३ वाजतां तुपचे या गांवांत पोंचली. तेथें एक उघड्या मैदानावर तंबू उभारून विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी तुपचेहून सकाळीं ७ वाजतां निघून मार्फा मार्गें यात्रेकरू दुपारीं २-३० वाजतां जॉमसम नगरींत पोंचले. नेपाळी भाषेंत या नगरीला झुमझुम असे म्हणतात. पण ट्रॅक गाईडने जागा शोधण्यासाठीं विलंब लावला. एका हॉटेलच्या खुल्या जागेंत तंवू उभारावें लागलें. जॉमसम हें या यात्रेंतील मुख्य केंद्र म्हणतां येईल. पुढच्या मार्गांत शहरी सुखसोयी व मानवी वस्ती कमी होत जाणार याची यात्रेकरूंना कल्पना होती. समुद्र सपाटी पासून २७०० मीटर उंचीवर जॉमसम नगरी आहे. या नगरींत एक विमानतळहि आहे. अनेक यात्रेकरू पोखरा ते जॉमसम दरम्यानचा प्रवास विमानांतूनहि करीत असतात. तसा पोखरा पासून मुक्तिनाथ पर्यंत हेलिकॉप्टरने प्रवास करतां येतो. परंतु यात्रेचा खरा आनंद भोवतालच्या परिसराचें अवलोकन करीत निसर्गाच्या नित्य बदलणाऱ्या नव्या नव्या छटा पाहात घ्यावयाचा असतो.

दि. १८ सप्टेंबर रोजी जॉमसमहून सकाळीं ९.०० वाजतां यात्रा सुरू झाली. श्रीस्वामीजींनी काकावेनी (कागवेनी) मार्गें प्रवास करण्याचें ठरविलें. वाटेत एकलाभट्टी हा गांव लागतो. भट्टी म्हणजे चूल (हॉटेल) गांवात एकमेव हॉटेल असल्याने तें नांव देण्यांत आलें होतें. काकाबेनीला पोंचेपर्यंत दुपारचे १२.०० वाजले. (कागबेनी उंची २८१० मीटर) मुक्तिनाथहून येणारी कृष्णा गंडकी काली गंडकीला मिळते. कागबेनीहून मुक्तिनाथला जाणारा रस्ता आहे. परंतु दामोदर कुंडाहून परततानाच मुक्तिनाथला जाण्याचा संकल्प श्रीस्वामीजींनी केला होता. गंडकी संगमतीर्थांत श्रीस्वामीजींनी मंत्रस्नान केलें. या ठिकाणाहून हिमाच्छादित शिखरांचे विलोभनीय दर्शन घडलें.

दि. १९ सप्टेंवर रोजी कागबेनीहून सकाळीं ७ वाजतां निघून चुकसांग येथें यात्रेकरू दुपारीं १.३० वाजतां पोचले. कृष्ण पक्षांतील रात्र नभ-घुमटाखालीं आकाशस्थ ग्रहतारकांचें अवलोकन करून शीतल हवेंत आनंदाने घालवली. दिवसभराचा थकवा प्रसन्न वातावरणामुळें वराच हलका झाला. वाटेंत तांगवे (२९९० मीटर) गांव लागलें. चुकसांग येथें नरसिंह खोला (नदी) व गंडकी नदीचा संगम घडतो. त्याच संगमाच्या परिसरांत रात्रीचा मुक्काम केला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ७ वाजतां बेना,

यामदो मार्गे निघून चेले मार्गें दुपारीं १२.३० वाजतां समर या गांवांत यात्रेकरू पोंचले. भाद्रपद अमावास्येची रात्र समर येथें घालवली.

आश्विन शुक्ल १, म्हणजे २१ सप्टेंबर रोजीं पूजाअर्चा आटोपून सकाळीं ७ वाजतां बेना, यामदोमार्गें गेलिंगच्या दिशेनें प्रस्थान घेऊन दुपारीं २.३० वाजतां गेलिंगला आगमन झालें. साडेसात तासांची पदयात्रा करताना प्रदेशाची उंची व हवेतील गारवा वाढत आहे, मानव व वनस्पती सृष्टी विरळ होत चालली आहे याची जाणीव व्हायची.

दि. २२ सप्टेंबर रोजी सतत सात तासांची पदयात्रा करून घामी मार्गे चरांग येथें पोंचले. यावेळीं दुपारचे दोन वाजले होते. तरी हवेंत कमालीचा गारवा होता. चरांगहून सकाळीं ७ वाजतां निघालेली मंडळी दुपारीं १ वाजतां याराला पोंचली. वाटेंत चरंग नदी, शालीग्रामी (देवखोला) व गंडकी या तीन नद्यांचा सुरेख संगम झालेला पहायला मिळाला. स्वामीजींनी उत्साहाने या त्रिवेणी संगमांत मंत्रस्नान केलें. दुपारीं २ वाजतां यारा येथें पोंचल्यानंतर एका खुल्या शेतांत तंबू ठोकून रात्र घालविली.

दि. २४ सप्टेंबरला याराहून सकाळीं ७ वाजतां प्रयाण घेऊन गिमू या निर्जन खडकाळ प्रदेशांत यात्रेकरू ७ वाजतां पोंचले. सतत १२ तासांच्या पदयात्रेमुळें सर्वांनाच थकवा जाणवत होता. याराहून नो मॅन्स लँड (NO MAN'S LAND) सुरू होतें. यात्रेकरूंना थकवा जाणवला आणि एक दिवस विश्रांती घेण्याचें ठरवलें. हवेंत विलक्षण गारवा होता. परंतु आतां दामोदर कुंड दृष्टिपथांत आलें याचा आनंद उत्साह वाढवत होता. तसें गिमू येथें पहाण्यासारखें कांहीं नाहीं. एक लहानसा निर्झर खळखळ वाहतो, एवढेंच या गांवचें वैभव. गिमूहून शनिवारीं २६ सप्टेंबर, आश्विन शुक्ल पंचमीच्या दिवशीं सकाळीं यात्रेस आरंभ झाला त्यावेळीं हवेंत गारवा होता. पण पुढील मुक्काम दामोदर कुंड असल्याने उत्साहाला उधाण आलें होतें. सुदूर क्षितिजावर दामोदर हिमालाचें उत्तुंग शिखर पहारेकऱ्याप्रमाणें निश्चल उभें होतें. रस्ता सरळ नाहीं. गिमू हें ठिकाण समुद्र सपाटीपासून ५९१६ मीटर उंचीवर आहे. दामोदर कुंडापर्यंत जाताना गिमू पास नांवाची ५९१६ मीटर उंचीवरील खिंड ओलांडावी लागते. नंतर पुन्हा खालीं उतरून दामोदर कुंडापर्यंत जावें लागतें. दामोदर कुंड समुद्र सपाटीपासून ४६८० मीटर उंचीवर आहे.

दिवस यात्रेकरूंचा भाग्याचा दिवस होता तसाच कठोर कसोटीचाहि होता. सत्पुरुषांच्या सान्निध्यामुळें नैसर्गिक प्रकोपापासून देखील कसें रक्षण होऊं शकतें

याचा अनुभव यात्रेकरूंनी घेतला आणि त्या अनुभवानंतर शब्द मुके झाले, मस्तकें झुकलीं, हृदयें भरून आलीं.

यात्रेंतील सर्वांत उंच अशा गिमू खोला या ठिकाणीं स्नान करावें आणि यात्रेचा थकवा घालवावा या विचाराने स्वामीजी गंडकीच्या पात्रांत उतरले. चारहि दिशांनी टोळधाड यावी तसा प्रकार घडला. दुपारचे बारा वाजले होते. पण आकाशांत चौफेर कृष्णमेघ दाटून आले आणि बघतां बघतां पाऊस पडूं लागला.

या अनपेक्षित प्रकाराने यात्रेकरू विस्मित झाले. वाटाडे म्हणून आलेले अनुभवी शेर्पा देखील गलितगात्र झाले. गंडकीच्या पात्रांत स्नान करताना श्रीस्वामीजी हा प्रकार पहात होते. त्यांनी आकाशाकडे पाहिलें. निराशेची ग्लानी मनांत दाटून आली. पुढें काय असा विचार मनांत येतो न येतो तेवढ्यांत साबुदाण्यासारखे हिमकण आकाशांतून झडले. भगवंताच्या आशीर्वादरूपी मंत्राक्षताच जणूं! कल्पना मनांत येतांच नवा उत्साह आला.

एका शेर्पाने इशारा दिला, "अजून बाराशें मीटर उंची चढावयाची आहे. दहा बारा किलोमीटरचें तें अंतर या वादळी हवेंत चढून जाणे सोपी गोष्ट नव्हे."

"हा दैवी अपशकून आहे!" असेहि उद्‌गार त्याने काढले. अजून सहा-आठ तास पदयात्रा करण्याची शक्ति कुणातच राहिली नाहीं. सूर्य मावळतीला झुकूं लागतांच हिमवृष्टि वाढेल आणि काळोख अधिक गडद होईल. दलदलीच्या या जमिनींत खेचरें देखील पुढें जाऊं शकणार नाहींत, आणि दामोदर कुंडापर्यंत पाण्याचा थेंबहि मिळणार नाहीं. यास्तव दामोदर कुंडापर्यंत जाण्याचा बेत रहित करावा आणि माघारीं परतून गिमू येथें तळ ठोकावा असा सल्ला त्याने दिला.

अनुभवी वाटाड्यांचा हा सल्ला यात्रेकरूंना निराश करून गेला. यात्रेंत स्वामीजी मौनव्रताचें पालन करीत. चालतांना बोलूं नये. प्रसन्न परिसराचें अवलोकन करताना हृदयस्थ संगीताचे सूर तेवढे कानीं यावे असें त्यांना वाटत होतें. पण काय चाललें आहे हें समजलें होतें. सहयात्री स्वामीजींजवळ आले आणि त्यांच्या मनांतील विचार स्वामीजींनी तत्क्षणीं ओळखले. मागचा पुढचा विचार न करतां श्रीस्वामीजींनी दामोदर कुंडाच्या दिशेने हात केला आणि प्रत्यक्ष पावलेंहि उचललीं. कांहीसे हताश झालेले सहयात्री व मजूर स्वामीजीं मागोमाग जाऊं लागले.

एक वेगळी शक्ति कार्यरत झाल्याचें जाणवत होतें. नकळतां पथकाचे नेतृत्व स्वामीजींनी स्वतःकडे घेतलें. चढण चढत चढत साडेतीन वाजतां गिमू खिंड पार

केली. ढगांआड गेलेल्या सूर्य नारायणाने लख्ख प्रभा आसमंतांत फैलावून यतिराजांचें स्वागत केलें.

आतां पुढचा मार्ग सुकर आहे याची खात्री सर्वांना पटली. पथकाच्या अग्रभागीं स्वामीजी, पाठोपाठ सहयात्री आणि त्यांच्यामागें खेचर व मजूर मार्गक्रमण करूं लागले.

गिमू खिंड पार करीपर्यंत दुपारचे ३.३० वाजले. एकाएकीं आकाशांतून पुष्पवृष्टी व्हावी असा आभास निर्माण झाला. आकाशांतून कुंदिच्या फुलांची वृष्टी होऊं लागली. वर्फ़ापासून बनलेलीं शुभ्र धवल नाजुक फुलें स्वामीजींच्या अंगावर पडताना दिसत आणि लगेच लुप्त होत. तो हिमपातच होता, परंतु उत्साह वाढविणारा होता. श्रीविष्णूच्या पवित्रतम क्षेत्रांत धीरगंभीर पावलें उचलत येणाऱ्या यतिश्रेष्ठांचें अज्ञात शक्तीकडून स्वागत होत होतें. हा सारा प्रकार पाहून सहयात्री दिग्मूढ झाले. मागाहून श्रीस्वामीजी म्हणाले, "ती निसर्गाची लीला असो किंवा दैवी चमत्कार असो, आपणास तो आशिर्वादाचाच एक प्रकार वाटला."

रात्रीच्या वेळीं दामोदर कुंडाजवळ जाण्यांत अर्थ नव्हता. एक किलोमीटर अंतरावर असलेलें कुंड दृष्टिपंथांत आलें होतें. वाटेंत निर्झर वाहात होते आणि आतां सूर्यास्त होऊन चुकला होता. याच ठिकाणीं तंबू उभारले व सर्वांनी विश्रांती घेतली.

रविवार, दि. २७ सप्टेंबरचा दिवस उजाडला तो कृष्ण मेघांच्या रुद्र नृत्याने. पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास एकाएकीं पाऊस पडूं लागला, मोठ्या प्रमाणांत हिमवृष्टि झाली. शेर्पाने तंबू उखडून परतीचा प्रवास सुरू करण्याचा आदेश दिला. या वातावरणांत तेथें थांवणे धोक्याचें आहे असें सांगून त्याने स्वामीजींना साळसूद सल्ला दिला, "कुणाला तरी पाठवून दामोदर कुंडांतून कुंभभर पाणी आणून घेऊं या, स्वामीजींनी येथेंच स्नान करून परतीच्या प्रवासास लागावें."

श्रीस्वामीजी उद्विग्न झाले. इतका खडतर प्रवास करून येथवर आल्यानंतर हात हलवीत परत जायचें यांत पुरुषार्थ तो कोणता? पण स्वामीजींना धीर देणारा एकहि साथीदार नव्हता.

श्रीस्वामीजींची मनःस्थिती श्रीधर आचार्य यांनी ओळखली. खचलेला धीर पुन्हा प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने उसनें अवसान आणीत ते उद्गारले, "चोय सूर्य उदेलो!"

सर्वांच्या नजरा पूर्व क्षितिजाकडे वळल्या. सर्वत्र कृष्णमेघ आणि आकाशाला लागलेली अखंड गळती. सूर्यकिरण देखील दिसत नव्हता. परंतु श्रीधर आचार्य यांच्या उद्गारांत जिद्द होती. आकाशस्थ कृष्णमेघ पांगळे नाहींत. पण मनांत दाटून

आलेलीं निराशेचीं अभ्रें दूर झालीं. श्रीस्वामीजींना पण उत्साह आला. ते एकदम उठून उभे राहिले. म्हणाले, "ज्यांना शेर्पा समवेत खालीं जायचें असेल त्यांनी अवश्य जावें. आमच्याबरोबर श्रीधर आचार्य व नारायण पै पुरेत." असें सागून स्वामीजी पुढें निघाले. आठ वाजतां दामोदर कुंडाला पोंचले. तेथें पोंचतांच श्रीधर आचार्य यांनी श्रींच्या सल्ल्यानुसार कुंडामध्यें उतरून स्नान करून श्रीमठाराध्य दैवतांच्या देव्हाऱ्याच्या पेटीचें लोकरी वस्त्र सोडवून पेटी अलगदपणे दगडाच्या आसनावर ठेवली. नंतर स्वामीजींनी संकल्पपूर्वक स्नान करून देवाची पेटी उघडून प्रत्येक मूर्तीला कुंडांत स्नान घातलें. दुसऱ्या कुंडांत स्नानाला निघत असताना घोड्यावरून वेदव्यास आचार्य तिथें पोंचले. दुसऱ्या दामोदर कुंडामध्ये स्नान करून व देवांना अभिषेक करून तिसऱ्या चक्रतीर्थ कुंडांत स्वामीजींनी स्नान करून देवमूर्तींना अभिषेक केला. तिन्ही कुंडांमध्ये स्नान व दंडोदक देणे असताना श्रीधर आचार्य यांना परंपरेंतील सर्व पूर्व गुरुवर्यांचे स्तोत्र म्हणवीत गुरुसंस्मरण करविलें. तेथून परती प्रयाणाला निघताना १०.३० वाजले. ११.३० वाजतां श्रीस्वामी छावणींत पोंहोंचले.

आचार्यांनी बजावलेले असतानाहि शेर्पा तेथूनच तंबू उखडून घेऊन दोन तास आधींच खालीं गेले होते. परतीचा प्रवास सुरू झाला. वेदव्यास आचार्य घोड्यावरून निघाले होते. ते पांच वाजतांच तंबूकडे पोचले. वाटेंत पावसामुळें दाटलेला चिखल तुडवत खालीं येत असताना गिमू खोला येथें अंधार पसरला. गिमू खोला हें अत्युच्च ठिकाण. तेथें काळोख मी म्हणत होता. श्रीस्वामीजी अर्धा तास तेथें थांबले. त्यांनी भिजलेले कपडे पिळून व ते परत तसेच अंगावर चढवून टॉर्चच्या उजेडांत चांचपडत पावलें उचलीत रात्रौ दीड वाजतां खालीं येऊन पोंचले. दिवसभर चालून सगळे दमले होते. विश्रांती हवी होती. डोंगराळ जमिनीवरच ते झोंपले. परंतु झोपी गेलेल्याला जादा ऑक्सिजनची गरज असते, तेव्हां इथें झोपूं नये. जागेंत रहाणें इष्ट आहे असे बलवीर सिंग या नेपाळच्या एका सहयात्रिकानें सांगितले. तरीहि दमलेल्या मंडळीने तासभर झोपून घेतलें.

रात्रीं साडेतीनच्या सुमारास आधींच गिमू येथें येऊन राहिलेले सहयात्रेकरू दोन नेपाळी मजुरांना घेऊन आले. आतां पाऊस थांबला होता. पहाटे चार वाजतांच ब्राह्म मुहूर्तावर परतीचा पुढील प्रवास सुरू झाला. तब्बल दीड-दोन तास अंधारांतून प्रकाशाकडे ही पदयात्रा चालली. मुक्कामाप्रत पोंचतांच पूर्वेला सूर्यबिंब उगवलें. घड्याळांत सहा वाजले होते. तब्बल साडेबावीस तास अखंड पदयात्रा आणि तीहि


अन्न वा पाण्याचें सेवन केल्याशिवाय स्वामीजींना घडली होती. परंतु यात्रापूर्तीची धन्यता या साऱ्या गोष्टींचा विसर पाडून गेली.

## परतीचा प्रवास

आल्या वाटेने परतायचें होतें. या प्रवासांत नवें कांही घडण्यासारखें नव्हतें. निर्जन, खडकाळ अशा या हिमाच्छादित प्रदेशांत अखंड सान्निध्य मिळतें तें गंडकी नदीचें आणि दामोदर हिमालाचें. लहानमोठे नाले, झुळझुळ वाहणारे निर्झर, अचानक दोन वा अधिक नद्यांनी एकमेकांत आत्मविलोपन केल्याचे सुंदर देखावे. एरवीं प्रदेश निर्जन. पशुपक्षीदेखील कुठेंच आढळत नाहींत. शांततेचा हा असला निरव अनुभव सहसा दुसरीकडे येत नसतो. श्रीस्वामीजींना दोन दिवस उपवास घडला. पण प्रवास चालू राहिला. शरीर थकलें तरी मनांतील उत्साहाला उधाण आलेलें दिसलें.

दि. २८ सप्टेंबरला सकाळीं ६.३० वाजतां गिमू येथें आगमन झालें. वातावरणांत कडाक्याची थंडी होती. दोन तास विश्रांती घेतली. नंतर स्नान व महापूजा. परतीच्या प्रवासास प्रयाण घेईपर्यंत मध्यान्ह झाली. साडेतीन तासांत सहा किलोमीटर अंतर कापतां आलें. डोंगराच्या पायथ्याकडे जमिनीवर कांटेरी झुडुपें होतीं. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या ठिकाणीं पाणी नाहीं. जवळपास पांच किलोमीटरच्या अंतरांत पाणी मिळण्याची शक्यता नाहीं. तिथेंच तंबू ठोकावे लागले. डोंगराच्या पायथ्याशीं जमीन ओलसर होती. तेथें एक लहानसा खड्डा खोदला. जमिनीखालचें पाणी पाझरत खड्डयांत ज़मा झालें. रंगाने पिवळसर. निथळवून चांगलें गरम केलें आणि त्या पाण्याने फराळाची व्यवस्था करून घेतली. दि. २९ सप्टेंबर रोजीं स्नानादिक आटोपून सकाळीं ७ वाजतां प्रयाण घेतलें आणि तीन तासांच्या खडतर पदयात्रेनंतर यात्रेकरू याराला पोंचले. परतीचा प्रवास सुखकर नव्हता. दामोदर कुंडाची यात्रा सफल झाल्याचा आनंद मात्र दिलासा देत होता. यारापासून निघून पुन्हा याराला पोंचण्यास सहा दिवस लागले होते. त्या जनरहित यात्रेंत विशेष कांहीं घडलें नाहीं.

आतां लक्ष मुक्तिनाथकडे होतें. दामोदर कुंडाच्या प्रवासांत प्रथम मुक्तिनाथाला जाण्याचा मोह स्वामीजींनी टाळला होता. हवामान कोणत्याहि क्षणीं बदलतें याची त्यांना कल्पना होती. म्हणून मुक्तिनाथला जाताना तेतांगपर्यंत परतीचा प्रवास करावा लागेल. तेतांगहून मुक्तिनाथला जायचें आणि पुन्हा मुक्तिनाथहून जॉमसमला यायचें अशी योजना आंखलेली होती.



कुशावती तीरी ध्यान करीत असताना

दि. ३० सप्टेंबर रोजीं यारा ते चरंग पदयात्रा झाली. सकाळीं ७ ते ११.३० पर्यंत यात्रेकरू पायीं चालले. ३० सप्टेंबर रोजीं चरांग येथें मुक्काम केला आणि एक ऑक्टोबर रोजीं गेलींगला पोंचले. चरांग ते गेलींग साडेसहा तासांचा प्रवास होता. दोन ऑक्टोबर रोजीं एकादशी. त्या दिवशीं तब्बल सात तासांचा प्रवास झाला. दि. ३ ऑक्टोवर रोजीं गेलींगहून मंडळी समरला आली. आणि समरहून चुंकसांग मार्गें पावणेतीन तासांचा प्रवास करून तेतांगला पोंचली. येथून मुक्तिनाथचा प्रवास आठ तासांचा असल्याने रात्रीसाठीं तेथेंच तळ ठोकला.

रविवार दि. ४ ऑक्टोबर (आश्विन त्रयोदशी) या दिवशीं सकाळीं पावणेसात वाजतां मंडळी तेतांगहून निघाली आणि ठीक दुपारीं तीन वाजतां मुक्तिनाथला पोहोंचली. हें श्रीविष्णूचें पवित्र धाम मानलें जातें. समुद्र सपाटीपासून ३८०० मीटर उंचीवरील या तीर्थस्थानांत पोंचताना वाटेंत रस्ता अनेक ठिकाणीं अत्यंत धोकादायक होता. मुक्तिनाथ येथें पहाडाच्या उदरांतून जलप्रवाह निघतो. तें दृश्य मनोवेधक आहे. १०८ गोमुखींतून वाहणारा गंडकीचा तो प्रवाह आहे. उत्तुंग शालिग्राम पर्वताचें येथून दर्शन घडतें. पहाडांतून उगम पावणाऱ्या या नदीला कृष्णा गंडकी असें नांव आहे. श्री स्वामीजींनी श्रीमुक्तिनारायण देवालयांत जाऊन देवपूजा केली. गंडकी नदी प्रवाहांत मंत्रस्नान करून ज्वालामाई देवालयाचेहि संदर्शन केलें. येथील पाण्यामध्यें गंधक असावा. त्यामुळें अधूनमधून येथील नदी प्रवाहावर ज्वाला भडकून उठून दीपज्योत पेटत असल्याचा भास होतो. भाविक लोक तो चमत्कार मानतात.

चुसांग ते ज्या यां दरम्यान असाच एक खाऱ्या पाण्याचा निर्झर लागतो. तोहि एक चमत्कार मानला जातो. बहुधा नदीच्या उगमाजवळ सैंधवाचे सांठे असावेत.

पौर्णिमेच्या दिवशीं- दि. ५ ऑक्टोबर रोजीं- मुक्तिनाथहून स्वामीजींनी प्रयाण केलें. तब्बल साडेसहा तासांची पदयात्रा करून एकला भट्टीमार्गें दुपारीं अडीच वाजतां मंडळी जॉमसमला पोंचली.

जॉमसम, लार्जुंग, कोपचेपानी, ततोपानीस, गलेसर मार्गें प्रवास करीत पांचव्या दिवशीं दि. १० ऑक्टोबरला यात्रेकरू पोखराला परतले. वाटेंत एक नवाच अनुभव आला. गलेसर येथें डोंगरकडा कोसळल्याने जाताना खुला असलेला रस्ता बंद झाला होता. त्यामुळे वेड्यावाकड्या डोंगरवाटा तुडवून चार तास अधिक प्रवास करावा लागला. आज सकाळीं ७ वाजतां शिवमंदिर, राधाकृष्ण मंदिर व शक्तिमंदिरांत देवदर्शन करून सकाळीं ८ वाजतां यात्रेकरू बेनीला पोंचले. या ठिकाणीं स्वामीजींच्या

स्वागतासाठीं वै. रंगप्पा पांडुरंग कामत यांचे सुपुत्र रामचंद्र व लक्ष्मण, त्याच प्रमाणे अमेम्वळ शिवानंद कामत वाहने घेऊन आले होते. दि. ११ ऑक्टोबर रोजीं सकाळीं साडेनऊ वाजतां बेनीहून निघून दुपारीं १ वाजतां पोखरा येथें आगमन झालें. त्याच दिवशीं नेपाळ सरहद्द ओलांडून रात्री साडेआठ वाजतां गोरखनाथ गांठलें व दि. १२ ऑक्टोबर या दिवशीं दुपारपर्यंत स्वामीजी वारणासी येथील पंचगंगा घाटावरील स्वीय मठांत दाखल झाले.

## यात्रेतील काही अनुभव

स्वतः स्वामीजींचें मनोगत जाणून घेण्याचा प्रयत्न केला असतां अनेक नवे दृष्टिकोन प्रगट झाले. भारतांत देशभर अशीं असंख्य कुंडें असताना दामोदर कुंडा सारख्या एका लहानशा कुंडांत स्नान करण्यासाठीं एवढा आटापिटा कां करावा असा प्रश्न केला असतां स्वामीजी कांहींसे गंभीर होऊन उत्तरले: "सकृतदर्शनी या म्हणण्यात तथ्य आहे, कारण ज्यांना कुंडांत स्नान करावयाचें आहे, त्यांच्यासाठीं असंख्य कुंडें उपलब्ध आहेत. ... दामोदर कुंड म्हणजे केवळ एक जलाशय नव्हे. तें कुंड हिमालयाच्या दुर्गम भागांत आहे एवढ्याच साठीं त्याला महत्त्व प्राप्त झालें अशांतलाहि भाग नाहीं. हिमालयाच्या परिसरांत नद्या, नाले व कुंडें यांचा तुटवडा नाहीं. पण क्षणभर तो मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी अनादि कालापासून या कुंडामध्यें सहस्रावधि भक्तांच्या श्रद्धा व भावना एकरूप झालेल्या आहेत. त्यामुळें आपोआपच दामोदर कुंडामध्यें दिव्यत्वाचा अंश विकसित होऊं शकला. देवालयामध्यें देवाची मूर्ति स्थापन करून आपण तिची पूजाअर्चा करतों. ... देवप्रतिमेंत, मग ती प्रतिमा आकृतीच्या स्वरुपांत असो अथवा लिंगाच्या रुपांत, आपण दिव्यत्व पहातों. एरव्हीं ज्या धातू, शिळा अथवा काष्ठापासून देवप्रतिमा बनविलेली असते, अशीं अगणित काष्ठें, शिळा व धातू सर्वत्र विखुरलेले आहेत. मग देवळांत जाऊन देवप्रतिमेची पूजा आपण कां करतों? कारण त्या प्रतिमेची धर्मशास्त्रानुसार प्रतिष्ठापना झालेली असते. हजारों लोक सहस्रावधि वर्षें त्या प्रतिमेला आपली श्रद्धा, भक्ति अर्पण करीत असतात. म्हणूनच मंदिराच्या परिसरांतील वातावरणांत चैतन्य येत असतें आणि दिव्यत्वाची तेथें प्रचीति येते. इतर धातूंमध्ये असा दिव्यत्वाचा अंश नसतो. म्हणूनच दुर्गम भागांतील देवमंदिरांत जाण्याचें धाडस भक्त करतात. ज्यांच्या हृदयाला अशा दिव्यत्वाचा साक्षात्कार घडूं शकतो त्यांना दामोदर कुंडाचें महत्त्व

आपोआप पटतें. या अनुभवाने जाणून घेण्यासारख्या गोष्टी आहेत..."

तीर्थ-स्नान करताना कोणती भावना मनात येते? या यात्रेत कोणते नवे अनुभव आले? असें विचारतां स्वामीजी उत्तरले:

"चक्रतीर्थांत स्नान करताना आमच्या बाह्य मनातील स्पंदनें बंद पडलीं. अंतर्मनात हृदयवीणेचे झंकार त्यावेळीं सुरू झाले. तें स्वर्गीचे संगीत, भगवान् विष्णूच्या सान्निध्याचा, साक्षात्कार देणारें ठरलें. दामोदर कुंड हें भूतलावरील विष्णूचें एक स्थान आहे हें पुराणांत वाचलें होतें. पद्मपुराणांत भगवान् विष्णूनें गंडकी नदीला शालिग्राम शिलेच्या रूपाने आपण तिच्या उदरांत पुत्र बनून सदैव राहीन व भक्तांवर अनुग्रह करीन असा वर दिला होता. त्या पुराण कथेची सार्थकता आम्ही त्याक्षणीं अनुभवली."

एरवीं दामोदर कुंड हें एक लहानसें कुंड आहे. जेथें वनस्पती नाहीं, वृक्ष किंवा झाडें-झुडपें नाहींत. जीवजंतू नाहींत. फक्त खुरटें गवत तेवढें उगवलेलें दिसतें. अशा ह्या कुंडामध्यें दैवी तत्त्व आहे, तें सामान्य स्थितींत माणसाला दिसणार नाहीं. अंतर्मनाच्या चक्षूंद्वारें जेव्हां या परिसराचें दर्शन घडतें, तेव्हां देहबंधन गळून पडून आपलें मन त्या भगवान् तत्त्वाशीं एकरूप होत असतें.

यात्रेचे अदम्य आकर्षण लहानपणापासून होतेच. नित्य नवे अनुभव घेऊन अवलोकन, परिशीलन, चिंतन व मनन करून ज्ञानाचीं क्षितिज्ञें कशीं विस्तारतात आणि अशा रीतीने प्राप्त झालेलें ज्ञान कसें अवीट असतें याचा खुद्द स्वामीजींनी अनुभव घेतला. प्रत्येक यात्रे अखेर माविन्दें आयोजित करण्याचा प्रघात असतो. एक प्रकारें यात्रेची फलश्रुति स्वीय मंडळीला विदित करणें हा असतो. या कष्टप्रद यात्रेच्या फलश्रुतिबद्दल विचारतां पूज्य श्री विद्याधिराजतीर्थ उत्तरले:

"आम्ही पुराणें वाचलीं, धर्मशास्त्राचें अध्ययन केलें आणि जें वाचलें-जाणलें तें पडताळूनहि पाहिलें, इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, अध्यात्म यांचा इतका नितांत सुमेळ इतरत्र सांपडणार नाही. पुराणांत नमूद केलेल्या बहुतेक तीर्थांची आम्ही यात्रा केली. ती धन्यता आगळी-वेगळी. परंतु ज्या दामोदर कुंडाचा, गंडकी नद्यांचा शालिग्राम क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्यें आढळला, तें क्षेत्र कुठें आहे, तेथें कसें जायचें, हे प्रश्न मनांत घोळत राहिले. नित्य पूजापाठ, स्वाध्याय, लोकसंपर्क, धार्मिक योग, हवनें आदि उपक्रम चालू असतांनाच आणि परंपरागत संन्यस्त धर्माचें पालन करतांना दामोदर कुंडाची जिज्ञासा भागविण्यासाठीं शोध-संशोधन अखंड चालू राहिलें.

"अचानक एके दिवशीं आमच्या मठ परंपरेंतील तिसरे यतिवर्य श्रीजीवोत्तमतीर्थ यांच्या यात्रांच्या नोंदी वाचनांत आल्या. ते शके १४४० (इ. सन १५८८) मध्यें मुक्त झाले. आपल्या सत्तर वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी आपलें नांव सार्थ केलें. मठाचें नांव उन्नत केलें आणि त्या काळीं अत्यंत दुर्गम अशा यात्रा केल्या. आपल्या तीर्थयात्रांची नोंद त्यांनी 'तीर्थावळ' या आपल्या काव्यांतून सूचक, बोधक शब्दांमध्यें लिहून ठेवली आहे. सदेह वैकुंठाला गेलेले यतिवर्य अशी त्यांच्या बाबतींत आख्यायिका सांगितली जाते. महानिर्वाणाच्या वेळीं सोदे मठाचे वादिराजतीर्थ यांना ते वैकुंठाला जात असल्याचा भास झाला होता. या गोष्टीचा भक्तगण आवर्जून उल्लेख करतात. त्या आख्यायिकेमध्ये तथ्य किती आहे याची छाननी करण्यांत अर्थ नाहीं. पण एवढी गोष्ट खरी कीं श्री जीवोत्तमतीर्थ त्या योग्यतेचे होते.

"जर साडेचारशें वर्षांपूर्वी श्री जीवोत्तमतीर्थ गंडकी यात्रेची यशस्वी परिपूर्ति करूं शकले, तर आपणहि ती केलीच पाहिजे असें आमच्या मनानें घेतलें आणि तो योग जुळून आला."

एक प्रश्न राहून राहून मनात येतो. पीठा रोहणानंतर जमिनीवर आडवे झोपून देवपूजा करणारे स्वामीजी समुद्रसपाटी पासून २०,००० फूट उंचीवर असलेल्या दुर्गम, खडतर अशा प्रदेशांत पायी चालून तीर्थयात्रा कसे करूं शकले? अशा यात्रांचा प्रकृतीवर परिणाम झाला नाही काय? असे मी अनेकदां विचारलें. त्यांचेच शब्द वापरून या प्रश्नाचें उत्तर मी येथे देत आहे.

"आमची प्रकृती नेहमी नाजूक राहिली आहे. पाठकण्याच्या मणक्यांना झालेल्या इजेमुळें दोन्ही पांयांची शक्ती बरीच घटली आहे. बसलों तरी वेदना, पहुडलों तरी वेदना, अशी ती अवस्था. वेदनाशामक औषधें सेवन करण्यास आम्ही स्पष्टपणे नकार दिलेला आहे. समाजासाठी देवगुरुच्या साक्षीने ज्या संन्यस्त व्रताची दीक्षा घेतली, त्याच्या साऱ्या यमनियमाचें कांटेकोर पालन व्हावे असा आमचा आग्रह. त्याबाबत तडजोड करणे ही आत्मवंचना ठरेल. संन्यास दीक्षेनंतर विशेषतः गुरुपीठारोहण झाल्यानंतर नित्यपूजा व नैमित्तिक यज्ञयाग-अनुष्ठानें क्रमप्राप्त झालीं आहेत. शिखरकलशप्रतिष्ठा देखील करावी लागते. पीठाधीश या नात्याने या कर्तव्यांत कसूर ठेवतां येत नाहीं.

"सुरवातीला आम्ही पाठकण्याच्या वेदना सुसह्य व्हाव्यात म्हणून पहुडलेल्या अवस्थेंत कांही काळ पूजा केली. सभा-संमेलनामध्ये देखील अशा अवस्थेंत आशिर्वचनपर

भाषणें देखील केलीं. परंतु मागाहून आम्हाला अशी प्रचीति आली, संकल्पाला निर्धाराची जोड मिळाली आणि भगवंताची कृपादृष्टि राहिली तर तो संकल्प सिद्धीस जात असतो. वेदना कमी झाल्या किंवा प्रकृति सुधारली अशांतला भाग नव्हे. आमच्या अंदाजप्रमाणें पांयांची शक्ती मंद होत राहिली आहे. तरी देखील नित्य पूजापाठ, मठाधीश या नात्याने पार पाडावयाचीं कर्तव्यें, यज्ञयाग, अनुष्ठानें, देवप्रतिष्ठा समारंभ, शिखर प्रतिष्ठा आदि कार्यक्रमांना आम्ही सहर्ष हजर राहात असतों. समाजासाठी जीवन अर्पण करायचे तर समाजाच्या अपेक्षानाही उतरावे लागतें. कर्ता करविता भगवंत आहे. त्याची इच्छा असेल ते कार्यहि आमच्या हातून घडेल हा विश्वास मनात दृढ होत गेला. तीर्थाटने व खडतर यात्रा करण्याची प्रेरणा आम्हाला संतवचनातून मिळाली. संतवचने फार बोधक, वेधक व सुरेख असतात. देवकृपेने पंगू देखील पर्वत पार करीत असतील तर आम्ही मागे कां रहावें? आमच्या सत्प्रवृत्तीला भगवंताचे अधिष्ठान आहे असें आम्ही मानतों आणि त्या भावनेनेच क्लेश-वेदना बाजूला सारून कर्तव्यपूर्तीच्या कामासाठी तत्परतेने पुढे सरसावतों.

"वैद्यकीय अहवाल तितकेसे उत्साहवर्धक नाहींत. जो देह धारण केला, त्या देहाचे भोग चुकणार नाहींत, परंतु आत्मबळ नांवाच्या तत्त्वांची जी वस्तु असते तिची शक्ती अलौकिक असल्याचा अनुभव आम्ही घेत आहोंत. हा आत्मप्रौढीचा प्रकार नव्हे. तुमच्या प्रश्नाचे सरळ व प्रांजळ उत्तर आहे. हाहि एक यज्ञच. भगवंताची इच्छा असेल तोंवर प्रज्वलित राहील. आपला संकल्प कच्चा राहिला, निर्धार कमी पडला असें घडूं नये एवढीच तळमळ असते."

एक यात्रा म्हणजे अनुभवाची एक गाथा असते. जीवन पथावरून वाटचाल करताना असे अनेक अनुभव बुद्धि व मन समृद्ध करतात. पण पुष्कळदां पुष्कळशा भाग्यवंतांना श्री सान्निध्याचा अनुभवहि येतो. पूज्य विद्याधिराजतीर्थ त्याबद्दल सांगतातः

"सांगण्यासारखे अनुभव अनेक आहेत. यात्रेमध्यें जेव्हां जीवसृष्टी व वनस्पतीसृष्टी यांच्यापासून मुक्त अशा प्रदेशांतून संचार होऊं लागला तेव्हां एके दिवशीं एक विलक्षण संकट समोर उभें राहिलें. आकाशांतून मोठाल्या गारा झडूं लागल्या आणि वातावरणांत तुफान आलें. एका दिवसाच्या वाटेवर दामोदर कुंड असताना आलेलें हें संकट पाहून स्थानिक वाटाडे व मदतनीस माघारी परतले. निष्ठावंत सहयात्री आमच्या आज्ञेची वाट पहात होते. आम्ही क्षणभर ध्यानस्थ बसलों. येथपर्यंत येऊन रिक्त हस्तें परत जायचें काय? यात्रेला निघताना श्रीरामदेवाने निष्कलंक अभयाचा

शब्द दोनदां दिला होता, तो निरर्थक ठरणार काय? काय व्हायचें तें होवो, यात्रेंत खंड पाडायचा नाहीं, असा कौल आमच्या मनानें दिला. या यात्राकाळांत आम्ही मौनव्रताचें पालन करीत होतों. सहयात्रींना हातानेच पुढील मार्गक्रमण करण्याची सूचना दिली आणि आम्ही उठलों. तत्क्षणीं एक दैवी साक्षात्कार झाला. तो भास होता, अंतर्मनाचा कौल होता कीं विष्णु परमात्म्याचा दिलासा होता हें सांगतां येत नाही. पण आदेश स्पष्ट होता. "यतिश्रेष्ठा, ज्या निष्ठेने व श्रद्धेने आणि ज्या जिद्दीने व ध्यासाने तुम्ही येथवर आलांत ती साधना व्यर्थ जाणार नाहीं. पुढे जा. तुमच्या यात्रेची परिपूर्ति निर्विघ्नपणें होईल."

"गिमू खिंड पार केली, तेवढ्यांत ईशान्येकडील आभाळ निरभ्र होऊं लागलें. अचानक अंगावर आकाशांतून अक्षता झडल्या. साबुदाण्याच्या आकाराचे ते बर्फाचे गोळे अंगावर झेलताना पुनित-पावन झाल्याचा... संकट टळल्याचा भास झाला. मन निश्चिंत झालें. कृष्णमेघाच्या कडा चकाकल्या. सोनेरी सूर्यकिरण हिमाच्छादित पर्वत शिखरांवरून परावर्तित होऊन आसमंत प्रसन्न करते झाले. देवधामांतील दीप प्रज्वलित झाले होते. आणि अहो आश्चर्यम्! आकाशांतून पुष्पवृष्टीहि झाली. तुंब्याच्या फुलां सारखीं शुभ्रधवल, नाजूक, कोमल फुलें अंगावर झेलतां झेलतां अदृश्य व्हायचीं. एकहि फूल बोचलें नाहीं. आम्ही मनोमन श्रीविष्णूचें स्मरण केलें. जणूं वैकुंठ... भगवान विष्णूच्या हृदय मंदिराचें महाद्वार सताड खुलें झालें होतें.

"दामोदर कुंडांत प्रवेश करून जगन्नियंत्या सूर्यनारायणाला अर्घ्य अर्पण केलें. श्रीमठाच्या आराध्य देवप्रतिमेस अभिषेक पूजा केली आणि मठपरंपरेंतील वावीसहि स्वाम्यांचें उत्कटतेनें स्मरण झालें. श्रीधर आचार्य शेजारींच होते. आमच्या मनांतील भावना त्यांनी जाणल्या आणि मुक्त कंठाने गुरुपरंपरा स्तोत्राचें अस्खलित पठण केलें. एका एका गुरुवर्यांची आकृति मनःचक्षूंसमोरून सरकत राहिली आणि जेव्हां पठण थांबलें, तेंव्हां निरव स्तब्धता आसमंतांत पसरली."

# ११. स्वामीजींच्या जीवनयात्रेंतील तीन टप्पे


गेल्या पांच तपांच्या कालावधीचा आढावा घेताना प.पू. स्वामीजींच्या जीवनातील तीन टप्पे ठळकपणे नजरेंत भरतात. २३ ऑगस्ट १९४५ सालीं कर्नाटकांतील दक्षिण कन्नड जिल्ह्यांत असलेल्या पंचगंगावळी अथवा गंगोळी या नांवाने सुपरिचित असलेल्या सागर किनाऱ्यावरील लहानशा खेडेगांवांत जन्म घेतलेले राघवेंद्र आचार्य हेच पुढें सुविख्यात श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे पीठाधीश झाले. पांच नद्यांचा संगम असलेल्या या गंगोळी क्षेत्रांत जन्मलेले प.पू. श्री द्वारकानाथतीर्थ स्वामीजी हेहि सेनापुर आचार्य घराण्यातील सुपुत्र होत. उभयतांमध्ये पूर्वाश्रमीचे चुलते व पुतणे असें नातें होतें. अर्थात् ज्या वेळी श्री द्वारकानाथतीर्थ स्वामीजी गुरुपीठावर आले (१९४३), त्यावेळी राघवेंद्र आचार्य यांचा जन्महि झाला नव्हता. १९६७ सालीं राघवेंद्र आचार्य यांचा संन्यासदीक्षा सोहळा मुंबईतील श्री द्वारकानाथ भवनात संपन्न झाला आणि ५ एप्रिल १९७३ रोजीं पर्तगाळ येथील मूळ मठांत त्यांचा पट्टाभिषेक संपन्न झाला. अशा रीतीने जीवनातील तीन टप्पे गृहित धरून आपण त्यांच्या जीवनाचें मूल्यमापन केलें पाहिजे. पहिल्या टप्प्यांत बालपण व विद्यार्थी जीवनाचीं एकूण २१ वर्षे सामावतात. पुढच्या टप्प्यांत सात वर्षांचा संन्यासाश्रमातील मठाधिशांचे उत्तराधिकारी म्हणून श्रीगुरुंच्या सान्निध्यांत घालविलेल्या कालावधीचा अंतर्भाव होतो. तदनंतर गेलीं बत्तीस वर्षे हा श्रीगुरुपीठावर आल्यानंतरचा कालावधि. या वर्षीं इसवी सनानुसार २३ ऑगस्ट २००५ रोजीं ते साठीचा उंबरठा ओलांडून एकसष्ठींत पदार्पण करणार आहेत. शालिवाहन शकानुसार पार्थिवनाम संवत्सर, शके १९२७, श्रावण शु. चतुर्दशी या दिवशीं शिष्यपरिवार वर्षपद्धतीनुसार त्यांचा जन्मदिवस या वर्पी श्रीगुरु अभिवंदना दिवस म्हणून वैभवशाली पद्धतीने साजरा करणार आहेत.

सेनापुर आचार्य घराणें हें सनातनी प्रकृतीचें व प्रवृत्तीचें म्हणतां येईल. या

घराण्यांत वेदवेदांगें व धर्मशास्त्रांत नांवलौकीक मिळविलेले अनेक विद्वान् जन्माला आले व त्यांनी समाज व धर्माची तसेंच देवगुरुची विपुल सेवा केली. अडल्या नडल्या प्रसंगीं गांवकऱ्यांना यथोचित मार्गदर्शन केलें. लहान सहान आजारांत आयुर्वेदीक शास्त्रांनुसार औषधोपचार केले. सणा सुदीच्या दिवसांत उत्सवाचें महत्त्व विषद करून प्रवचने देणारे विद्वानहि या घराण्यात जन्माला आले आणि पूर्वाचार चालत आलेल्या प्रथेनुसार या धर्मकार्याची परंपरा अखंड ठेवण्यासाठी एका पिढीने संपादन केलेले ज्ञान दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द करण्याची परंपरा चालू ठेवली.

पण दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर साऱ्या जगांत प्रचंड उलथा पालथ झाली होती. भारतावर ब्रिटीश राजसत्ता सर्वव्यापी व सर्वस्पर्शी होऊन बसली होती. इंग्रजी भाषेचा प्रसार व प्रचार इतक्या जोरांत चालला होती की ते शिक्षण घेणारे वाघिणीचे दूध प्राशून नव्या युगाला सामोरे जाण्यास तयार होतात असे बुद्धिवादी वर्ग देखील मानू लागल्या होता. दुसरीकडे इंग्रजी साम्राज्याला संघटीत प्रतिकारहि वाढूं लागला होता. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाने सारा देश प्रभावित झाला होता आणि आसेतु हिमाचल देशभक्ती व राष्ट्रवादाने नवें उग्र स्वरूप धारण केलें हातें. त्या पार्श्वभूमिवर अनेकांनी इंग्रजीचा बहिष्कार करण्यास सुरवात केली तरी इंग्रजी भाषेचें ज्ञान हानिकारक नाहीं किंवा ती भाषा शिकून घेतल्याने राष्ट्रद्रोह केल्या सारखें होणार नाहीं असा विचारहि पुढें येत होता.

मातृभाषा कोंकणी शिवाय कन्नड व संस्कृत या भाषांवर प्रभुत्व असलेल्या सेनापुर आचार्य घराण्याच्या एखाद्या सदस्याने इंग्रजी भाषेचें ज्ञान संपादन केलें तर तेणें करून नुकसान कांही होणार नाहीं, उलट नव्या युगाबरोबर पावले उचलण्याची क्षमता प्राप्त होईल या विचाराने घरचें वातावरण कर्मठ असतानाहि लहान वयांतच आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून बसलेल्या राघवेंद्राला इंग्रजी शिक्षण घेण्यासाठीं प्रवृत्त केलें. अर्थपूर्ण, भावपूर्ण व शैलीदार कन्नड भाषा बोलण्यात व लिहिण्यात पटाईत असलेल्या त्या विद्यार्थ्याने संस्कृत भाषेवरहि प्रभुत्व मिळविलेलें होतें. या भाषांतील साहित्याचें परिशीलन करून आपली गुणवत्ता वाढविली होती. कोंकणी भाषेवर देखील त्यांचें असामान्य प्रभुत्व होतें आणि संस्कृत भाषेच्या प्रभावामुळें त्यांच्या संभाषणांत घोळणारी कोंकणी भारदस्त झाली होती. हिंदी भाषेचें ज्ञान शालेय शिक्षणाबरोबरच प्राप्त झालें होतें आणि चिकित्सक भाषा शास्त्रज्ञाची वृत्ति व



श्री स्वामीजी बद्रिनाथ येथील वास्तव्यांत

दृष्टी असलेल्या तरूण राघवेंद्रला मराठी भाषा आत्मसात करणें अवघड गेलें नाहीं. या सर्व पार्श्वभूमिमुळें कुंदापूर येथील महाविद्यालयांत पदवी परिक्षेचें शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्याकडे अध्यापक व सहपाठी विद्यार्थी यांचें लक्ष वेधलें. मितभाषी असलेला हा विद्यार्थी सहसा कसल्याच बाबतींत पुढाकार घेत नव्हता. पण अगदीं बारकाईने भोवतालच्या परिस्थितीचें अवलोकन करून आपल्या विचार व कल्पनाना नवे आयाम देण्याचा प्रयत्न करीत होता. वर्ग सुटतांच ओढीने घरी परतायचें आणि मोकळ्या वेळेचा पुस्तकें वाचण्यात विनियोग करायचा असा हा विद्यार्थी. विद्यार्थी व अध्यापक वर्गामध्यें तो सर्वांच्या कौतुकाचा विषय बनला होता.

घरी येतांच घरांत वेगळें वातावरण असायचें. परंपरा व कर्मठपणा यांचे यमनियम पाळण्यासाठीं पूजा-प्रार्थना-उपासना, शास्त्र ग्रंथांचें परिशीलन करणे क्रमप्राप्त असायचें. अशा ह्या शांत-निवान्त जीवन जगणाऱ्या तरुणाला अचानक एका प्रचंड वादळाने घेरलें. श्रीरामनाथ हें या कुटुंबाचें कुलदैवत आणि श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ हें त्यांचें गुरुपीठ. एके दिवशी संध्याकाळीं राघवेंद्र कॉलेजमधून घरीं परततांच स्वतः मातोश्रीनी त्याच्या कानावर एक अविश्वसनीय वार्ता घातली. मठाधिशांनी आपला शिष्य म्हणून राघवेंद्राची निवड केलेली असून मठातर्फे एक शिष्टमंडळ गंगोळी येथें यायचें आहे. होकार देणें किंवा नकार देणें हें सर्वस्वी माता-पिता व वटूवर अवलंबून असलें तरी पूर्वाश्रमीचे आपले चुलते, शिवाय पीठाधीश या नात्याने आदरणीय व पूजनीय अशा स्वामीजींचा शब्द हा दैवी आदेश मानला पाहिजे या भावनेने, 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असो द्यावें समाधान ।।' हा संतांचा उपदेश तरूण बटूने शिरोधार्य मानला आणि प्रापंचिक कर्तव्यें व जबाबदाऱ्या यांचीं अंगावर धारण केलेलीं वस्त्रेंच नव्हे तर तत्संबंधींचे विचार देखील मनातून काढून टाकले आणि गुरुसेवा व देवपूजा हीं नित्यकर्मे होऊन बसली. परंतु आरंभाचीं पंचवीस वर्षें निरस गेलीं असें कुणी समजूं नये. काव्य, शास्त्र, विनोदाची आवड असलेला हा तरुण एका शिस्तबद्ध आज्ञाधारक विद्यार्थ्याचे जीवन जगला. आई घरांत धार्मिक ग्रंथांतील वेंचक वचने नित्यशः बोलायची आणि तीं काळजीपूर्वक ऐकून राघवेंद्राचें चिंतन सुरू व्हायचें. वडिलांबद्दल अत्यादर असला तरी थोडा संकोच असायचा. तेवढाच दुरावा. पण मातोश्रीच्या तोंडून निघणारा हितोपदेश निर्मळ अंतःकरणावर उठावदार ठसा उमटवीत होता.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात तशाच प्रकारचा एक प्रसंग राघवेंद्रच्या बालपणांत घडला होता. आईने कधीं तरी सांगितलेली गोष्ट. गोष्ट १९५२ सालांतली. कुलदेव रामनाथ पोर्तुगीज अधिसत्ते खालील गोव्यांत आहे. वैशाख महिन्यांत अक्षय्य तृतीयेच्या मंगल दिनीं कुलदेवाच्या सन्निधींत महासुदर्शन अनुष्ठानाचें आयोजन करण्यांत आलें होतें. अशा पर्वणीच्या प्रसंगीं कुलदेवाचें दर्शन घेण्याच्या संकल्पाने गंगोळी येथील लक्ष्मीनारायण आचार्य कुटुंबियांसह गोव्याच्या यात्रेला निघाले. सोबत पत्नी, एक कन्या व पुत्र राघवेंद्र अशीं चार माणसें. प्रवासाचीं साधने आजच्या सारखीं सुलभ नव्हतीं. एक रात्र पर्तगाळी मठांत वास्तव्य करायचें आणि दुसऱ्या दिवशीं रामनाथीकडे प्रयाण करायचें असें त्यांनी ठरविलें होतें. मंडळी कारवारहून बोरूसपर्यंत पोहोंचली. तोवर सूर्य अस्तंगत होऊन आसमंतांत अंधार पसरूं लागला होता. अंदाजाने एक वाट धरली व कसेंबसें पर्तगाळी मठांत पोचावें असा विचार केला. काळोख दाटला होता आणि वाट संपून संपत नव्हती. मंडळी अर्दफोंडपर्यंत पोंचली. वाट विचारायची म्हटल्यास जवळपास कोणी दिसेना. अचानक समोरून एक बैलगाडी आली. बैलांच्या गळ्यांतील घंटांचा निनाद धीर देऊन गेला. आचार्य महाशयांनी गाडीवानाकडे पर्तगाळीला जाण्याच्या वाटेची चौकशी केली.

"मग तुम्ही इथं कुठं चालला? ही वाट रानांत जाते. चला, मी तुम्हाला वाट दाखवतों."

मंडळी बैलगाडीच्या बाजूने चालूं लागली. आफ्रामेंतजवळ पोंचतांच गाडीवान म्हणाला, "तुम्ही इथेंच थांबा, मी कुणाला तरी बोलावून घेतों. तो तुम्हाला मठापर्यंत पोचवील."

गाडीवानाने हांक मारली आणि अंधारांतून हातांत मशाल घेऊन एक माणूस अवतरला.

"यांना मठाजवळ पोचव." गाडीवानाने बजावलें.

त्या वाटाड्याने नुसता हुंकार भरला. मशालीच्या उजेडांत पावलें उचलताना राघवेंद्र अडखळत होता. त्याचीं पावलें ठेंचाळत होतीं. राघवेंद्रला खांद्यावर घेण्यास त्या वाटाड्याने हात पुढें केला. पण दुसरे लोक चालत जातांना आपण कुणाच्या तरी खांद्यावर बसून जावें यांत पुरुषार्थ कसला, या विचाराने राघवेंद्राने स्पष्ट नकार

दिला, पण वाटाड्याने धरलेला हात सोडवून घेतला नाहीं.

मंडळी मठाच्या प्रांगणांत मुख्यप्राणाच्या घुडाजवळ पोंचली. वाटाड्याने राघवेंद्रचा हात सोडला आणि मठाकडे अंगुलिनिर्देश करून म्हटलें,

"हा तुझा मठ बरं का!"

वाटाड्याचे आभार मानायला हवे. त्याला थोडी बिदागी द्यायला हवी या विचाराने कोटाच्या खिशांतून नाणीं हातांत घेऊन लक्ष्मीनारायण आचार्य पाहतात तों वाटाड्या अदृष्य झालेला. मशाल देखील विझलेली. हा काय प्रकार आहे हें कुणालाच कळेना. तो चमत्कार होता, दृष्टांत होता कीं सहज स्वाभाविक अशी घटना होती?

अशा लहान मोठ्या गोष्टी त्यानंतरहि अनेक घडलेल्या आहेत. परंतु अशा घटना चमत्कार मानण्यास श्री विद्याधिराजतीर्थ कबूल नाहींत. जाणकारांनी तो नारायणभूताचा प्रताप असल्याचा तर्क केला. तसें नसावें असे राघवेंद्रला वाटत होतें. पुढें संन्यास दीक्षेसाठीं मनाची तयारी करतां करतां वाटाड्याच्या तोंडचें वाक्य कानांत घुमूं लागलें,

"हा तुझा मठ बरं का!..."


❀

संन्यास दीक्षा मुंबईंत झाली आणि सर्व आवश्यक संस्कार व सोपस्कार पूर्ण करून राघवेंद्रने पूर्वजीवन विसरून नवें रूप, नवी वेषभूषा, नवीन व्रतें व वैकल्यें यांसह नव्या आश्रमांत प्रवेश केला आणि मग खडतर साधना सुरू झाली. विद्यार्थी जीवनात संचित केलेलें ज्ञान व अनुभव, त्याचप्रमाणे घरच्या धार्मिक व अध्यात्मिक वातावरणाचे संस्कार संन्यासाश्रमात देखील उपयुक्त ठरले. जीवन खडतर व तप्त साधना करणारें असलें तरी जुन्या अनुभवाची शिदोरी अनेक कसोटीच्या क्षणी शीतल छाये सारखी मदतीला यायची. या आश्रमांत चित्तशुद्धीची अत्यावश्यकता असते, कारण केवळ चित्तशुध्दि द्वारेच मानसिक संतुलन राखतां येतें, जें संन्याशासाठीं आवश्यक असतें.

स्वाध्याय, अनुभवी पंडितां कडून प्रबोधन आणि विरक्त विद्वान् व व्यवहार निपुण म्हणून ख्याति पावलेल्या गुरुवर्य श्री द्वारकानाथतीर्थांचें सान्निध्य व सहज बोलतां बोलतां जीवनाचीं कडु-गोड सत्यें प्रिय शिष्याच्या निदर्शनास आणून देण्याची

लकब, मठ परंपरेंत न बसणारे असेल त्याचा त्याग करून, उदात्त मुल्यांचें पालन करण्याचा आग्रह धरून, त्याच बरोबर बदलत्या युगानुरूप तत्त्वाशीं तडजोड न करतां आणि समाजाशीं फारकत येऊं न देतां निर्धारीत मार्गाने पुढे जाण्याचा निर्धार; पहातां पहातां एका संन्याशाचें जीवन मठ परंपरेशीं एकरूप झालें. मठाच्या संग्रहालयांत असलेल्या पुरातन कागदपत्रांचें परिशीलन, ग्रंथालयांतील दुर्लभ, दुर्मिळ ग्रंथांचें वाचन, परंपरेंतील गुरुवर्यांच्या वासरिकांचें अध्ययन आणि या सर्व ज्ञानाचें अविरत चिंतन करून कांही ठोस निष्कर्षाप्रत येण्याचें काम या कालावधींत पूर्ण होऊं शकलें. बुद्धिमत्ता अत्यंत विलक्षण, तीव्र स्मरणशक्ती, नीरक्षीर न्यायाची वृत्ति, चारहि दिशांचे विचार ऐकून घेऊन त्यांतील त्याज्य तें टाळण्याचा विवेक, हे सारे गुण त्या सहा वर्षांच्या कालावधींत त्यांच्या व्यक्तिमत्वामध्यें साकारूं लागले. गुरुशीं सुसंवाद हा बौद्धिका सारखा असायचा आणि त्यांच्या समवेत केलेल्या तीर्थयात्रा या इतिहास, भूगोल व ज्ञानविज्ञानाच्या परिक्रमा ठरायच्या. पुराणें व इतर धार्मिक ग्रंथांमधील विशिष्ट देवप्रतिमा व मंदिरांच्या कल्पना शिष्याला समजावीत असतानाच आख्यायिका व वदन्ता कितीहि रम्य असल्या तरी बुद्धीच्या कसोटीवर उतरल्या तरच स्वीकाराव्यात. त्यांना अवास्तव महत्त्व देऊं नये असें ते सांगत. त्याच बरोबर भिन्न भिन्न प्रदेशांतील भौगोलिक परिस्थिती, तेथील इतिहास, त्या स्थळांचें महत्त्व व महात्म्य, धार्मिक व पौराणिक ग्रंथांतील त्या स्थळाचे संदर्भ यांसारख्या विषयां प्रमाणेच मठाच्या व्यवहारांत उपस्थित होणारे प्रस्न, समाजाचे अंगिभूत गुणदोष, देव मंदिरांतील पूजा-उपासना, उत्सव-महोत्सव, धार्मिक यज्ञयाग, जप-तप-अनुष्ठाने, आध्यात्मिक साधनेद्वारे जलापासून अलिप्त राहणाऱ्या कमळाची वृत्ति आत्मसात करण्याची आवश्यकता गुरु पटवीत. त्यामुळे शिक्षण सुलभ झालें आणि बुद्धीला योगविद्येची जोड मिळाल्याने ज्ञान संचित करण्याची कलाहि अवगत झाली.

पण तेवढ्यांत एक लहानसा अपघात घडला. स्नानगृहांत पाय घसरून ते पडले आणि पाठकण्याच्या एका मणक्याला किंचित् दुखापत झाली. असह्य वेदना आणि उभे राहणे व चालणेहि दुरापास्त होऊन बसलें. जगांतील सर्वोकृष्ट उपचार उपलब्ध व्हावा म्हणून गुरुवर्यांनी व शिष्य परिवाराने आटोकाट प्रयत्न केले. पण कुणालाच यश मिळालें नाहीं. वेदना इतक्या तीव्र असायच्या की अत्यंत संयमी व सोशिक संन्यासी कधीं कधीं कण्हत असत. भल्या भल्या डॉक्टरांनी हात टेकले



चंद्रभागेच्या पात्रांत श्री स्वामीजी

आणि शेष जीवन असेच अंथरुणात आडवे पडून घालवावें लागेल असा अभिप्रायहि व्यक्त करून ठेवला. त्यांतहि श्री विद्याधिराजतीर्थ वेदनाशमक औषधें घेण्यास वा आरामदायी इंजेक्शने टोचून घेण्यास स्पष्ट नकार देत असत. त्यामुळे डॉक्टर देखील हतबल झाले होते. त्याच अवस्थेंत त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात आली. त्या वेळीं पाठकण्याचा भाग वधीर करण्यासाठीं डॉक्टरांनी इंजेक्शन देऊ केलें तेव्हां ते म्हणाले, 'वेदना आम्ही सहन करूं, पण आमच्या शरिरांत आमच्या प्रकृतीशीं विसंगत अशीं तत्त्वें पोचतां कामा नयेत.' डॉक्टरांपुढे पेंच निर्माण झाला. वेदना किती असह्य असतील याची डॉक्टरांना कल्पना होतीच आणि त्या अल्पावधि साठीं नसून शस्त्रक्रियेचे घाव बुजेपर्यंत राहतील याची त्यांनी श्री स्वामीजींना जाणीव करून दिली. तरी त्यांचा निर्धार बदलला नाहीं. आणि अक्षरशः ती शस्त्रक्रिया चालू असताना वा नंतर देखील वेदनांच्या कळा ते मुकाट्याने सहन करीत राहिले.

अमेरिकेंतील डॉक्टरहि जेव्हां थकले तेव्हां स्वामीजींनी निर्धार केला आणि केवळ आपल्या मनोबलाच्या आधारें ते स्वतःच्या पायावर उभे राहिले. वेदनांची पर्वा न करतां मांडी घालून बसून नित्यपूजा करूं लागले. ठिकठिकाणी संचार करून समाज संपर्काचें कार्य व्रतनिष्ठेने सुरू केलें. इतकेंच नव्हे तर हिमालयांतील विविध तीर्थस्थानांची आणि विशेष म्हणजे गंडकी क्षेत्राची, श्री दामोदर कुंडाची अत्यंत दुर्मिळ, दुर्लभ, दुर्गम व खडतर अशी यात्रा पायीं चालून केली. समुद्र सपाटी पासून सुमारे वीस हजार फूट उंचीवर बर्फाचा पाऊस व तुफानी वादळाचा सामना करीत त्यांनी केलेली यात्रा हें एक दिव्यच होतें. पण या सर्व यात्रा करूनहि आपल्या मनोबलाच्या आधारें कोणत्याच प्रकारचा थकवा त्यांना जाणवला नाहीं. उलट तीर्थयात्रे अखेर कार्यसिद्धीचें समाधान त्यांना मिळालें. कधीं कधीं मी त्यांच्यांतील दिव्यत्वाचा उल्लेख करतों अशा प्रसंगीं या तत्त्वाची प्रचीति येत असते.

गेल्या बत्तीस वर्षांच्या त्यांच्या कार्यकालांत कसोट्या अनेक आल्या. अवघड व अशक्य दिसणाऱ्या संकल्पांपासून त्यांना परावृत्त करण्याचे शिष्यपरिवाराने अनेकदां प्रयत्न केले. आपल्या संकल्पाला प्रभु रामचंद्राचें अधिष्ठान आहे अशी खात्री पटतांच ते शिष्यपरिवाराचा प्रेमळ प्रतिकार हसत हसत दूर सारून संकल्पाच्या यशापयशाची जबाबदारी स्वतःकडे घेत. जीवन हें जगण्यासाठीं असतें; भगवंताने निर्मिलेल्या या अनंत विश्वांत सौंदर्य व जीवनाचें काव्य रचून ठेवलेलें असताना

स्वतःस त्या कार्यक्षेत्राच्या कुंपणांत बंदीस्त करून ठेवणे हें दुबळेपणाचें लक्षण आहे, असें ते मानीत आले आहेत. जीवन जगण्यासाठीं असतें. मरण हें कधींतरी येणारच, एवढ्यासाठीं जीवनाकडे पाठ फिरविणें योग्य नाहीं. अर्थांत हें जीवन भोगविलास, अनैतिक व व्यसनाधीन होऊं न देतां नराच्या अवस्थेपासून नारायणाच्या दिव्यत्वाकडे नेणारी साधना मानावे लागेल. एकदां तशा उदात्त भावनेने मन भरून आलें म्हणजे मग अशा व्यक्तीच्या मदतीला देवहि धावून येतो आणि जीवनपथावरील पथिक 'जेथे जातो तेथें तूं माझा सांगाती। चालविसी हाती धरोनियां।।' या संतवचनाचा आधार घेत असतो. या सर्व प्रवृत्ति चालू असतांना पीठाधीश या नात्याने आपलें समाजा बद्दल कांही कर्तव्य असतें याची जाण त्यांनी ठेवली आणि त्यांची कीर्ति दिगंत झाली. ठिकठिकाणच्या साधुसंतांकडून व मठाधिशांकडून त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रणें येऊं लागलीं आणि त्यांच्या योग्यतेची, विद्वत्तेची, आध्यात्मिक प्रवृत्तीची कदर होऊं लागली. सुस्पष्ट वाणींतून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाच्या शुद्ध व स्पष्ट उच्चारणाद्वारें शब्दसामर्थ्याचें श्रोत्यांना दर्शन घडविण्याची कला आणि वैचारिक घनता, व्यावहारिक बोधकता आदि तत्त्वांमुळें श्रोते मंत्रमुग्ध होऊन जातात. यामुळें त्यांच्या भक्तगणाचा वर्ग संप्रदाय व धर्मभेदा पलिकडे पसरलेला आहे.आध्यात्मिक साधना, अखंड स्वाध्याय, तीर्थाटनें, जाणकार पंडितांशीं सुसंवाद, समाजाशीं सतत संपर्क हीं त्यांच्या कारकिर्दीचीं कांही वैशिष्टें आहेत. त्याचबरोबर व्यावहारिक क्षेत्रांत त्यांनी घडवून आणलेले यज्ञयाग व अनुष्ठानें, धार्मिक व सामाजिक उत्सव-महोत्सव समाज जागृतीचें कार्य करून मठ व देवमंदिरांकडील समाजाचे संबंध त्यांनी दृढ केले. सर्व मठ व संप्रदाय व प्रदेशांतील सारस्वत समाजामध्यें ऐक्याची भावना वाढीस लावली, जुन्या मठवास्तूंचे जीर्णोद्धार केले आणि नव्या नव्या क्षेत्रांत नूतन मठवास्तू उभ्या केल्या. पर्तगाळ येथील मठाचा कायाकल्प घडवून आणला. आपल्या कक्षेंतील देवमंदिरांचे जीर्णोद्धार, नूतन प्रतिमा व शिखर कलशांची प्रतिष्ठापना करून त्यांच्या वैभवांत वाढ केली. देवळांतील व्यवहार करताना शास्त्रनियमांचें पालन व्हावें व देवमंदिराच्या पावित्र्याला धक्का लागूं नये यासाठीं कठोर उपाय योजून ते कार्यवाहींत आणले.


जीवनाला शिस्त द्यायची झाल्यास वक्तशीरपणा पाळला पाहिजे, असा श्री स्वामीजींचा आग्रह असतो. ते घड्याळ जवळ बाळगत नसतात पण ठरलेली वेळ कधीं चुकूं देत नाहींत. सामान्यतः परगांवांत दाखल होण्यासाठीं ते सायंकाळची वेळ

पसंत करतात, कारण दुपारची पूजा व महानैवेद्य करून प्रवासास निघणें सोयीचें असतें. व एकदां वेळ ठरली म्हणजे शहराच्या वेशीवरील पूर्वनिर्धारित स्थळीं वेळेवर हजर होतील. उशीर होण्याचा प्रश्नच नसतो. पण अगोदर पोंचले तर स्वागतासाठीं येणाऱ्या लोकांची तारांबळ उडूं नये म्हणून शहराबाहेर रस्त्याच्या बाजूला आपलें वाहन उभें करून ते थांबतात. वास्तव्य मठांत असो वा इतरत्र, घड्याळाच्या कांट्याच्या गतीने त्यांचे कार्यक्रम ठरलेले असतात. प्रातःकाळीं निर्माल्यपूजा, दुपारची महापूजा व रात्रीची पूजा यांच्या वेळा ठरलेल्या असतात. कितीहि महत्त्वाचीं कामें आलीं तरी हें वेळापत्रक बदलत नसतें. सामान्य दिवस असो अथवा उत्सव पुण्यतीथीचा असो, दुपारीं एक वाजण्यापूर्वीं मठांत आलेल्या भाविक तथा अतिथींच्या जेवणाच्या पंक्ती घातल्या पाहिजेत हा आग्रह. विशेषतः पाठशाळेंतील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊं नये याची दक्षता घेतली जाते. या शिस्तीमुळें कसलाहि कार्यक्रम, योजना, यज्ञयाग असो किंवा जीर्णोद्धार, दुरुस्ती वा नूतन बांधकामाचा प्रकल्प असो, ते शुभारंभासाठीं मुहूर्त निश्चित करताना कार्यपूर्तिसाठीं वेळापत्रक ठरवून टाकतात. त्यामुळें शिष्यपरिवारालाहि वेळेचें महत्त्व आपोआप पटूं लागलें आहे.

या गुरुवर्यांचा सहवास नित्य नवी प्रेरणा देणारा ठरला आहे. गंगेचें पाणी जसें अखंड प्रवाही असतें, तसे त्यांचे विचार नित्य नवा संदर्भ व अर्थ दाखवून जातात. काल वाहून गेलें तें गंगाजल आज वाहत असलेल्या गंगाजलाहून कमी पवित्र नाहीं. खरें म्हणजे त्यांत भिन्नत्व नसतें. पूज्य श्री स्वामीजींच्या सहवासांत प्रापंचिक व्यापतापांचा, विवंचना व दुःखांचा, इतकेंच नव्हे तर आकांक्षा व संभ्रमांचा विसर पडून आपण एका नव्या विश्वांत पोंचत असतों. सभोवतालचीं तींच माणसें, तोच परिसर, तेच प्रश्न, त्याच चर्चा; सुखेंहि तींच व दुःखेंहि तींच. या सर्वांपासून आपण अलिप्त आहोंत अशी भावना मनात उद्भवते. त्यासाठीं आपली पूर्वसाधना किंवा पुण्यसंचय असावाच असा आग्रह नाहीं; फक्त गुरुवर्यांचा स्नेहार्द्र कटाक्ष तेवढा पुरे!

## पूज्य स्वामीजींचे चातुर्मास

| वर्ष | स्थळ | गांव |
|---|---|---|
| १९६७ | श्री पर्तगाळी मठ | पर्तगाळ |
| १९६८ | श्री पर्तगाळी मठ | पर्तगाळ |
| १९६९ | श्री लक्ष्मी व्यंकटरमण मंदिर | पुत्तूर |
| १९७० | श्री शांतेरी कामाक्षी मंदिर | कुमठा |
| १९७१ | श्री व्यंकटरमण मंदिर | वेंकटापुर |
| १९७२ | श्री द्वारकानाथ भवन | वडाळा, मुंबई |
| १९७३ | श्री द्वारकानाथ भवन | वडाळा, मुंबई |
| १९७४ | श्री पर्तगाळी मठ | पर्तगाळ |
| १९७५ | श्री पर्तगाळी मठ | पर्तगाळ |
| १९७६ | श्री विठोबा मंदिर | कायाकुलम्, केरळ |
| १९७७ | श्री जीवोत्तम मठ | गोकर्ण |
| १९७८ | श्री लक्ष्मी नारायण मंदिर | वारणासी |
| १९७९ | श्री द्वारकानाथ भवन | वेंगळूर |
| १९८० | श्री रामनाथ देवस्थान | रामनाथी, गोवा |
| १९८१ | श्री लक्ष्मी व्यंकटेश मंदिर | उडुपी |
| १९८२ | श्री व्यंकटरमण मंदिर | कुंदापुर |
| १९८३ | श्री सरस्वती सदन | जयचामराजनगर, हुबळी |
| १९८४ | श्री व्यंकटरमण मंदिर | गंगोळी |
| १९८५ | श्री मारुती मंदिर | शहापुर, वेळगांव |
| १९८६ | श्री अनंत मंदिर | वद्रिनाथ |
| १९८७ | श्री वडेर मठ | भटकळ |
| १९८८ | श्री मारुती मंदिर | रिवण, गोवा |
| १९८९ | श्री वीरविठ्ठल मंदिर | अंकोला |
| १९९० | श्री लक्ष्मी व्यंकटेश मंदिर | उडुपी |
| १९९१ | श्री व्यंकटरमण मंदिर | गंगोळी |
| १९९२ | श्री गोकर्ण मठ | मंगळूर |
| १९९३ | श्री व्यंकटरमण मंदिर | कुमठा |
| १९९४ | श्री लक्ष्मी व्यंकटेश मंदिर | कल्याणपुर |
| १९९५ | श्री व्यासाश्रम मठ | डिचोली |
| १९९६ | श्री व्यंकटरमण मंदिर | शिरसी |
| १९९७ | श्री द्वारकानाथ भवन | वडाळा, मुंबई |
| १९९८ | श्री लक्ष्मी व्यंकटेश मंदिर | मंकी |
| १९९९ | श्री जीवोत्तम मठ | बसरूर |
| २००० | श्री क्षेत्र नासिक | नासिक |
| २००१ | श्री मुरलीधर मंदिर | कारवार |
| २००२ | श्री सरस्वती भवन | धारवाड |
| २००३ | श्री व्यंकटरमण मंदिर | यल्लापुर |
| २००४ | श्री भू-वैकुंठ श्रेत्र | पंढरपुर |
| २००५ | श्री रामनाथ देवस्थान | रामनाथीं, गोवा |



श्री विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी

## १. विविध प्रकारचीं धार्मिक होमहवनें व अनुष्ठानें

प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींच्या गेल्या बत्तीस वर्षांच्या कारकिर्दीत विविध प्रकारचीं धार्मिक होमहवनें मठानुयायी वर्गाकडून स्थानिक देवदेवतांच्या सान्निध्यांत पूज्य स्वामीजींच्या उपस्थितींत पार पडलीं त्यांमध्यें सहस्त्रकुंभ महाविष्णु, महारुद्र, शतचंडी, रक्षात्रय हवन आदि कार्यांचा समावेश आहे.

१. श्रीलक्ष्मीनारायण महामाया देवस्थान, अंकोला येथें अयुतचंडी व सहस्त्रचंडी (यजमान : वसंतराव धेंपे)
२. श्रीपर्तगाळ मठीं सहस्त्रचंडी
३. श्रीदामोदर संस्थान जांबावली येथें अतिविष्णु व अतिरुद्र (यजमान : गुरुदास दुकळे)
४. कुमठा अतिविष्णु
५. गुंडबाळा अतिविष्णु - (१९८८) व शतकोटि रामनाम यज्ञ (२००५)
६. मुंबईंत श्रीराममंदिराच्या प्रांगणांत कोटि रामनाम महायज्ञ, सहस्त्र रजत कुंभाभिषेक, १० दिवसांच्या सोहळ्यांत श्रीकाशी मठाधीश, श्रीकैवल्य मठाधीश व त्यांचे शिष्य, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी, उपमुख्यमंत्री, श्री. गोपीनाथ मुंढे, कर्नाटक राज्याचे बृहत् उद्योगमंत्री श्री. रघुनाथराव देशपांडे यांची उपस्थिति.
७. श्रीरामनाथ देवस्थानांत महासुदर्शन हवन आणि दोनदां अतिरुद्र.

## २. पूज्य श्री विद्याधिराजतीर्थानी केलेले मठ जीर्णोद्धार

१. वारणासी (१९७५)
२. बसरूर, कारवार, वेंकटापुर (१९७९)
३. गोकर्ण (१९८१)
४. भटकळ (१९८१)
५. पर्तगाळ मुख्यमठ (१९८४, ८६, ९९)
६. अंकोला (१९८८)
७. मंगळूर (नवग्रह प्रतिष्ठा) १९९१)
८. गंगोळ्ळी (१९९६)

९. वेंगळूर येथील लहानशा मठवास्तूचें भव्य वास्तूंत रूपांतर (१९८५)
१०. वास्को येथें छोटेखानी मठवास्तु शेजारीं बहुमजली भव्य वास्तु (१९९८)

(वास्को येथें श्री इंदिराकांत सभागृह या नांवाची एक मठवास्तु श्री द्वारकानाथतीर्थ यांनी बांधून घेतली होती. ही वास्तु वास्को शहराच्या वाढत्या गरजा भागवूं शकत नाहीं हें पाहून, मूळ वास्तूलगत नवीन मठवास्तु वांधली आहे.)

## ३. नवीन मठवास्तु

१. यल्लापूर (१९८३)
२. मंकी (१९८३)
३. हुबळी (१९८९)
४. बदरिकाश्रम (१९८९)
५. वेळगांव (१९९०)
६. दाण्डेली (१९९२)
७. मडगांव (१९९३)
८. परवरी शीलान्यास (१९९८)
९. नासीक (२००२)
१०. कंड्लूर (२००२)
११. भद्रावती (२००३)

## ४. कल्याण मंटप

१. भटकळ - श्रीनारायणतीर्थ कल्याण मंटप - (१९८१)
२. मंगळूर - श्रीद्वारकानाथ भवन - (१९८२)
३. रिवण - श्रीरामचंद्रतीर्थ मंडप - (१९८४)
४. गंगोळ्ळी - श्रीद्वारकानाथतीर्थ सभागृह - (१९८४)
५. अंकोला - श्रीविद्याधिराज सभागृह - (१९८९)
६. डिचोली - श्रीअणुजीवोत्तमतीर्थ मंडप - (१९९६)
७. बेंगळूर - विद्याधिराज सभागृह - (१९८५)
८. कारवार - इंदिराकान्त सभागृह - (२००१)

मठ परंपरेंतील यतिवर्यांच्या पुढील वृंदावनांचे जीर्णोद्धार श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकीर्दींत केले.

| | | |
|---|---|---|
| भटकळ | (१) | श्री नारायणतीर्थ (१९७४) |
| भटकळ | (२) | श्री जीवोत्तमतीर्थ - (१९७४) |
| पर्तगाळ | (२२) | श्री द्वारकानाथतीर्थ - (१९७४) |
| गोकर्ण | (४) | श्री पुरुषोत्तमतीर्थ - (१९७७) |

| | | |
|---|---|---|
| अंकोला | (७) | श्री दिग्विजय रामचंद्रतीर्थ - (१९९०) |
| | (११) | श्री रमाकांततीर्थ - (१९९०) |
| | (१४) | श्री भूविजय रामचंद्रतीर्थ - (१९९०) |
| डिचोली | (१५) | श्री रमानाथतीर्थ - (१९९४) |
| पर्तगाळ | (१६) | श्री आनंदतीर्थ स्वामी - (१९९५) |
| होन्नावर | (१३) | श्री श्रीकान्ततीर्थ स्वामी - (१९९५) |
| पर्तगाळ | | श्री नरहरितीर्थ (शिष्यस्वामी) - (१९९५) |
| | | श्री व्यासतीर्थ (शिष्यस्वामी) - १९९५) |
| होन्नावर | (८) | श्री रघुचंद्रतीर्थ |
| वेंकटापूर | (१०) | श्री लक्ष्मीकांततीर्थ |
| डिचोली | (५) | श्री अणुजीवोत्तमतीर्थ - (१९९५) |

## ५. नूतन विग्रह प्रतिष्ठा

१. वेंकटापुर - श्री लक्ष्मी व्यंकटेश
२. रामनाथी - श्री रामनाथ नूतन लिंग प्रतिष्ठा
३. म्हाडदोळ - देवतांची प्रतिष्ठा - (१९७७)
४. मादनगेरी - श्री वीरविठ्ठल प्रतिष्ठा - (१९७८)
५. मुर्डेश्वर - श्री लक्ष्मी-वेंकटेश - (१९७७)
६. माशेल - श्री देवकीकृष्ण देवप्रतिष्ठा - (१९७९)
७. वांदोडें - श्री महालक्ष्मी - (१९९०)
८. - श्री नारायण प्रतिष्ठा - (१९९१)
९. आर्के (मडगांव) - श्री मारुति प्रतिष्ठा (१९९२)
१०. खोल (काणकोण) - श्री लक्ष्मी नारायणाची पुन:प्रतिष्ठा - (१९९८)
११. कार्गल - श्री चौडेश्वरी आणि सप्तदेवतांची प्रतिष्ठा - (१९९८)
१२. अनंतनगर- बेंगळूर - श्री लक्ष्मी वेंकटेश व चार उपदेव प्रतिष्ठा (२००३)
१३. कोड्लमने - श्री लक्ष्मी वेंकटेशाची पुन:प्रतिष्ठा (२००४)
१४. वेलींग - श्री लक्ष्मी नरसिंह नूतन प्रतिमा प्रतिष्ठा (२००५)

## ६. अष्टमहाक्षेत्र यात्रा

अष्टवैकुंठ म्हणवून घेणाऱ्या या खालील आठ क्षेत्रांमध्यें श्री विष्णु भगवंत स्वयं प्रगट झाला असें गणले जातें. हीं क्षेत्रें क्रमशः अशीं आहेत :-

१. श्रीरंग - हे भूतलावरील वैकुण्ठधाम आहे. दक्षिण भारतांत त्रिशिरापल्ली अथवा तिरुचिनापल्ली नगरापासून तीन मैल अंतरावर आहे. येथें श्रीरंगनाथ भगवान् श्रीरंगलक्ष्मी समवेत प्रणवाकार विमानांत (गर्भगृह) दक्षिणाभिमुख होऊन शेषशय्येवर पहुडले आहेत. येथें कावेरी नदी, चंद्रपुष्करिणी आणि पुन्नाग वृक्ष आहेत.

कावेरीच्या दोन धारांमध्यें श्रीरंग द्वीप वसले आहे. या मंदिराचा विस्तार भारतांतील इतर कुठल्याहि मंदिरांत पहायला मिळत नाहीं. (- तीर्थांक पृ. ४९०व ३७१)

२. तिरुपती - वेंकटाचल पर्वतावर आकाशगंगा, पापनाशनतीर्थ, वगैरे तीर्थस्थानें आहेत. श्रीवेंकटेश्वर भगवंताचे स्थान ज्या पर्वतावर आहे, त्याला तिरुमलई असें म्हणतात. कपिलतीर्थामध्यें स्नान करून, कपिल भगवंताचें स्मरण करून यात्री पर्वतारोहण करतात. ह्या पर्वताचें नांव वेंकटाचल असें आहे. असें म्हणतात कीं साक्षात् श्रीव्यंकटेश येथे पर्वतरूपांत स्थित आहे. यावरून याला शेषाचल असेंहि म्हणतात. पर्वतावर स्वामी पुष्करणी तीर्थांत स्नान वराह भगवंताचें दर्शन करून भगवान् वेंकटेशाचें दर्शन घेतात. (तीर्थांक पृ. ३४६)

३. श्रीमुष्णम् - चिदंबरापासून २६ मैल दूर हें क्षेत्र आहे. वराह भगवानाचा अवतार इथेंच झाला होता. ह्या देवळांत श्रीदेवी-भूदेवीसह यज्ञवराहाची सुंदर मूर्ती आहे. (- तीर्थाक पृ. ३५९)

४. तोताद्रि - तीर्णवल्लीपासून थोड्या अंतरावर हें स्थळ आहे. मंदिराच्या गर्भागारांत शेष फणांच्या छत्राखालीं श्रीदेवी-भूदेवीसहित भगवान विष्णूची श्रीमूर्ति विराजित आहे. (-तीर्थांक पृ. ३९०)

५. पुष्कर - जलरूपनारायण स्थित हें एक मोठें सरोवर असून घाटावर ब्रह्मदेवाचे मंदिर आहे. हे क्षेत्र परशुरामाचे वडील जमदग्नि ऋषींचें तपोस्थान आहे. (- तीर्थांक पृ. ८६)

६. नैमिषारण्य - हें स्वयंव्यक्त क्षेत्र असून येथें-वनरूपीनारायण आहे. येथें चक्रतीर्थ आणि गोमती नदी आहे. (- तीर्थांक पृ. ५०९ व ११०)

७. बद्रिकाश्रम - इथें लक्ष्मी समवेत बद्रिनारायण पूर्वाभिमुख आहे. ऋषिरूप नरनारायण-स्वरूप विराजित आहे. (तीर्थांक पृ. ५०९, ५८ व ५६)

८. शालिग्रामक्षेत्र (मुक्तिनारायण) - याला मुक्तिनाथ असेंहि म्हणतात. शालिग्राम शिला येथे मिळतात. येथे चक्रतीर्थ व गंडकी नदी आहे. (- तीर्थांक पृ. ५०९,१५४ व १५५)

**।। शालिग्रामशिला यत्र तीर्थं तत् क्रोशयुग्मकम् ।।**

- भगवान् शालिग्राम जेथें विराजमान असतात, तेथें दोन कोसांपर्यंत तीर्थक्षेत्र विस्तारतें. (- बृहद्धर्म पुराण, पूर्वखण्ड - १४/२८)

अष्टोत्तरशत तीर्थांमध्ये अष्टवैकुंठ भारतवर्षांत आहेत. त्यांत चार क्षेत्रें दक्षिण भारतामध्यें (म्हणजे विंध्य पर्वताच्या दक्षिणेस) व चार उत्तर भारतामध्यें आहेत. तिरुपति (आंध्र प्रदेश) श्रीरंग, श्रीमुष्ण, तोताद्रि हीं तीन तमीळनाडुमध्यें आहेत. बद्रुमठ पद्रिकाश्रम (गढवाल जिल्हा, हिमाचल प्रदेश); पुष्कर (राजस्थान) नैमिषारण्य (उत्तर प्रदेश) व शालिग्रामक्षेत्र (नेपाळ) मध्यें आहे.

### स्वयं व्यक्त अष्टमहाक्षेत्र

**आद्यमेतत्स्वयं व्यक्तं विमानं रङ्ग संज्ञकम् ।**
**श्रीमुष्णं वेङ्कटाद्रिं च शालग्रामं च नैमिषम् ।।**
**तोताद्रिं पुष्करं चैव नरनारायणाश्रमम् ।**
**अष्टौ मे मूर्तयः सन्ति स्वयं व्यक्ता महीतले ।।**

- श्रीरङ्ग, श्रीमुष्ण, वेङ्कटाचल, हरिक्षेत्रक शालग्राम, नैमिष, तोताद्रि पुष्कर आणि बदरिकाश्रम - या आठ स्वयं प्रकट स्थानांत भूतलावर भगवंताचे आठ श्रीविग्रह स्वयं प्रकट झाले.

## ७. चतुर्धाम यात्रा

१. **द्वारावती (द्वारका)** :- हें क्षेत्र समुद्र किनाऱ्यावर गोमती नदीच्या मुखावर आहे. येथें द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्णाचें मंदिर आहे. हें स्थान त्रेतायुगांतील आहे. (- तीर्थांक पृ. ४१०)

२. **जगन्नाथपुरी** :- येथील मुख्य जगन्नाथ मंदिर अत्यंत विशाल आहे. कलियुगाचें पावनकारी धाम म्हणून गणलें जाते. येथील गर्भगारांत श्री जगन्नाथ, सुभद्रा तथा बलरामजीच्या मूर्ति आहेत. (- तीर्थांक पृ. १९७)

३. **रामेश्वर** :- मंदिरांत रामेश्वर नावानें शिवलिंग विराजित आहे. हे क्षेत्र त्रेतायुगांतील

आहे. (- तीर्थांक पृ. ३७४)

४. **बद्रीकाश्रम** :- (अष्ट महाक्षेत्रांत अंतर्भूत)

## ८. मोक्षदायिनी सप्त पुरी

१. **काशी** :- पुराणांनुसार हे एक आद्य वैष्णव क्षेत्र आहे. एके काळी ही भगवान् माधवाची पुरी होती. असे सांगण्यांत येते कीं एकदां भगवान् शंकराने ब्रह्माचें एक शीर कापलें असता तें शंकराच्या हाताला चिकटून राहिलें. शंकर बारा वर्षेपर्यंत बद्रिनारायण कुरुक्षेत्र, ब्रह्मह्रद आदि क्षेत्रांतून फिरत राहिला. पण चिकटलेलें ब्रह्माचें शिर सुटेना. शंकर काशीच्या सीमेंत प्रवेश करूं लागला तेव्हां ब्रह्महत्येने त्यांचा पिच्छा सोडला आणि तिथें स्नान करतांच हाताला चिकटलेलें शिर सुटलें. भगवान विष्णूची प्रार्थना करून शंकराने त्या नगरींत नेहमी वास करण्यासाठी जागा मागून घेतली. (- तीर्थांक पृ. १२६/१२७)

२. **कांची** :- कांची ही हरिहरांची पुरी आहे. याचे शिवकांची व विष्णुकांची असे दोन भाग आहेत. शिवकांची मध्यें एकाम्रेश्वर देवस्थान आहे. फर्लांगांवर कामाक्षी देवीचे मंदिर आहे. शिवकांची देवस्थानापासून पांच किलोमीटरांवर विष्णुकांची देवालय आहे. (- तीर्थांक पृ. ३५४ ते ३५७)

३. **मायापुरी (हरिद्वार)** :- हिला गंगाद्वार, कुशावर्त असेंहि अपरनाम आहे. (तीर्थांक पृ. ६१-६२)

४. **अयोध्या** :- सप्तपुरींमध्यें प्रथम पुरी अयोध्या आहे. सूर्यवंशी राजा लोकांची ही राजधानी. (तीर्थांक पृ. १४२)

५. **द्वारावती (द्वारका)** :- (चतुर्धाम यात्रांत अंतर्भूत)

६. **मथुरा** :- द्वारकाधीश मंदिर व विश्रामघाट (तीर्थांक पृ. ९५, ९६)

७. **अवंतिकापुरी (उज्जैन)** :- महाकालमंदिर व क्षिप्रा नदी हरसिद्धी देवी अशीं प्रधान मंदिरें आहेत. (तीर्थांक पृ. २१४)

# परिशिष्ट - ९

(श्री विद्याधिराजतीर्थांच्या श्रीगुरुपीठावरील २६ वर्षांच्या दैदीप्यमान कारकिर्दीबद्दल आणि विशेषतः त्यांच्या अपूर्व सिद्धी तथा श्रीशालिग्राम क्षेत्राच्या यात्रेची यशस्वी परिपूर्ति केल्याबद्दल आनंद व्यक्त करून त्यांना अभिवादन करण्याचा एक समारंभ गोव्यांतील समाजवृंदाने रविवार, दि. २८ फेब्रुवारी १९९९ रोजीं घडवून आणला. त्या समारंभांत श्री स्वामीजींना अर्पण करण्यात आलेलें मूळ संस्कृत भाषेंतील मानपत्र व त्या मानपत्राचा मराठी अनुवाद येथें देत आहोंत.)

## मानपत्र -

### श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीशाः

## परमपूज्याः श्रीमद्-विद्याधिराजतीर्थाः श्रीपाद वडेर स्वामिनः

चैत्र-शुक्ल २ (द्वितीया) तिथौ शके १८९५ मिते शालिवाहनशके बृहस्पति वासरे श्रीमठस्य ४९८ तमे संस्थापनादिने श्रीगुरुपीठावासीनानां, तद्दिनात् प्रभृति आत्मनः संन्यस्तव्रतस्य वज्रनिर्धारेण पालनं कुर्वाणानां, तथैव विविधेषु सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक-आध्यात्मिक-क्षेत्रेषु स्नेहस्य तथैव सहकार्यस्य च आधारेण मठानुयायिवर्गेषु तथैव अखिल-सारस्वतानां समाजेषु अननुभूतं चैतन्यं निर्मितवतां ततश्च श्रीगोकर्ण-पर्तगाळी-जीवोत्तम-मठस्य कीर्तिं दिक्षु प्रसारितवतां, श्रद्धेयानां श्रीमठ-परंपरायां त्रयोविंशतितमानां श्रीगुरुस्वामिनां परमपूज्यानां श्रीमद्-विद्याधिराजतीर्थानां श्रीपाद-वडेर-महाशयानां पवित्रचरणकमले सश्रद्धं प्रणम्य अद्यतनीये शुभदिने वयं तेषां प्रति निखिलस्य गोमंतक-सारस्वत-समाजवृन्दस्य आदरभावनाः निवेदयामः।

मठाधिपतेः संन्यस्तव्रतस्य कठोरं पालनं समाचरद्भिः श्रीस्वामिभिः यः अध्यात्म-धर्म-स्वाध्याय-महायज्ञः अखण्डतया समाचरितः तस्य परमोत्तुंगा परिणतिः नाम श्रीमन्न्यायसुधा मङ्गलपाठस्य सुयशोन्विता परिपूर्तिः (शके १९२०)। समाजसम्पर्क सातत्यार्थहेतुना यत्र यत्र सारस्वत-समाजः ऐतिहासिक कारणेन वा व्यवसायोद्यम कारणेन वा निवसति तत्र तत्र संचारम् अवलम्ब्य संवादं समालम्ब्य च श्रीस्वामिभिः समाजहृदयेषु स्वत्वस्य च स्वाभिमानस्य च तेजो ज्योतिः प्रज्वलिता तेषु च आन्तरिकीम् एकात्मतां वृद्धिंः नीरवा सारस्वतसमाजः कुलदैवतानि श्रीगुरुचरणौ प्रति च अधिकमेव समाकर्षितः।

तीर्थाटनं संन्यास-धर्मस्य अविभाज्यं कार्यं ज्ञात्वा श्रीस्वामिभिः श्रीमठ-परम्परान्तर्गत-यतिवर्यैःकृतानां सर्वेषां पवित्रधाम्नाम् तथैव तीर्थस्थानानां यात्राः कर्तव्यबुद्ध्या कृताः। तासु सप्तानां मोक्षपुरीणां तथैव चतुर्णां धाम्नां तथा च अष्टवैष्णवानां दिव्यक्षेत्राणां संदर्शन यात्राः प्राधान्येन उल्लेखम् अर्हन्ति। तासु अपि सविशेषम् उल्लेखनिया यात्रा नाम नेपाळ-त्रिविष्टप (तिबेट) परिसरे गण्डकीनद्याःतीरे दामोदर-हिमालय-पर्वतश्रेणीनां संनिधौ भगवतः श्रीविष्णोः भूतलस्थितस्य पवित्र धाम्नः श्रीदामोदरकुण्डस्य (चक्रतीर्थस्य)

दुर्गमा, दुर्लभा, कष्टसाध्या च ऐतिहासिकी यात्रा। आत्मनः सुखसुविधाः प्रकृतेः अस्वास्थ्यं तथा साधनसामग्रीम् अविगणय्य श्रीस्वामिभिः अंगीकृतानि कार्याणि पूर्ततां नीत्वा श्रीमठस्य इतिहासे सुवर्णपर्वारम्भः कृतः इति अहो भाग्यमेव सकलसारस्वतानाम्।

एतादृशेषु ऐतिहासिकेषु कार्येषु अग्रगण्यः श्रीमठस्थापना-पंचशताब्द-महोत्सवः शके १८९९ संमिते वर्षे श्रीस्वामिभिः महता विभवेन संम्पादितः। तस्य उत्सवस्य माध्यमेन ऐतिहासिक कालात् इतस्ततः विकीर्णानां समाजबांधवानां संघटनस्य प्रक्रियां समारभ्य श्री स्वामिभिः समाजः अननुभूतेन एकतासूत्रेण सुगुम्फितः। 'विद्याधिराजपुरस्कार' योजनाधारेण समाजे विद्यमानानां गुणिजनानां समुचितगौरव-सत्कार प्रथायाः शुभारम्भः कृतः। चातुर्मासव्रत-समये अन्यस्मिन् वा प्रसंङ्गे कृतवसति-परिसरस्थान् समाजश्रेष्ठान् सत्कारसम्मान पुरस्कारैः सत्कृत्य समाजसेवाकार्यम् गौरवान्वितं प्रतिष्ठां प्रापितं च श्रीस्वामिभिः।

तपोद्वयस्य अल्पीयसि एव काले स्वामिभिः श्रीसंस्थानकक्षान्तर्गतानां येषां सर्वेषां मठानां तथैव शाखामठानां जीर्णोद्धारः कारितः तेषु वारणासी-तीर्थक्षेत्रे पंचगंगा-रोधसि ईशान्यप्लवायाः गंगायाः तीरे स्थितः आद्यमठोऽपि समाविष्टः। श्रीस्वामिभिः देवमंदिरस्तितानां प्रतिमानां पुनःप्रतिष्ठां तथैव मन्दिराणां जीर्णोद्धारं च सम्पाद्य मन्दिरसमाजयोः सम्बन्धः दृढतरः कृतः। सारस्वत-समाजस्य नूतनाः वसतयः यत्र यत्र समुत्पन्नाः तत्र तत्र श्रीस्वामिभिः नवयुगस्यआवश्यकतानुसारं सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिकाणाम् अपेक्षाणां परिपूर्तये नूतनानि भव्यानि मठवास्तूनि निर्मितानि। परिवर्तितकालक्रमानुसारम् अनेक सामाजिकः शैक्षणिकाः सांस्क्रृतिकाः च उपक्रमाः प्रारब्धाः। विविधान् यज्ञयागान् सम्पाद्य समाजबान्धवेषु धर्मभावनायाः धर्मश्रद्धायाश्च वृद्धिः आकारिता। तस्य प्रधानं निदर्शनं नाम मठमुख्यालयस्य ईशान्यप्लवा-कुशावतीतीर्थे तटस्थितस्य पुरातन मठवास्तोः त्रिभागीयं कायाकल्पं करयित्वा विस्तारकार्यं पूर्णतां च नीत्वा श्रीस्वामिचरणैः श्रीरामदेवस्य कण्ठे वास्तुरूपिणी पुष्पमाला सुप्रतिष्ठापिता इति प्रतिभाति।

केवलं प्रधानविशेषः एव अत्र उल्लिखिताः। वयम् एतेषाम् अन्येषां च विविधानां कार्यसिद्धीनां साक्षिभूताः श्रीस्वामिचरणानाम् असीमा कार्यसिद्धिः मन्त्रशक्तिप्राप्तम् अमोघं वाग्वैभवं, साधनसुचितानिष्ठा, कालबद्धतया अनुशासनदक्षतया अखिलकार्यक्रमपूर्ततादर्शः अंगीकृत-व्रतस्य कठोराचरणम् इत्यादिगुणान् श्रीस्वामिसान्निध्य लाभात् अवलोक्य अस्माभिः प्रतिपदं दिव्यत्वं साक्षात्कृतम् येन अस्माकं हृदयानि भक्त्यादरेण आकण्ठं परिपूरितानि। अस्माकं कृतार्थभावनायाः समुल्लेखः शाश्वतं तिष्ठतु इति हेतुना सविनयम् शब्दसंमान सुमनसाम् अंजलिं परमपूजनीयानां श्रीस्वामिनां पुण्यचरणयोः समर्प्य धन्यधन्यताम् अनुभवामः।

मठग्राम - गोमन्तकः
तिथिः फाल्गुन - शुद्ध - त्रयोदशी, शके १९२०
रविवारः दिनांक २८ फेब्रुवारी, १९९९

## परिशिष्ट - १०

### मानपत्राचा मराठी अनुवाद

**श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश**

## परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी

चैत्र शुक्ल २या शके १८९५ या मंगलदिनी, जो श्रीमठाचा ४९८ वा संस्थापन-दिन होता, श्रीगुरुपीठासीन झाल्यापासून ज्यांनी आपल्या संन्यस्तव्रताचें निर्धारंपूर्वक पालन करतानाच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्रांत धर्माचरणाला स्नेह व सहकार्याची जोड देऊन मठानुयायी वर्गामध्ये आणि सकल सारस्वत समाजामध्ये अभूतपूर्व चैतन्य निर्माण केलें, जेणेकरून श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची कीर्ति दिगंत झाली, ते मठपरंपरेंतील तेविसावे गुरुस्वामी परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांच्या चरणकमलांना सश्रद्ध अंतःकरणाने आम्ही वंदन करतों आणि आजच्या दिवशीं तमाम गोमंतकस्थ सारस्वत समाजवृंदाची आदरयुक्त भावना विदित करतों.

मठाधिपति या नात्याने संन्यस्त व्रताचें कठोर पालन करताना श्रीस्वामीजींनी धर्म-अध्यात्माच्या स्वाध्यायाचा महायज्ञ अखंड चालविला, ज्याची एक उत्तुंग परिणती संबोधतां येईल ती श्रीमन्न्यायसुधा मंगलपाठाची यशस्वी परिपूर्ति (शके १९२०) होय. समाजाकडे सतत संपर्क रहावा या दृष्टीने जेथें जेथें सारस्वत समाज ऐतिहासिक कारणासाठीं असो वा उद्योग-व्यवसायासाठीं असो, स्थायिक झालेला असेल तेथें संचार करून सत्संग व संवादाद्वारें समाजामध्यें हृदयस्थ स्वत्व व स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली व आंतरिक एकात्मता वृद्धिंगत करताना कुलदैवतांकडे व श्रीगुरुचरणांकडे समाजाला अधिक आकृष्ट करून घेतलें.

तीर्थाटन हा संन्यास धर्माचा अविभाज्य भाग मानून श्रीमठ परंपरेंतील यतिवर्यांकडून घडलेल्या साऱ्या पवित्र धामांची व तीर्थस्थानांची आग्रहाने यात्रा केली, त्यांमध्यें सप्त मोक्षपुरी, चतुर्धाम यात्रा, अष्टवैष्णव दिव्य क्षेत्र संदर्शन यांचा अंतर्भाव आहे. त्यांतहि विशेष उल्लेखनीय अशी नेपाळ-तिबेट परिसरांतील गंडकी नदीच्या किनारीं दामोदर हिमाल पर्वतरांगांच्या सान्निध्यांतील भगवान श्रीविष्णूचें भूतलावरील पवित्र धाम मानल्या जाणाऱ्या श्रीदामोदर कुंडाची (चक्रतीर्थ) दुर्गम, दुर्लभ व कष्टसाध्य अशी ऐतिहासिक यात्रा पूर्ण केली. वैयक्तिक सुखसोयी, प्रकृति अस्वास्थ्य अथवा साधनसामुग्रीच्या अभावाची

पर्वा न करतां श्री स्वामीजींनी सारीं अंगिकृत कार्यें पूर्णत्वास नेऊन श्रीमठाच्या इतिहासांतील सुवर्ण पर्वाचा आरंभ केला.

अशा ऐतिहासिक कार्यांमध्यें श्रीमठस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव शके १८९९ सालीं वैभवाने साजरा करून ऐतिहासिक कारणांमुळें इतस्ततः विखुरलेल्या समाजाला संघटित करण्यासाठीं प्रक्रिया कार्यरत केली व समाजांत अभूतपूर्व एकता घडवून आणली. विद्याधिराज पुरस्कार या योजनेद्वारें समाजांतील गुणिजनांचा यथोचित गौरव करण्याची प्रथा सुरू केली. चातुर्मास व्रतकालीं अथवा अन्य प्रसंगीं वास्तव्य केलेल्या परिसरांतील समाजश्रेष्ठींच्या सत्कार्याची सन्मानपूर्वक पावती देऊन समाजसेवेला मान्यता व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.


दोन तपांच्या अल्पावधींत श्रीसंस्थानच्या कक्षेंतील सर्व मठ व शाखामठ यांचे जीर्णोद्धार करविले, ज्यांमध्यें वारणासी तीर्थक्षेत्रीं पंचगंगा घाटावरील ईशान्यप्लवा गंगेच्या तीरीं असलेल्या आद्य मठाचा समावेश आहे. देवमंदिरांमधील प्रतिमांची पुनःप्रतिष्ठा व मंदिरांचे जीर्णोद्धार करून समाज व मंदिरांमधील दुवा दृढतर केला. सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती जेथें निर्माण झाल्या तेथें तेथें समाजाची सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक गरज भागविण्यासाठीं नव्या भव्य मठवास्तु उभ्या केल्या. तसेच वदलत्या काळाच्या गरजा ओळखून अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम सुरू केले. विविध यज्ञयागांद्वारे धर्म व धार्मिकतेची भावना वाढीस लावली. विशेष म्हणजे मठाचे मुख्यालय असलेल्या ईशान्यप्लवा कुशावती तीर्थाच्या तटावरील पुरातन मठवास्तूचा तीन टप्प्यांत कायाकल्प करवून विस्ताराचे कार्य पूर्णत्वास नेलें व त्यायोगें श्रीरामदेवाच्या गळ्यांत वास्तुरूपी माला प्रतिष्ठित केली.

हे केवळ ठळक विशेष आहेत. या व इतर अनेक अपूर्व सिद्धीचे आम्ही साक्षीदार. अचाट कार्यसिद्धि, मंत्रशक्ति प्राप्त झालेली अमोघ वाणी, साधनशुचितेचा आग्रह, प्रत्येक कार्यक्रम कालबद्ध व शिस्तबद्ध रीतीने पूर्णत्वास नेण्याचा आदर्श, स्वीकृत व्रताचे कठोर आचरण, हे सारे सद्‌गुण जवळून पाहताना आम्हाला पदोपदीं दिव्यत्वाची प्रचीति आली आणि आमचीं मनें आदर व भक्तीने आकंठ भरून गेलीं. या कृतार्थतेच्या भावनेची नोंद रहावी या हेतूने अत्यंत नम्रतेने हा शब्दसन्मान परमपूज्य श्रीस्वामीजींच्या चरणीं अर्पण करीत आहोंत.

मठग्राम - गोमन्तक<br>
फाल्गुन शुद्ध त्रयोदशी, शके १९२०<br>
रविवार, दिनांक २८ फेब्रुवारी, १९९९

श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे २१ वे पीठाधीश

## श्रीमद् कमलानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी



शिष्याश्रम : वैशाख व. पंचमी शके १८२९, शनिवार

पट्टाभिषेक : वैशाख शु. (अक्षय्य) तृतिया शके १८६४, शनिवार

समाधि : चैत्र शु. एकादशी शके १८६५, शुक्रवार

श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचे २२ वे पीठाधीश

## श्रीमद् द्वारकानाथतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी



शिष्याश्रम : वैशाख वद्य सप्तमी शके १८६४, गुरुवार
पट्टाभिषेक : चैत्र वद्य अष्टमी शके १८६५, मंगळवार
समाधि : फाल्गुन वद्य षष्ठी शके १८९४, रविवार